कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ वर्ष १०

रायगड | गुरुवार | दि. २२ ऑक्टोबर २०२६ | अंक १३६ | पृष्ठे ८ | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

काही महिन्यांत गडबड होणार : राज ठाकरे

मुंबई : शिवसेनेच्या दसरा मेळाव्यातून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि खासदार संजय राऊत यांनी केंद्रातील मोदी सरकावर जोरदार हल्लाबोल केला. देशात हुकूमशाही सुरू असल्याचे सांगत आंदोलक विद्यार्थ्यांना मारहाण होत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. तसेच, एप्रिल महिन्यात मोदी सत्तेतून जातील, असा दावा देखील संजय राऊत यांनी केला. आता, मनसेप्रमुख राज ठाकरेंनीही संजय राऊतांच्या वक्तव्याला दुजोरा दिला आहे. देशात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात •➤पान २ वर

बारावीच्या विद्यार्थ्यांना दिलासा

मुंबई : बारावीच्या विद्यार्थ्यांना राज्य सामायिक प्रवेश परीक्षेची (सीईटी) दोनदा संधी देण्याच्या निर्णयात महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. डिसेंबरमध्ये होणारी प्रस्तावित सीईटी रद्द करण्यात आली असून, आता दोन्ही परीक्षा बारावीच्या बोर्ड परीक्षेनंतर घेतल्या जाणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचा अभ्यासाचा ताण कमी होणार असून, बारावीचा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी शिक्षकांना अधिक वेळ मिळणार आहे. विद्यार्थ्यांना सीईटीमध्ये चांगले गुण मिळविण्यासाठी आता दोन स्वतंत्र संधी उपलब्ध होणार आहेत. डिसेंबरमध्ये प्रस्तावित असलेली पहिली सीईटी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने रद्द केली आहे. आता दोन्ही सीईटी परीक्षा •➤पान २ वर

वेधक

निवडणुकीतून दिग्गजांची माघार

सातारा : आर्थिकदृष्ट्या सक्षम जिल्हा बँकांच्या यादीत अग्रक्रमावर असलेल्या सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत मोठी घडामोड पाहायला मिळाली. बँकेच्या निवडणुकीसाठी बुधवारी (दि.२१) उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा दिवस होता. आरबीआयच्या नियमानुसार ज्या संचालकांनी १० वर्ष संचालकपद भूषवले आहे, त्यांना निवडणुकीसाठी अर्ज दाखल करता येणार नसल्याने साताऱ्यातील दिग्गज नेत्यांना उमेदवारी अर्ज मागे घ्यावे लागले आहेत. त्यात खासदार उदयनराजे भोसले, मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, खासदार नितीन पाटील, माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकर, माजी आमदार प्रभाकर घार्गे, प्रदीप विधाते, कांचन साळुंखे यांचा समावेश आहे.

पेणमध्ये मटक्याचा धंदा जोरात

पेण : शहरासह वडखळमध्ये पुन्हा एकदा मटका माफिया डोकेवर काढताना दिसत आहे. कवंडाळ तळा, नंदिमाळ नाका, धरमतर रोड, अंतोरा फाटा, कोळीवाडा नाका या ठिकाणी राजरोसपणे मटका सुरू असुन, खादीच्या आर्शीवादामुळे तसेच खाकीला न जुमानता हा मटक्याचा अवैध्य धंदा सुरू असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे पडद्या मागून या धंद्याला कुणाचा आर्शीवाद आहे? असा प्रश्न उपस्थित होत आहे. तर वडखळमध्ये गांजा, दारू, अवैध्य भंगार माफीया यांची भर असताना आता मटका सुद्धा तेजीत चालू आहे. येथील बोरी फाट्यावर भुषण नामक व्यक्ती अवैध्य मटक्याचा धंदा चालवत असून, त्याबाबत काही खाकीच्या मंडळींना सुद्धा माहित असल्याचे बोलले जात आहे.

अपघातात चार युवकांचा मृत्यू

कराड : कोल्हापूर येथील श्री अंबाबाई देवीचे दर्शन घेऊन परतणाऱ्या सातारा जिल्ह्यातील युवकांच्या स्कॉर्पिओ गाडीचा पुणे-बंगळूर महामार्गावरील कराड शहराजवळील उड्डाणपुलावर भीषण अपघात झाला. रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास स्कॉर्पिओ आणि ट्रक यांच्यात झालेल्या या अपघातात चार युवकांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर अन्य तिघे जखमी झाले. जखमींवर कराड येथील कृष्णा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या अपघातातील सर्व युवक सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील कातरखटाव गावचे रहिवासी आहेत. पोलिसांच्या माहितीनुसार, अपघातात चार युवकांचा मृत्यू •➤पान २ वर



धावीर महाराजांना सशस्त्र मानवंदना

सलामी सोहळा पाहण्यासाठी प्रचंड गर्दी

। रोहा/चणेरा । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्याचे श्रध्दास्थान आणि रोह्याचे ग्रामदैवत श्री धावीर महाराजांच्या पालखी सोहळ्यास बुधवारी (दि.२१) पहाटे मोठ्या उत्साहात सुरूवात झाली. यावेळी रायगड पोलिसांच्यावतीने रोहा पोलीस निरीक्षक अभय शेलार व पथकाने श्री धावीर महाराजांना सशस्त्र मानवंदना दिली. हा सलामी सोहळा पाहण्यासाठी मंदिरात प्रचंड गर्दी झाली होती.

या उत्सवानिमित्त मंदिराचा संपूर्ण परिसर विविध रंगीत फुलांच्या सजावटीने सजविण्यात आला होता. पाण्याचे उंच कारंजे आणि सुंदर रांगोळ्यांनी वातावरण प्रसन्न झाले होते. बुधवारी भल्या पहाटे मंगलमय वातावरणात गोंधळ्यांच्या वाद्याने ग्रामदैवताची महाआरती संपन्न झाली. पोलिसांनी मानवंदना दिल्यानंतर धावीर महाराजांची पालखी पारंपारिक वाद्यांच्या गजरात मार्गस्थ झाली. हा सशस्त्र सलामी सोहळा पाहण्यासाठी भल्या पहाटेपासून भाविकांनी मंदिर परिसरात गर्दी केली होती. तीन वर्षांपूर्वी मंदिरासमोरील सभामंडप हटविण्यात आले आहे. त्या ठिकाणी दोन्ही बाजूला बैठक गॅलरी करण्यात आल्याने भक्तांची मोठी गैरसोय दूर झाली असून, भक्तांना गॅलरीत बसून मानवंदना पाहता आली. यावेळी मंदिरात पालकमंत्री भरत गोगावले, महिला व बाल कल्याण मंत्री •➤पान २ वर

कर्जतमधील १२३ नळपाणी योजना बंद

आमदारांकडून वनराई बंधारे बांधण्याचा सल्ला

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यात शासनाने दुष्काळ जाहीर केलेला नाही. मात्र, सप्टेंबर महिन्यापासून पाऊस गायब झाल्याने येथील धरणं फुल्ल भरली नाहीत. त्यामुळे पाणीटंचाई आढावा बैठकीत कर्जत विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे यांनी वनराई बंधारे बांधण्याचा जालीम उपाय सांगितला आहे. दरम्यान, आज कर्जत तालुक्यातील १२३ नळपाणी बंद आहेत. त्यामुळे नदी-नाले कोरडे होत असताना वनराई बंधारे बांधून पुढील ६ महिन्यांच्या पाणी संकटावर ही मलमपट्टी यशस्वी ठरेल का, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

कर्जत तहसील कार्यालयात नुकतीच संभाव्य पाणीटंचाई निवारण आराखडा तयार करण्यासाठी बैठक बोलावण्यात आली होती. आमदार महेंद्र थोरवे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेला तहसीलदार डॉ. धनंजय जाधव, पंचायत समिती सभापती नमिता घारे, नगराध्यक्ष पुष्पा दगडे, पंचायत समिती उप सभापती चित्रा ठाकरे, उप नगराध्यक्ष संतोष पाटील यांच्यासह पंचायत समितीचे सदस्य उपस्थित होते.

यावेळी, पाणीटंचाईची भीषणता लक्षात घेता तालुक्यातील सर्व ५५ ग्रामपंचायतींमध्ये लोकसहभाग आणि श्रमदानातून वनराई बंधारे उभारण्याच्या सूचना आमदार थोरवे यांनी दिल्या. नद्या आणि ओढ्यांवर तात्पुरते बंधारे बांधून पाणी अडवल्यास विहिरीतील कूपनलिकांची पाणीपातळी टिकून राहील. या कामासाठी जेसीबी, साहित्य किंवा कोणताही निधी कमी पडल्यास आमदार निधी, सीएसआर आणि सरकारी निधीतून मदत केली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. तालुक्यातील पाणीपुरवठा योजनेसह एमजीपी आणि जलजीवन •➤पान २ वर



जलजीवनचे तीनतेरा

कर्जत तालुक्यातील जलजीवन मिशनअंतर्गत एकूण १२३ पाणीपुरवठा योजनांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यापैकी ७८ योजना एनजेएस आणि ४५ योजना नाबार्ड यांच्यामार्फत राबविण्यात येत आहेत. मात्र, या सर्व नळपाणी योजना अपूर्णावस्थेत आहेत आणि त्यामुळे पुढील ६ महिने पाणीटंचाईचे संकट आणखी गडद होणार असल्याचे बोलले जात आहे.

आज पावसाची शक्यता

हवामान विभागाकडून यलो अलर्ट

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यासह पाच जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये गुरुवारी (दि.२२) वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा देण्यात आला असून, हवामान विभागाने यलो अलर्ट जारी केला आहे. ढगाळ वातावरणामुळे पावसाची शक्यता असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क रहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आले आहे.

जिल्ह्यामध्ये गेल्या अनेक दिवसांपासून उन्हाचे चटके जाणवत आहेत. उन्हामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. शेत जमीनीला भेगा पडू लागल्या आहेत. हातातोंडाशी आलेला घास जाण्याची भिती निर्माण झाली आहे. रब्बी हंगामावरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच, दुपारच्यावेळी घरातून बाहेर पडणे कठीण होऊ लागले आहे. कडक उन्हामुळे आरोग्याचा प्रश्नही गंभीर झाला आहे. उन्हापासून संरक्षण करण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना केल्या जात आहेत. शरीरात गारवा निर्माण करण्यासाठी अनेकजण थंड पेय पिण्यावर अधिक भर देत आहेत. काहीजण नारळ पाणी, कोकम सरबत, लिंबू सरबत, पायनापल ज्यूस पिण्यावर भर देत आहेत. तसेच, उन्हापासून बचाव करण्यासाठी गॉगल, स्कार्पचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात आहे. पावसाने सप्टेंबरपासून दडी मारल्याने हवेत उष्णताही प्रचंड वाढली आहे. मात्र, अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरात प्रचंड हवामान बदल झाला आहे. या हवामान बदलांमुळे रायगडसह कोकणात विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. त्यामुळे रायगडसह पालघर, ठाणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर या जिल्ह्यांमध्ये यलो अलर्ट •➤पान २ वर



नेते एकत्र, कार्यकर्त्यांचे काय?

। खोपोली । प्रतिनिधी ।

कर्जत-खालापूर विधानसभा मतदारसंघातील उद्योग विकास आणि स्थानिकांना रोजगार मिळवून देण्याच्या मुद्द्यावर आमदार महेंद्र थोरवे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे एकत्र आल्याची चर्चा सुरू आहे. विकासाच्या मुद्द्यावर नेत्यांनी एकत्र येणे स्वागतार्ह असले, तरी राजकीय संघर्षात एकमेकांविरोधात उभे ठाकलेल्या कार्यकर्त्यांचे काय, हा प्रश्न आता उपस्थित होत आहे. नेत्यांचे राजकीय समीकरण बदलत असताना कार्यकर्त्यांनी भोगलेल्या कायदेशीर, आर्थिक आणि कौटुंबिक परिणामांची जबाबदारी कोण घेणार, असा सवाल चर्चेत आला आहे.

स्थानिक उद्योगांमध्ये भूमिपुत्रांना रोजगार मिळावा, तरुणांना कंपन्यांमध्ये कामाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात आणि मतदारसंघातील औद्योगिक विकासाला चालना मिळावी, यासाठी राजकीय नेत्यांनी एकत्र येणे महत्त्वाचे आहे. मात्र, याच मुद्द्यांवरून किंवा राजकीय वर्चस्वाच्या संघर्षातून कार्यकर्त्यांमध्ये कटुता निर्माण झाली असेल, तर ती दूर करण्यासाठीही नेत्यांनी पुढाकार घेण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. राजकीय संघर्षाच्या काळात कार्यकर्ते एकमेकांविरोधात आक्रमक भूमिका घेतात. आरोप-प्रत्यारोप, परस्पर •➤पान २ वर

शिक्षकांना सहल भोवली

निष्काळजी अन् बेजबाबदारपणाचा ठपका; पाच जणांवर गुन्हा दाखल

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

काही दिवसांपूर्वी दिवेआगर येथील समुद्रात बुडून आठ विद्यार्थ्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. या प्रकरणी निष्काळजी आणि बेजबाबदार पणाचा ठेपका ठेवून विनर्स ॲकेडमीच्या संस्थापक शिक्षकांसह पाच जणांविरोधात दिघी सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे पुणे जिल्ह्यातील आळंदीमधील विद्यार्थ्यांची रायगड जिल्ह्यातील सहल शिक्षकांना भोवली असल्याचे दिसून येत आहे.

पुणे जिल्ह्यातील आळंदी येथील विनर्स ॲकेडमीच्या अकरावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांची सहल दि.१ ऑक्टोबर रोजी रायगड जिल्ह्यातील दिवेआगर येथे आली होती. दरम्यान पाण्याचा अंदाज न आल्याने आठ विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाला. याप्रकरणी दिघी सागरी पोलीस ठाण्यात सुरुवातीला आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती. त्यानंतर करण्यात आलेल्या तपासात विनर्स ॲकेडमधील विद्यार्थ्यांसह शिक्षक व इतर मंडळी असे ४८ जणांची शैक्षणिक सहल रायगड किल्ला पहाण्यासाठी काढण्यात आली होती. रोप वे मार्फत किल्ल्यावर जाण्यासाठी माणसी तिकीटाचे पैसे विद्यार्थ्यांकडून घेण्यात आले होते. मात्र, रोप वे बंद असल्याने या विद्यार्थ्यांना पायरी मार्गे गडावर नेण्यात आले. त्यानंतर श्रीवर्धन समुद्रकिनारी जाण्याचे नियोजन होते. परंतु, शिक्षक व इतर मंडळींनी दिवेआगर समुद्रकिनारी जाण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर दिवेआगर येथील समुद्रकिनारी सायंकाळी सर्वजण पोहचले. विद्यार्थ्यांना पोहता येत नसल्याचे माहित असतानाही सुरक्षिततेची साधने शिक्षकांकडून पुरविण्यात आली नाही. त्यामुळे या समुद्रात आठ विद्यार्थ्यांचा सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास समुद्रातील पाण्यात बुडून मृत्यू झाला होता. त्यामुळे कोणतीही सुरक्षिततेची साधने न पुरवता निष्काळजी आणि बेजबाबदारपणे विद्यार्थ्यांना समुद्राच्या पाण्यात खेळण्यात पाठविले, असा ठपका ॲकेडमीच्या संस्थापक शिक्षक अमर आडक यांच्यासह पाच जणांवर ठेवण्यात आला आहे. त्यांच्याविरोधात दिघी सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, मृत विद्यार्थ्यांच्या पालकांकडून दिलेल्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली आहे.

मोहितेंच्या कारभाराचा संशयास्पद अध्याय

- सेझ जमिनीच्या फेरफारात कथित घोळ
- भूसंपादनाचा शेरा कमी केल्याचा आरोप

। उरण । प्रतिनिधी ।

उरणच्या महसूल विभागातील कथित अनियमिततांचे एकामागून एक धागे समोर येत असल्याने खळबळ उडाली आहे. लाचप्रकरणात अटकेत असलेले मंडळ अधिकारी के. डी. मोहिते यांच्या कार्यकाळातील आणखी एका जमीन नोंद प्रकरणावर संशयाचे सावट निर्माण झाले आहे. मुंबई विशेष आर्थिक क्षेत्रासाठी (मुंबई सेझ) संमती निवाड्याद्वारे संपादित झालेल्या जमिनीच्या हस्तांतरणासंबंधी फेरफार नोंदीत कथित अनियमितता झाल्याची तक्रार करण्यात आली आहे. याच जमिनीच्या खरेदीखताची नोंद यापूर्वी नामंजूर झाली असतानाही तीच नोंद नंतर मंजूर करण्यात आल्याचा आरोप अनिल वाघमारे यांनी केला आहे.



प्रकरणाच्या नोंदींनुसार, फेरफार क्रमांक ८७०९, दि.४ जानेवारी २००८ रोजी मुंबई सेझसाठी भूसंपादनाच्या कलम ४ची अधिसूचना •➤पान २ वर

तब्बल १४७ प्रजातींचा मुक्त संचार | तिनविराजवळ खास उद्यानाची निर्मिती

रायगडात फुलपाखरांची रंगीबेरंगी दुनिया

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

पश्चिम घाटाचा विस्तीर्ण पट्टा, मुबलक झाडेझुडपे, विस्तीर्ण निसर्गरम्य समुद्रकिनारा आणि कांदळवने या पोषक वातावरणामुळे पाली सुधागडसह रायगड जिल्ह्यात सध्या रंगीबेरंगी फुलपाखरांचा संचार वाढला आहे. जिल्ह्यात तब्बल १४७ प्रजातींचा मुक्त संचार पाहायला मिळत आहे. यात महाराष्ट्राचे राज्य फुलपाखरू 'ब्ल्यू मॉरमॉन' (राणी पाकोळी) आणि पश्चिम घाटातील सर्वात मोठे दुर्मिळ 'सदर्न बर्ड विंग' यांचाही समावेश आहे.



जिल्ह्यात फुलपाखरांना लागणारे 'होस्ट प्लांट्स' (फूड प्लांट्स) मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. नर-मादीच्या मिलनानंतर मादी कडूनिंब, कढीपत्ता, सीताफळ, रामफळ, लिंबू, कदंब व अशोक यांसारख्या झाडांवर अंडी घालते. सोनटक्का व पानफुटीवर ग्रास डीमन आणि रेड पियरो ही सुंदर फुलपाखरे वाढतात. या रंगीबेरंगी दुनियेमुळे पर्यटक व स्थानिक नागरिक मोहीत होत असून, तिनविरा धरणाजवळ खास खासगी फुलपाखरू उद्यानही उभारण्यात आले आहे.

ग्रीन टच नर्सरीचे मालक अमित निंबाळकर म्हणाले की, परसबागेत फुलपाखरांना आकर्षित करण्यासाठी 'होस्ट प्लांट'ला नागरिकांकडून मोठी मागणी आहे. मात्र, वाढता तणनाशकांचा वापर, झपाट्याने होणारे औद्योगिकीकरण आणि प्रदूषण यामुळे •➤पान २ वर

> नवीन पनवेल येथील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालयात फेब्रुवारी महिन्यात बटरफ्लाय गार्डन उभारण्यात आले आहे. या उद्यानामुळे विद्यार्थ्यांना फुलपाखरांचे जीवनचक्र आणि त्यांचे पर्यावरणातील महत्त्व समजण्यास मदत होत आहे. या उपक्रमातून मुलांमध्ये लहान वयातच पर्यावरण आणि जैवविविधतेविषयी निस्सीम प्रेम निर्माण होईल. - शशिकांत कुपटे, शिक्षक

पोलीस हुतात्म्यांच्या स्मृतींना अभिवादन

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

रायगड पोलिसांच्यावतीने बुधवारी (दि.२१) अलिबागमधील मुख्यालयाच्या मैदानात ६७वा पोलीस स्मृती दिन साजरा करण्यात आला. यावेळी पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या हस्ते पुष्पचक्र अर्पण करून पोलीस हुतात्म्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. दरम्यान, शहीद जवानांना शोक सलामी देण्यात आली.

यावेळी शहीद पोलीस जवानांच्या त्यागाचे व कर्तव्यनिष्ठेचे स्मरण करून हुतात्म्यांप्रती उपस्थित पोलीस अधिकारी व अंमलदारांनी आदरभाव व्यक्त केला. यावेळी राखीव पोलीस निरीक्षक विजय बाविस्कर, राखीव पोलीस उपनिरीक्षक स्वप्नील सावंत, अमोल गंगधर, बँड पथक व १७५हून अधिक अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



लडाखमधील हॉट स्प्रींग्ज येथे दि.२१ ऑक्टोबर १९५९ रोजी हरविलेल्या शोध पथकातील कर्मचाऱ्यांचा शोध सुरु होता. त्यावेळी भारतीय पोलीस पथकावर चिनी सैन्याने गोळीबारासह ग्रेनेडद्वारे हल्ला केला. या सशस्त्र चकमकीत दहा भारतीय पोलीस जवान शहिद झाले. त्यामुळे देशाच्या सीमांचे रक्षण करताना पोलीस जवानांनी दाखवलेल्या अतुलनीय शौर्याची, त्यागाची आणि कर्तव्यनिष्ठेची स्मृती कायम राहवी म्हणून २१ ऑक्टोबर हा दिवस पोलीस स्मृती दिन साजरा करण्याचा निर्णय जानेवारी १९६० मध्ये पोलीस महानिरीक्षकांच्या परिषदेत घेण्यात आला होता. तेव्हापासून २१ ऑक्टोबर हा दिवस देशाची आंतरिक सुरक्षा, कायदा आणि सुव्यवस्था राखताना प्राणांची आहूती देणाऱ्या शुर पोलीस अधिकारी व जवानांच्या बलिदानाचे स्मरण आणि त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी पोलीस स्मृती दिन म्हणून साजरा केला जातो.

उरणमध्ये बिल्डरशाहीचा नंगानाच

। उरण । प्रतिनिधी ।

उरणमध्ये विकासाच्या नावाखाली इमारतींची जंगले उभी राहत आहेत. तसेच, येथील नैसर्गिक नाल्यांवर अतिक्रमण होत असल्याच्या तक्रारी, इमारतींभोवती नियमानुसार मोकळी ठेवायच्या जागेत ड्रेनेजच्या टाक्या उभारल्याचे आरोप आणि या कथित नियमबाह्य बांधकामांकडे नगरपालिका प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. काही नागरिकांनी या प्रकरणात नगरपालिका बांधकाम व्यावसायिकांची पाठराखण करीत असल्याचा आरोप करत न्यायालयात याचिकाही दाखल केली आहे. त्यामुळे आता या प्रकरणात न्यायालय काय निर्णय देते, याकडे उरणकरांचे लक्ष लागले आहे.

नैसर्गिक नाले म्हणजे कोणत्याही विकासकाची खासगी मालमत्ता नव्हे. पावसाचे पाणी वाहून नेणारे नाले बुजवले गेले, त्यांचा प्रवाह अरुंद झाला किंवा त्यावर बांधकामे उभी राहिली, तर त्याचा फटका संपूर्ण शहराला बसू शकतो. पावसाच्या पाण्याचा नैसर्गिक निचरा अडल्यास सखल भागांत पाणी साचणे, रस्ते जलमय होणे आणि नागरिकांच्या घरांमध्ये पाणी शिरण्याचा धोका वाढतो. निसर्गाने पाण्याला दिलेली वाट अडवून सिमेंटचे साम्राज्य उभारले जात असेल, तर उद्या निर्माण होणाऱ्या संकटाची जबाबदारी कोण घेणार? उरणच्या नैसर्गिक नाल्यांची मूळ हद्द निश्चित करून कथित अतिक्रमणांची प्रत्यक्ष पाहणी करण्याची मागणी त्यामुळे जोर धरत आहे.

इमारतीभोवती नियमानुसार मोकळी जागा ठेवण्याचे निकषही केवळ कागदोपत्री औपचारिकता नाहीत. अग्निशमन दलाला प्रवेश मिळावा, आपत्कालीन परिस्थितीत बचावकार्य करता यावे आणि इमारतीच्या सुरक्षिततेला बाधा येऊ नये, यासाठी या जागेचे महत्त्व आहे. मात्र, काही इमारतींच्या मोकळ्या जागेत ड्रेनेजच्या टाक्या उभारण्यात आल्याच्या तक्रारी आहेत. हे आरोप खरे असतील, तर मंजूर बांधकाम आराखड्याचे पालन झाले आहे का, संबंधित परवानग्या नियमानुसार देण्यात आल्या आहेत का आणि प्रत्यक्ष बांधकामात काही बदल करण्यात आले आहेत का, याची तपासणी होणे आवश्यक आहे. मंजूर नकाशा एक आणि प्रत्यक्ष बांधकाम वेगळे, असा प्रकार आढळल्यास संबंधितांवर कायद्यानुसार कारवाई झाली पाहिजे. दरम्यान, नियमभंग सिद्ध झाल्यास संबंधित विकासकांवर कायद्यानुसार कारवाई करावी आणि प्रशासनाच्या कार्यपद्धतीत निष्काळजीपणा आढळल्यास त्याचीही चौकशी करावी, अशी मागणी स्थानिकांमधून होत आहे. आता या प्रकरणात न्यायालय काय भूमिका घेते, संबंधित बांधकामांबाबत कोणते निर्देश दिले जातात आणि नगरपालिका प्रशासनाला काही स्पष्टीकरण द्यावे लागते का, याकडे उरणकरांचे लक्ष लागले आहे.

आदिवासी तरुणाचा अचानक मृत्यू

। सोगाव । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील सोगाव आदिवासीवाडी येथील संजय पवार (२६) या तरुणाला सोमवारी (दि.१९) मध्यरात्रीच्या सुमारास अचानक चक्कर आली आणि तो बेशुद्ध झाला. त्यानंतर त्याला तातडीने अलिबाग येथील



जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या अपघात विभागात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, येथील उपस्थित वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून त्याला उपचारापूर्वीच मृत घोषित केले. या प्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात सचिन पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

पारंपरिक उत्साहात सोन्याची लूट

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन येथील प्रसिद्ध मेटकर्णी देवीच्या प्रांगणात विजयादशमीनिमित्त पारंपरिक पद्धतीने आपट्याची पाने अर्थात 'सोने' लुटण्याचा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. वर्षानुवर्षांची ही ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरा आजही स्थानिक नागरिकांनी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी तितक्याच आदराने टिकवून ठेवली आहे.

विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर मंगळवारी (दि.२०) सायंकाळच्या सुमारास वाणी आळी येथील मापुस्कर यांच्या निवासस्थानातून मंदिरात खालूबाजाच्या गजरात आपट्याची पाने नेण्यात आली. यावेळी प्रांताधिकारी महेश पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी राजीव सोनावणे, तहसीलदार महेंद्र वाकलेकर, पोलीस निरीक्षक सुरेंद्र



गरड, पोलीस उपनिरीक्षक प्रदीप राठोड, मंडळ अधिकारी कमलाकर गायकवाड, तलाठी मिलिंद पुट्टेवार यांच्यासह शहरातील समाज प्रतिनिधींच्या उपस्थितीत मेटकर्णी देवीची भावपूर्ण पूजा अर्चा करण्यात आली.दरम्यान, मेटकर्णी मंदिराच्या विश्वस्तांनी आणि गावकऱ्यांनी आलेल्या मान्यवरांचे श्रीफळ व पान सुपारी देऊन सत्कार केला. पुरोहित भाऊ जोशी यांनी शास्त्रोक्त पद्धतीने पूजा विधी व आरती पार पाडल्यानंतर मंदिराच्या आवारात ठेवलेली आपट्याची पाने उपस्थित अधिकारी व भाविकांकडून पारंपरिक रीतीने लुटण्यात आली.

१९३८ च्या काळात वाणी आळी येथील स्व. विनायक मापुस्कर यांनी सुरू केलेली ही सार्वजनिक परंपरा त्यांच्या पश्चात अजित मापुस्कर कुटुंबीयांनी आजही अविरत व खंड न पडू देता सुरू ठेवली आहे. मापुस्कर यांच्या निवासस्थानी देव्हाऱ्यात आपट्याची पाने अर्पण करून शेती अवजारांची पूजा करण्यात आली.

थाळी बदलून देण्यावरून वाद

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी।

- **वायशेत येथील चायनीज दुकानातील घटना**
- **अकरा जणांविरोधात गुन्हा दाखल**

दसऱ्याच्या पुर्व संध्येला सोमवारी (दि.१९) रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास वायशेत येथील चायनीजच्या दुकानात वाद झाला. त्यामध्ये दोघांना बेदम मारहाण करण्यात आली. त्यामुळे याप्रकरणी अकरा जणांविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्यामाहितीनुसार,थळ येथील परेश पाटील आणि त्यांचा मित्र विशाल कंटक असे दोघेजण वायशेत येथील चायनीजच्या दुकानात रात्री चायनीज पदार्थ खात होते. त्यावेळी एका थाळीला खराब वास येत होता. ती थाळी बदलून देण्याची मागणी कंटक यांनी केली. त्यावेळी सुरज यादव याने दूसऱ्या टेबलवरील प्रथम ऑर्डर देतो, नंतर थाळी देतो असे सांगितले. यावरून कंटक आणि यादव यांच्यामध्ये शाब्दीक वाद झाले. हा वाद विकोपाला पोहचला आणि एकमेकांना शिवीगाळी करण्यात आली. दरम्यान, चायनीज दुकानातील किचनमधील आचारीसह सुरज यादव याने झारीने परेश आणि विशाल या दोघांना मारहाण केली. त्यानंतर आणखी काही मंडळींनी या दोघांना पुन्हा मारहाण केली. हा वाद तेवढ्यावरत न थांबता, चायनीज सेंटरच्या बाहेर आल्यावरही या दोघांना आठ जणांनी मारहाण करून धमकीदेखील दिली. त्यामध्ये परेश आणि विशाल या दोघांना गंभीर दुखापत झाली.त्यांना उपचारासाठी अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात सुशांत थळे, कल्याण हाके, सुरज यादव आणि इतर आठ असे एकूण अकरा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक किशोर साळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार वरसोलकर करीत आहेत.

रोटरी क्लबतर्फे वैद्यकीय साहित्य

। महाड । प्रतिनिधी ।

रोटरी क्लब ऑफ महाडतर्फे येथील ग्रामीण रुग्णालयाला सुमारे २८ हजार ३०० रुपये किमतीचे अत्यावश्यक वैद्यकीय साहित्य भेट देण्यात आले. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील गोरगरीब आणि गरजू रुग्णांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देणाऱ्या रुग्णालयाच्या कार्याला मोलाचे सहकार्य लाभले आहे. या वैद्यकीय साहित्यामध्ये ५ मिली क्षमतेच्या नीडलसह एक हजार डिस्पोजेबल सिरिंज, १० मिली क्षमतेच्या नीडलसह ३०० डिस्पोजेबल सिरिंज, १०० युरिन बॅग, १०० स्पायनल नीडल आणि ५०० मिली क्षमतेच्या १५० आयव्हीआरएल बाटल्या यांचा समावेश आहे. रुग्णालयातील दैनंदिन उपचारांसाठी तसेच रुग्णसेवेच्या दृष्टीने उपयुक्त ठरणारे हे साहित्य विजयादशमी दिनांक २० ऑक्टोबर रोजी वैद्यकीय साहित्य रोटरी क्लबच्या वतीने रुग्णालय प्रशासनाकडे सुपूर्द करण्यात आले.



पनवेलमध्ये नवरात्रोत्सवाची उत्साहात सांगता

। खांदेश्वर । प्रतिनिधी ।


नऊ दिवस भक्तिभावाने देवीचा जागर, आरती आणि मनोभावे पूजा-अर्चा केल्यानंतर मंगळवारी (दि.२०) देवीच्या विसर्जनाच्या वेळी भाविकांचे डोळे पाणावले होते. भक्तिमय वातावरणात साजऱ्या झालेल्या नवरात्रोत्सवाची सांगता होत असताना 'पुढच्या वर्षी लवकर या' असा जयघोष करीत भाविकांनी देवीला निरोप दिला.

नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांत खांदा कॉलनी परिसरातील विविध मंडळे आणि घरांमध्ये देवीची मनोभावे पूजा करण्यात आली. सकाळ-संध्याकाळ आरती, भजन, कीर्तन आणि धार्मिक कार्यक्रमांमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. नऊ दिवसांच्या या उत्सवात महिला, तरुणाई आणि ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. मंगळवारी विसर्जनाच्या दिवशी खांदा कॉलनी येथील सरोवर परिसरात देवीच्या मूर्तींचे विसर्जन करण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. ढोल-ताशांचा गजर, देवीचा जयघोष आणि भक्तिगीतांच्या वातावरणात भाविक विसर्जनासाठी दाखल होत होते. अनेक भाविकांनी देवीची शेवटची आरती करून कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. यावेळी देवीला निरोप देताना अनेक महिला आणि भाविक भावुक झाले होते. नऊ दिवस घरात आणि मंडपात विराजमान झालेल्या देवीच्या निरोपाने भक्तांच्या मनात हुरहूर निर्माण झाली. श्रद्धा, भक्ती आणि उत्साहाच्या संगमातून नवरात्रोत्सवाची सांगता झाली.

दसऱ्याच्या मुहूर्तावर दसरा गणेशोत्सव

। चिरनेर । प्रतिनिधी ।

साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानल्या जाणाऱ्या दसऱ्याच्या मुहूर्तावर २००८ पासून चिरनेर कातळपाडा येथील गणराज मित्र मंडळ सार्वजनिक दसरा गणेशोत्सव मोठ्या भक्तीमय व उत्साही वातावरणात साजरा करत आहेत. यंदा हे मंडळ १९ व्या वर्षात पदार्पण करत आहे. या उत्सवाच्या माध्यमातून समाजात एकोपा, बंधुभाव व सामाजिक व सांस्कृतिक परंपरांचे जतन करण्याच्या उद्देशाने, मंडळाचे पदाधिकारी पंकज गोंधळी, समाधान म्हात्रे, सुरज पाटील, नामदेव भगत, समीर गोंधळी, अनिरुद्ध नारंगीकर, अनिकेत गोंधळी, नितेश सिंह, विक्रांत भगत, भालचंद्र येलमकर, प्रयास पाटील, प्रतीक पाटील, मयूर ठाकूर, राहुल म्हात्रे, आशिष भगत, रोहन गोंधळी, विनोद बैकर, जिया गोंधळी, सोहम परदेशी, गणेश मेस्त्री, तसेच अन्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शनाखाली या दसरा गणेशोत्सवाची निर्मिती



करण्यात आली आहे. भक्ती, श्रद्धा व परंपरांचा जागर या गणेशोत्सवातून होत असून, दसऱ्याच्या मुहूर्तावर साजऱ्या होत असलेल्या दसरा गणेशोत्सवात दसऱ्याच्या दिवशी सायंकाळी आपट्याची पानं देवाला अर्पण करून, त्यानंतर नातेवाईकांसह परिचितांना देऊन ''सोनं घ्या, सोन्यासारखे रहा'' हा संदेश देऊन, हे मंडळ आपली हिंदू परंपरा जोपासत आहे. दरम्यान, हा दसरा गणेशोत्सव २० ऑक्टोबर पासून सुरू झाला असून, तो २७ ऑक्टोबर पर्यंत चालणार आहे.

पान १ वरुन

बारावीच्या विद्यार्थ्यांना दिलासा

बारावीच्या बोर्ड परीक्षेनंतर आयोजित केल्या जाणार आहेत. विद्यार्थ्यांना पहिल्या परीक्षेनंतर दुसऱ्या परीक्षेची तयारी करता यावी, यासाठी दोन्ही परीक्षांमध्ये चार आठवड्यांचे अंतर ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अभ्यासाचे नियोजन करण्यासाठी आणि परीक्षेची तयारी करण्यासाठी अधिक वेळ मिळणार आहे.

धाविर महाराजांना सशस्त्र मानवंदना

अदिती तटकरे, खासदार सुनिल तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अभिजित शिवतारे, देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. प्रशांत देशमुख, कार्यवाह मकरंद बारटक्के, उत्सव समितीचे अध्यक्ष कुमार पाशिलकर, सरचिटणीस दर्शन कदम, प्रांत अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड, तहसीलदार किशोर देशमुख, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, नगराध्यक्ष वनश्री शेडगे, विश्वस्त नितिन परब, विजय मोरे आदींसह ट्रस्ट आणि उत्सव समितीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शहरातील ठरलेल्या मार्गावर विविध ठिकाणी ग्रामस्तांना दर्शन देत ही पालखी दुसऱ्या दिवशी सकाळी मंदीरात परतते. यावेळी पून्हा महाराजांना पोलीस मनवंदना देण्यात येते. या पालखीच्या स्वागतासाठी शहरात ठीकठीकाणी फुलांनी आणि सडारांगोळ्यांनी बहरलेले रस्ते आणी विशेष करून रात्रीच्या वेळी करण्यात येत असलेली रोषनाई या सोहळ्याला एक वेगळे रूप प्राप्त करून देत आहे. रोह्यात पालखीच्या दर्शनासाीाठी येणाऱ्या भाविकांसाठी जैन संघटना, रोटरी क्लब, प्रकाश जैन इत्यादी विविध सामाजिक मंडळांमार्फत शहरात ठिकठिकाणी थंडपेये, चहा आणि अल्पपोहाराची व्यवस्था करण्यात आली. तसेच, येथील अशिर्वाद मंडळातर्फे भाविकांसाठी गेली अनेक वर्षे सुरू असलेली मोफत भोजन व्यवस्था यावेळी करण्यात आली होती.

आज पावसाची शक्यता

जारी केला आहे. गुरुवारी (दि.२२) जिल्ह्यातील अनेक भागांत मध्यम व हलक्या स्वरुपात पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता आहे. काही भागांमध्ये वाऱ्यासह जोरदार पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. गुरुवारी पाऊस पडल्याने हवेत गारवा निर्माण होऊन पावसाअभावी कमी होत चाललेली पाण्याची पातळी पुन्हा वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे पाण्याची समस्या भेडसावण्याचा सुटणार असल्याचे बोलले जात आहे.

कर्जतमधील १२३ नळपाणी योजना बंद

मिशन अंतर्गत सर्व अपूर्ण योजना तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले. कंत्राटदारांच्या अडचणी दूर करण्यासाठी येत्या दोन दिवसांत बैठक बोलावून कामाची प्रत्यक्ष पाहणी स्वतः करणार असल्याचे आमदार थोरवे यांनी स्पष्ट केले. दर १० दिवसांनी टंचाई निवारण कामांचा आढावा घेण्याचे आदेश त्यांनी तहसीलदारांना दिले आहेत. परंतु, आज कर्जत तालुक्यातील १२३ नळपाणी बंद आहेत. त्यामुळे नदी-नाले कोरडे होत असताना वनराई बंधारे बांधून पुढील ६ महिन्यांच्या पाणी संकटावर ही मलमपट्टी यशस्वी ठरेल का, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

तसेच, पशुधनासाठी चारा उपलब्धतेचा प्रश्नही बैठकीत महत्त्वाचा ठरला. मका बियाण्यांची उपलब्धता, चारा उत्पादन वाढविण्यासाठी उपाययोजना आणि आगामी टंचाईच्या काळात जनावरांना चारा उपलब्ध होईल, यासाठी नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तालुक्यातील भूगर्भातील पाणीपातळी खालावत असल्याने लोकसहभागातून वनराई बंधारे उभारणे, अपूर्ण बंधाऱ्यांची कामे तातडीने पूर्ण करणे, गाळ काढणे आणि जलसंधारणाच्या माध्यमातून पाणीसाठा वाढविण्यावर भर देण्यात आला.

मोहितेंच्या कारभाराचा संशयास्पद अध्याय

प्रसिद्ध झाल्याने संबंधित सातबारा उताऱ्याच्या इतर हक्कांत भूसंपादनाचा शेरा नोंदविण्यात आला होता. त्यानंतर फेरफार क्रमांक ८८७७, दि. २२ जून २०१० अन्वये मुंबई सेझच्या नावे संमती निवाडे झाल्यामुळे संपादन संस्थेचे नाव कब्जेदार सदरी दाखल करण्याची आणि इतर नावे कमी करण्याची नोंद प्रस्तावित करण्यात आली. या नोंदीत सर्व्हे क्रमांक २३६/६ चा समावेश होता. मात्र, तत्कालीन तलाठ्याने संबंधित गाव नमुना सातबारावर या नोंदीची अंमलबजावणी केली नसल्याचे तक्रारीत नमूद आहे. त्यानंतर फेरफार क्रमांक ९९०५, दि.४ ऑक्टोबर २०१९ रोजी सर्व्हे क्रमांक २३६/६ संदर्भातील भूसंपादन अधिकारी यांच्याकडील संमती निवाडा क्रमांक ७/२००९ च्या आधारे खरेदीखताची नोंद नामंजूर करण्यात आल्याचे सांगण्यात येते. पुढे ४ मे २०२० रोजीच्या फेरफार क्रमांक १०००० मध्ये भूसंपादन अधिकारी, मेट्रो सेंटर उरण-१ यांच्या पत्रानुसार संबंधित जमिनींबाबत संमती निवाडे झाल्याने सातबारा उताऱ्याच्या इतर हक्कांत नोंद करण्यात आली, तर काही जमिनींच्या कब्जेदार सदरी भूसंपादन संस्थेचे नाव दाखल करण्यात आले. त्यानंतर २९ डिसेंबर २०२१ रोजीच्या फेरफार क्रमांक १०३७५ मध्ये तहसीलदार उरण यांच्या पत्रानुसार तत्कालीन तलाठी के.डी. मोहिते आणि मंडळ अधिकारी चंद्रकांत पाटील यांनी इतर हक्कांमध्ये संमती निवाड्याचा शेरा नोंदविल्याचे तक्रारीत म्हटले आहे. मात्र, या प्रकरणातील सर्वाधिक गंभीर मुद्दा फेरफार क्रमांक १०३८३, दि. ६ जानेवारी २०२२ हा आहे. फेरफार क्रमांक ९९०५ मध्ये जी खरेदीखताची नोंद पूर्वी नामंजूर करण्यात आली होती, तीच नोंद पुन्हा घेऊन मंजूर करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. भूसंपादनाचा शेरा कमी करण्याची प्रक्रिया नेमकी कोणत्या आधारे करण्यात आली आणि आधी नामंजूर झालेल्या नोंदीला पुन्हा मंजुरी कशी मिळाली याची चौकशी व्हावी, अशी मागणी अनिल वाघमारे यांनी केली आहे. दरम्यान, या तक्रारदारांनी उपस्थित केलेले मुद्यांच्या आधारे सविस्तर चौकशी करून सर्व कागदपत्रे तपासून चुकीचे काही असल्यास कारवाई करु, असे उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांनी सांगितले आहे.

रायगडात फुलपाखरांची रंगीबेरंगी दुनिया

वनस्पती नष्ट होऊन फुलपाखरांच्या अळ्या व सुरवंटांचा अधिवास धोक्यात येत आहे, असा इशारा अभ्यासकांनी दिला आहे. माणगाव येथील प्राणी-पक्षी व फुलपाखरू अभ्यासक शंतनू कुवेस्कर यांनी सांगितले की, जिल्ह्यात निसर्गसंपदा आणि सुरक्षित पर्यावरण आहे. घराच्या अंगणात पपई, पेरूसारखी फळे किंवा सडका बांगडा मासा ठेवूनही फुलपाखरांना आकर्षित करता येते जगात १७,५००, भारतात १५०० आणि महाराष्ट्रात ३४५ फुलपाखरांच्या जाती आहेत. त्यातील १४७ प्रजाती एकट्या रायगडात आहेत. यात गुलाबी राणी, पितांबरी, सांजपरी, हळदीकुंकू, नील भिरभिरी, मयूर भिरभिरी व शुष्क पर्ण यांचा समावेश आहे. परंतु, तणनाशकांचा वापर फुलपाखरांसाठी घातक ठरत आहे. असे अलिबाग येथील निसर्ग, फुलपाखरू, प्राणी व पक्षी अभ्यासक प्रवीण कवळे यांनी सांगितले.

तर वनक्षेत्रपाल समीर शिंदे म्हणाले की फुलपाखरे परागीकरणात मोठी मदत करतात. त्यामुळे जैवविविधता टिकवण्यासाठी त्यांच्या कांदळवनातील व जंगलातील अधिवासाचे संवर्धन करणे गरजेचे आहे.

नेते एकत्र, कार्यकर्त्यांचे काय?

तक्रारी आणि कायदेशीर लढ्यांमुळे काहींच्या वैयक्तिक आयुष्यावरही परिणाम होऊ शकतो. अशा परिस्थितीत नेत्यांनी विकासासाठी हातमिळवणी केल्यानंतर कार्यकर्त्यांमधील जुने वाद मिटवण्यासाठी संवाद साधला जाणार का, हा प्रश्न अनुत्तरित आहे.

राजकीय संघर्षादरम्यान काही कार्यकर्त्यांना हात-पाय तोडण्याच्या तसेच जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याचे आरोप करण्यात आल्याची चर्चा आहे. काही कार्यकर्त्यांविरोधात गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल झाल्याचेही सांगितले जात आहे. या आरोपांची स्वतंत्र पडताळणी आणि संबंधित प्रकरणांची कायदेशीर स्थिती स्पष्ट होणे आवश्यक आहे. मात्र, या पार्श्वभूमीवर राजकीय नेत्यांनी कार्यकर्त्यांच्या प्रश्नांवर स्पष्ट भूमिका मांडण्याची गरज व्यक्त होत आहे. एकमेकांविरोधात दाखल झालेल्या तक्रारींचे काय होणार? न्यायालयीन प्रक्रियेला सामोरे जाणाऱ्या कार्यकर्त्यांना योग्य मार्गदर्शन मिळणार का? राजकीय मतभेद कमी होत असतील, तर कायद्याच्या चौकटीत राहून जुने वाद सोडवण्यासाठी प्रयत्न केले जाणार का, असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

अपघातात चार युवकांचा मृत्यू

झाला असून त्यात स्कॉर्पिओचा चालक तेजस देशमुख (२५) याच्यासह सागर निंबाळकर (२३), सुयश चिंचकर (२०) आणि रोहित धोत्रे (२१) यांचा समावेश आहे, तर अपघातात ऋतुराज दुबळे (२१), शंतनू शिंगाडे (२०) आणि अमन तांबोळी (२३) हे तिघे जखमी झाले आहेत.

काही महिन्यांत गडबड होणार- राज ठाकरे

आंदोलन सुरू असतानाच रिजीम चेंज करण्याचा विषय पुढे आला. यावरून भाजपा आणि विरोधी पक्षांमध्ये वाद सुरू असताना आता राज ठाकरे यांनी याबाबत मोठे विधान केले आहे. बुधवारी (दि.२१) पत्रकारांशी संवाद साधत असताना त्यांना संजय राऊत यांच्या एका विधानावर प्रश्न विचारला असता ते म्हणाले, पुढील चार-पाच महिन्यांत देशात काहीतरी मोठी गडबड होण्याची शक्यता आहे. ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी केंद्रीय मंत्रिमंडळातील मंत्री हरदीप पुरी यांचा जेफ्री एपस्टीनबरोबरचा एक फोटो एक्सवर शेअर केला. तसेच, लवकरच पंतप्रधान मोदी पायउतार होणार असल्याचे म्हटले आहे. त्यावर राज ठाकरे यांना प्रश्न विचारण्यात आल्यानंतर त्यांनी, पुढील काळात खूप गोष्टी बाहेर येतील. सरकार चुकांवर चुका करत राहणार. आता हे थांबणार नाही. पुढच्या काही महिन्यांत संपूर्ण देश रस्त्यावर आला तरी मला आश्चर्य वाटणार नाही, असेही विधान राज ठाकरे यांनी यावेळी केले.

काही महिन्यांपूर्वी परीक्षेबाबत आंदोलन झाले, आता निवडणूक आयोगाच्या विषयावर आंदोलन सुरू आहे. नीट आंदोलनावेळी जी मुले, विद्यार्थी रस्त्यावर उतरले त्यातील प्रत्येकजण काही विद्यार्थी नव्हता. पण त्यांच्या मनात कुठल्या ना कुठल्या गोष्टीचा राग होता. तो त्या माध्यमातून बाहेर आला. महाराष्ट्रातील आजची परिस्थिती पाहिली तर सरकारनेच ३०० हून अधिक तालुक्यांत दुष्काळ जाहीर केला आहे. पुढे आणखी परिस्थिती खराब होऊ शकते. अन्नधान्याची टंचाई होऊ शकत, असा अंदाज राज ठाकरे यांनी बांधला. तसेच, पुढे आणखी भीषण परिस्थिती येणार असल्याचे सांगताना राज ठाकरे म्हणाले, सरकारला ही परिस्थिती झेपणार नाही. तसेच, असा एक छोटा काळ येईल, जेव्हा या देशाला पंतप्रधानच नसतील, असा मोठा दावाही राज ठाकरे यांनी केला.



खुजारेत साकारला 'वनराई बंधारा'

। बोर्लीपंचतन । प्रतिनिधी ।

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाणी अडवून त्याचा योग्य वापर व्हावा, तसेच वन्यप्राण्यांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध व्हावे, या उद्देशाने श्रीवर्धन तालुक्यातील खुजारे येथे वन विभाग आणि ग्रामस्थांच्या श्रमदानातून वनराई बंधारा उभारण्यात आला. वनपरिक्षेत्र श्रीवर्धन अंतर्गत बोर्ली पंचतन वन परिमंडळात बुधवारी (दि.२१) हा उपक्रम राबविण्यात आला.

वन विभागाच्या नियोजनानुसार आयोजित या उपक्रमात खुजारे गावातील ग्रामस्थ, वन विभागाचे कर्मचारी आणि प्राइड इंडिया या स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी यांनी श्रमदान केले. सर्वांच्या सहभागातून वनराई बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्यात आले. यावेळी श्रीवर्धनचे वनपरिक्षेत्र अधिकारी स्वप्नील चंबुळे, वन परिमंडळ अधिकारी दीपक शिंदे, वनरक्षक तेजस ढेपे, स्वप्नील रासकर, आकाश पोळ, हनुमान कोरडे, वाहनचालक शैलेश कळसकर यांच्यासह वन विभागातील कर्मचारी उपस्थित होते. तसेच, ग्रामपंचायत अधिकारी शंकर मयेकर, पोलीस पाटील दिलीप खेडेकर, शरद खेडेकर, महादेव खेडेकर, आत्माराम काते, आत्माराम महाडिक, आशा सेविका मैथिली मिरगाळ आणि ग्रामस्थांनीही या उपक्रमात सहभाग घेतला.

पावसाचे पाणी वाहून जाण्याऐवजी ते अडवून साठविण्यासाठी वनराई बंधारा उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे पाणी जमिनीत मुरण्यास आणि भूजलपातळी वाढण्यास मदत होईल. तसेच, साठलेल्या पाण्याचा परिसरातील गरजांसाठी वापर करता येईल आणि वन्यप्राण्यांनाही पिण्याच्या पाण्याचा आधार मिळेल.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील हे खालील वर्णनाच्या शेती मिळकती मिळकतींचे विद्यमान मालक श्री.सिद्धार्थ सुरेश नाईक रा.आतोणे ता.सुधागड जि. रायगड यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे - आतोणे, ता. सुधागड, जि. रायगड

गट नं.	क्षेत्र हे. आर	आकार रू.पैसे
६१	०-२८-०	०-०६

वरील शेत मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक यांनी आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : २०/१०/२०२६

सही /-
ॲड. समिर अनंत आंबोलकर
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता.सुधागड, जि.रायगड
मो.नं.९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

निवडक

श्रीवर्धन-दिघी बसमार्गात बदल

श्रीवर्धन : श्रीवर्धन-दिघी बसचा मार्ग बदलून ती सर्वे मार्गे वळविण्यात आल्याने प्रवाशांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. या मार्गबदलामुळे प्रवाशानां अतिरिक्त २५ रुपयांचा भार पडत असून, प्रवासासाठी अधिक वेळही लागत आहे. त्यातच सकाळी ८:३० वाजताची बसफेरी बंद असल्याने प्रवाशांच्या अडचणींत भर पडली आहे. बसस्थानकातून पूर्वी सकाळी ८ वाजता सुटणारी श्रीवर्धन-दिघी ग्रामीण फेरीची बस बंद करून वर्षभरापूर्वी सकाळी ७:३० वाजता श्रीवर्धन-दिघी-वडाळा-मुंबई बस सुरू करण्यात आली होती. मात्र, गेल्या महिन्यापासून या बसचा मार्ग बदलून सर्वे मार्गे दिघी असा करण्यात आला आहे. परिणामी, नियमित प्रवास करणाऱ्या प्रवासी वर्गाला जादा भाडे मोजावे लागत आहे. या मार्गावरील बससेवेवर मुरुड तालुक्यात जाणारे सरकारी व खासगी कर्मचारी, भाजीविक्रेत्या महिला अवलंबून आहेत. सकाळी ६:४५ ते ९:३० या वेळेत पुरेशी बससेवा उपलब्ध नसल्याने कामावर वेळेत पोहोचताना प्रवाशांची दमछाक होत आहे. प्रवाशांच्या गैरसोयीकडे एसटी प्रशासन लक्ष देणार का?असा प्रश्न प्रवाशांकडून उपस्थित होत आहे.प्रशासनाने पूर्वीचा बसमार्ग पुन्हा सुरू करावा आणि सकाळी ८:३० वाजताची बंद फेरी पूर्ववत करावी, अशी मागणी होत आहे.



जय भवानी पतसंस्थेची सामाजिक बांधिलकी

अलिबाग : दसऱ्याचा सण हा आनंद, उत्साह आणि नव्या सुरुवातीचा मानला जातो. मात्र, याच मंगल प्रसंगी 'जय भवानी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अलिबाग' या संस्थेने केवळ व्यवसायापलीकडे जाऊन माणुसकीचे आणि सामाजिक बांधिलकीचे एक अद्भुत उदाहरण अलिबागकरांसमोर ठेवले आहे. संस्थेमध्ये अत्यंत निष्ठेने पिग्मी एजंट म्हणून सेवा बजावणाऱ्या रश्मी शिंदे या सध्या गंभीर आजाराशी झुंज देत आहेत. अशा कठीण प्रसंगात त्यांना आणि त्यांच्या कुटुंबाला एकटे न पाडता, पतसंस्थेने आणि संस्थेचे अध्यक्ष ॲड. मिलिंद चव्हाण यांनी अत्यंत संवेदनशीलतेने मदतीचा हात पुढे केला आहे.आजच्या काळात जिथे व्यावसायिक नाती केवळ नफा-तोट्यापुरती मर्यादित राहतात, तिथे पतसंस्थेने आपल्या सहकाऱ्याला 'आपले कुटुंब' मानून दाखवलेली ही तत्परता मनाला स्पर्श करणारी आहे. आजारपणाच्या या बिकट काळात शिंदे यांच्या वैद्यकीय उपचारांसाठी पतसंस्थेच्या वतीने गीता धर्माधिकारी याच्या हस्ते शिंदे यांचे पती राजेश शिंदे यांच्याकडे मदतीचा चेक सुपूर्द करण्यात आला. कर्मचाऱ्याच्या कठीण काळात तिच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांनी खऱ्या अर्थाने सहकाराचा आणि माणुसकीचा मूलमंत्र जपला आहे. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मिलिंद चव्हाण, उपाध्यक्ष अभय म्हामुणकर, सचिव मंगेश म्हात्रे, गीता धर्माधिकारी, अनिल गोळे, अमित नारे, रोहन चिमणे, सिद्धांत चव्हाण, सुचिता चव्हाण, प्रभाकर गावडे हे सर्व मान्यवर उपस्थित होते.

गॅस तपासणीच्या नावाखाली लूट

चिरनेर : बीपीसीएल घरगुती गॅस धारक ग्राहकांच्या गॅस जोडणीची सुरक्षा मोहीम सुरू आहे. त्यासाठी बीपीसीएल गॅस वितरक व जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांच्या पत्राआधारे वितरकाकडून जी सरसकट लूट सुरू आहे ती तात्काळ थांबवावी. वितरकाने तपासणी शुल्क माफ करावे तसेच ग्राहकांना आधी घरपोच सिलेंडर सेवेचे पालन करावे अशी मागणी चिरनेर गणातील उरण पंचायत समितीच्या सदस्या कविता पाटील यांनी प्रशासनाकडे केली आहे. तसेच ग्राहकांनी तपासणी शुल्क न भरण्याचे आवाहनही बीपीसीएल गॅसधारकांना केले आहे. बीपीसीएल घरगुती गॅस वितरकाकडून गॅस जोडणी सुरक्षा तपासणीची सरसकट २३६ रुपये शुल्क आकारले जात असून रबरी नळी व अन्य उपकरणांसाठीही अतिरिक्त शुल्क सुरू आकारले जात असल्याचे काही ग्राहकांनी पंचायत समिती सदस्य कविता पाटील यांच्या निदर्शनास आणून दिले होते. याबाबत उरण तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांना संपर्क केला असता त्यांनी याबाबत माहिती नसल्याचे उत्तर देत पुरवठा अधिकाऱ्यांशी बोलून घेतो असे सांगितले. भारत पेट्रोलियमचे विक्री अधिकारी राहुलकुमार कन्नोजिया यांना संपर्क करून हे शुल्क ग्राहकांना माफ करावे असे सांगितले. त्यांनी सुरक्षतेची ही तपासणी दर पाच वर्षात एकदा होते जी अनिर्वाय आहे. शुल्क माफी करण्याबद्दलची आपली विनंती पेट्रोलियम मंत्रालयाला निश्चित कळवू असे सांगितले. तर ॲड. पर्जन्य म्हात्रे, कोप्रोली ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच नीरज पाटील, विपुल म्हात्रे,सामाजिक कार्यकर्ते निलेश म्हात्रे यांनी तपासणी पथकाला विरोध दर्शविला शुल्क भरू नये असे आवाहन केले आहे.



माथेरानमध्ये बिबट्याच्या पिल्लांचा संचार

| नेरळ | प्रतिनिधी |

पर्यटननगरी माथेरानमध्ये पुन्हा एकदा बिबट्याची दहशत पाहायला मिळत आहे. माथेरान जंगल भागात वनसंपदा वाढली आहे, त्यामुळे बिबट्याचे प्रमाण वाढले असल्याचे दिसून येते आहे. मागील काही दिवस सातत्याने बिबट्याचे दर्शन घडत असून दिवसा देखील बिबट्याचे दर्शन होत असल्याने काहीसे भीतीचे वातावरण पसरले आहे.दरम्यान माथेरानमध्ये दर्शन होत असलेले दोन लहान पिल्लेअसल्याचे वन विभागाकडून सांगण्यात येत आहे.

माथेरान या जंगलाने व्यापलेल्या भागात बिबट्याचे प्रमाण वाढले असल्याचे त्याच्या वास्तव्याने स्पष्ट होत आहे. मागील काही दिवस सातत्याने बिबटे आपले दर्शन देत आहेत. प्रामुख्याने वन ट्री हिल परिसर आणि अमन लॉज स्टेशन परिसरात बिबट्याचे वास्तव्य असल्याचे त्याच्या दर्शनाने स्पष्ट होत आहे.



मागील काही दिवसात अमन लॉज स्टेशन परिसरात टॅक्सी स्टँड, अमन लॉज बंगला तसेच बेकरा रोड आदी परिसरात प्रामुख्याने रात्रीच्या वेळी बिबट्याने दर्शन झाले असून तो बिबट्या बछडा असल्याचे वन विभागाकडून सांगितले जात आहे.

माथेरान शहरातील वन ट्री हिल परिसरात मागील काही दिवस सातत्याने बिबट्याचा बछडा दिसत आहे.या भागातील कॅसल रोड, कॉन्व्हेन्ट स्कूल,शारदा व्हिला या भागात बिबट्याचे दर्शन झाले आहे. अनेक ठिकाणी बिबट्याचे रात्रीचे वेळी दर्शन झाले आहे,पण या भागातून नगरपरिषदेची रुग्णवाहिका जात असताना बिबट्या दिवसा देखील नजरेस पडल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यात या भागात माथेरानमधील दोन शाळा आहेत आणि त्या शाळांमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे पालक घाबरले आहेत.

- वन ट्री हिल, अमन लॉज परिसरात दर्शन
- नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

> आम्ही सातत्याने बिबट्याचे हालचालीवर लक्ष ठेवून आहोत. सध्या नजरेस पडत असलेले बिबटे हे पिल्ले असून ती दोन पिल्ले असल्याचे दिसून येत आहे. साधारण एक वर्षे वयाचे ती पिल्ले असावेत असे दिसून आले आहे. मात्र, मादी बिबट्याचे दर्शन झाले नसल्याने त्याचा माग वन विभाग काढत आहे.
> - आर बी गायकवाड

> शहरात ज्या दोन ठिकाणी शाळा आहेत, त्या भागात आता दिवसा देखील बिबट्याचे दर्शन झाल्याने पालक वर्गाचे वतीने प्रामुख्याने ई-रिक्षा यांची व्यवस्था विद्यार्थ्यांसाठी कायम ठेवावी आणि विद्यार्थ्यांची काळजी घ्यावी अशी सूचना आहे.
> - कल्पना पाटील
> माजी मुख्याध्यापिका

स्मशानभूमीच्या छतावर चढलेल्या व्यक्तीची सुटका

पनवेल : ओवळा सेक्टर १ येथील डोंबाळा कॉलेज परिसरातील स्मशानभूमीच्या छतावर चढलेल्या व्यक्तीची पनवेल शहर पोलीस आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी सुखरूप सुटका केली. या घटनेमुळे परिसरात काही काळ चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. स्मशानभूमीच्या छतावर एक व्यक्ती चढल्याचे निदर्शनास आल्यानंतर नागरिकांनी पोलिसांना माहिती दिली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पनवेल शहर पोलीस आणि अग्निशमन दलाचे जवान तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी योग्य खबरदारी घेत समन्वयाने बचावकार्य सुरू केले. अथक प्रयत्नांनंतर संबंधित व्यक्तीला सुरक्षितपणे खाली उतरवण्यात यश आले. त्यामुळे संभाव्य दुर्घटना टळली आहे.

रिलायन्स प्रकल्पग्रस्तांचा आंदोलनाचा इशारा

| नागोठणे | प्रतिनिधी |

नागोठण्यातील रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड नागोठणे मॅन्युफॅक्चरिंग डिव्हिजन (पूर्वीची आयपीसीएल) या कंपनीमध्ये बाधित झालेल्या उर्वरित ३२४ प्रकल्पग्रस्त प्राधान्य प्रमाणपत्रधारकांना कायमस्वरूपी नोकरीत घेण्यात यावे असे आदेश महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २४ जून, २०२५ रोजी मंत्रालयात संपन्न झालेल्या बैठकीत देण्यात आले होते, असे असतानाही रिलायन्स व्यवस्थापन प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घेण्यास टाळाटाळ करीत असल्याने संतप्त झालेल्या प्रकल्पग्रस्तांनी रिलायन्स कंपनीच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर पुन्हा एकदा आंदोलन छेडण्याचा इशारा एका निवेदनाद्वारे दिला आहे. या निवेदनाच्या प्रती रिलायन्स व्यवस्थापन व सर्व शासकीय यंत्रणांना पाठविण्यात आल्या आहेत.



परंतू महाराष्ट्र राज्याच्या मुख्य सचिवांच्या आदेशाचे पालन रिलायन्स कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी न केल्याने व प्रकल्पग्रस्त यांना नोकरीत घेण्यास चाल ढकल करून, आडमुठे धोरण आणि फसवणूक करीत असल्याने रिलायन्स नागोठणे कंपनीने प्रकल्पग्रस्तांना कायमस्वरूपी नोकरीत घेण्यासंदर्भात त्वरीत बैठक घेण्यात यावी, अन्यथा सर्व प्रकल्पग्रस्त प्राधान्य प्रमाणपत्रधारक हे रिलायन्स नागोठणे कंपनी गेटवर कधीही केव्हाही आंदोलन करणार याची नोंद घ्यावी व प्रकल्पग्रस्त प्राधान्य प्रमाणपत्रधारकांचे काही बरेवाईट झाल्यास, त्यास शासकीय यंत्रणा आणि रिलायन्स प्रशासन जबाबदार असेल असा इशारा प्रकल्पग्रस्तांनी दिला आहे.



श्रीकृष्ण सांस्कृतिक मंडळातर्फे विजयादशमीनिमित्त अलिबागमध्ये रावण दहनाचा थरार पाहण्यासाठी नागरिकांनी प्रचंड गर्दी केली होती. (छायाचित्र : समीर मालोदे)

अलिबागमधील डॉ. चंद्रशेखर साठ्ये ठरले देवदूत

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

वैद्यकीय क्षेत्रात वेगळे स्थान निर्माण करणारे अलिबागमधील डॉ.चंद्रशेखर साठ्ये यांनी वृध्द प्रवाशाचे प्राण वाचविले आहेत. पॅरिसहून मुंबई असा विमानातून प्रवास होत असताना साडेतीन हजार फुट उंचीवरील विमानात बेशुध्द पडलेल्या रुग्णावर मर्यादीत वैद्यकीय साधनांच्या मदतीने उपचार करून जीवनदान दिले. डॉ. साठ्ये त्या रुग्णासाठी देवदूत ठरले असून वैद्यकिय सेवेसाठी देऊ केलेली आर्थिक मदतदेखील डॉक्टरांनी नाकारली. त्यांच्या या सेवेमुळे माणुसकीचे दर्शन प्राप्त झाले. वैद्यकीय कौशल्य, समयसुचकता आणि मर्यादीत वैद्यकीय साधनांचा अचूक वापर करून डॉ. साठ्ये यांनी वैद्यकीय सेवेतून मदतीचा हात दिला. अलिबागमधील डॉ. चंद्रशेखर साठ्ये हे वैद्यकिय क्षेत्रात गेल्या २८ वर्षापासून कार्यरत आहे. अस्थिरोग तज्ञ म्हणून प्रसिध्द आहेत. त्यांनी वैद्यकिय क्षेत्रामध्ये स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.

डॉ. साठ्ये हे सात ऑक्टोबरला अमेरीका दौऱ्यावर होते. न्यूयॉर्कवरून ते पॅरीसला पोहोचले होते.

मात्र, पॅरीसवरून मुंबईला येणारे कनेक्टीग फ्लाईट चुकल्याने, त्यांना एक दिवस पॅरीसमध्ये रहावे लागले. त्यामुळे दुसऱ्या दिवशी पॅरीसवरून मुंबईला येणाऱ्या विमानात त्यांना तिकीट देण्यात आले. डॉ. साठ्ये पॅरीसहून एअर फ्रान्सच्या (एफ) विमानाने मुंबईला येत होते. परतीच्या प्रवासात असतांना उड्डाण केल्यानंतर काही वेळाने विमान ३५ हजार फुट उंचीवर पोहचले. दरम्यान, सुमारे चार तासांनी विमानातील एका ७५ वर्षीय वृध्दाची प्रकृती अचानक बिघडली. ते बेशुध्द अवस्थेत आसनावर पडून होते. ही बाब विमानात असलेले डॉ. साठ्ये यांच्या निदर्शनास आली. क्षणाचाही विलंब न करता ते वृध्दाच्या मदतीसाठी धावून गेले.

बेशुध्द अवस्थेत असलेले वयोवृध्द कुठलाही प्रतिसाद देत नव्हते. रक्तदाब कमी होत चालला होता. त्यामुळे परिस्थिती अतिशय गंभीर होती. विमानातील मर्यादीत साधनांच्या मदतीने त्यांच्यावर उपचार सुरु केले. त्यानंतर काही वेळातच व्यक्ती शुध्दीवर आले. नंतर तासाभराने त्यांना पुन्हा त्रास होऊ लागला.

डॉक्टरांनी पुन्हा उपचार केल्यावर वृध्द व्यक्तीची प्रकृती स्थीर झाली. त्यानंतर मुंबईत विमान पोहोचण्याच्या तयारीत असतांना वृध्द व्यक्तीची परत, प्रकृती खालावली. विमानातील कीटमध्ये उपलब्ध औषधांचा वापर करून डॉक्टरांनी वृध्दाचे प्राण वाचवण्यात मदत केली. मुंबई विमानतळावर उतरल्यावर त्यांना विमानतळावरील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या स्वाधीन केले. त्यामुळे डॉ. साठ्ये हे वयोवृध्द प्रवाशांसाठी देवदूत ठरले. डॉ. साठ्ये यांच्या सेवाभावी वृत्तीचे कौतुक होत आहे.

- डॉक्टरांनी वाचवले वृध्द प्रवाशाचे प्राण
- अस्थिरोग तज्ञ म्हणून स्वतःची ओळख





नातेवाईकांकडून आभार

पॅरीसहून मुंबईला निघालेले प्रवासी हे मुंबईतील रहिवासी असून ते कफ परेड येथे राहत आहते. त्या वृध्द व्यक्तीच्या मदतीचा वेळीच धावून गेल्यामुळे त्यांचा जीव वाचला. डॉ. साठ्ये यांचे नातेवाईकांकडून आभार मानले.

पनवेलकरांवर पाणीटंचाईचे संकट

नवीन पनवेल : चालू वर्षी पाऊस कमी झाल्याने राज्यात शासनाच्या आदेशानुसार पाणीकपात लागू केली आहे. सध्या ऑक्टोबर महिन्यात मोठ्या प्रमाणात हिट जाणवत आहे. भात शेतीला देखील पावसाची आवश्यकता आहे. भाताचे दाणे वाढीसाठी शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत आहे. ग्रामीण भागात काही ठिकाणी जलजीवन मिशनद्वारे पिण्याचे पाणी पोचवले जाते तर काही ठिकाणी जिल्हा परिषद आणि इतर ठिकाणाहून पाण्याची व्यवस्था केली जाते. काही गावांमध्ये आजही पाण्याची उधळपट्टी सुरू आहे. मोठ्या प्रमाणात पाणी रस्त्यावर वाहून जाते. ग्रामपंचायतद्वारे पाणीपुरवठा केला जाणाऱ्या लाईनला इलेक्ट्रिक मोटर लावल्या जात असल्याने काही घरांना लवकर पाणी मिळते तर ज्यांनी मोटर लावलेली नाही त्या घरांना थोडेसे पाणी मिळते. यावर्षी पावसाने महिना भरापासून दडी मारली असल्याने ग्रामीण भागात ग्रामपंचायतला पाण्याचे योग्य नियोजन करावे लागणार आहे. दिवसाआड पाणी सोडल्यास पाणीटंचाईचा कमी सामना करावा लागणार असल्याचे बोलले जात आहे.

केबलची चोरी

रसायनी : पोलीस ठाण्याच्या हद्दीतीलपाताळगंगाएमआयडीसी परिसरात केबल चोरीची घटना घडली आहे. अज्ञात इसमाने ४८ हजार रुपये किमतीची केबल चोरून नेली. संबंधित फिर्यादी यांच्या संमतीशिवाय, लबाडीच्या हेतूने आणि स्वतः च्या फायद्यासाठी ही केबल चोरी करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पो.ह खंडागळे करीत आहेत.



तीन विद्यार्थ्यांची 'इस्रो भेटीसाठी निवड **जिल्हा परिषद शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा**

हटाळेच्या विद्यार्थ्यांचा रायगडात डंका

| अलिबाग | प्रतिनिधी |

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला विज्ञानाची जोड, जिद्दीला आधुनिक तंत्रज्ञानाची साथ आणि स्वप्नांना योग्य मार्गदर्शन मिळाले, तर हे विद्यार्थीही अंतराळाला गवसणी घालू शकतात, याचा प्रत्यय राजिप शाळा हटाळे येथील विद्यार्थ्यांनी घडवून आणला आहे. अलिबाग तालुक्यातील नागाव केंद्रांतर्गत असलेल्या राजिप उच्च प्राथमिक शाळा, हटाळे येथील तीन विद्यार्थ्यांची भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात 'इस्रो'च्या श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्राला भेट देण्यासाठी निवड झाली आहे. या ऐतिहासिक यशामुळे हटाळे शाळेच्या शैक्षणिक वाटचालीत नवा अध्याय जोडला गेला असून, जिल्ह्यातील राजिप शाळांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम इंटरनॅशनल फाऊंडेशन, रामेश्वरम यांच्या वतीने पुणे येथे आयोजित 'कलाम स्टीम २०२६' या उपक्रमात शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

या उपक्रमातील विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाची दखल घेत शाळेतील तीन गुणवंत विद्यार्थ्यांना इस्रो भेटीची संधी प्राप्त झाली. त्यात नवनाथ भगत, दक्ष नाईक, विराज दिवटे या विद्यार्थ्यांची निवड झाली. या विद्यार्थ्यांच्या यशामुळे नागाव परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या वैज्ञानिक संस्थेची प्रत्यक्ष भेट घेण्याची संधी मिळणे, ही त्यांच्या शैक्षणिक आयुष्यातील अत्यंत प्रेरणादायी घटना ठरणार आहे.

शाळेचे मुख्याध्यापक वारगे यांच्या विज्ञाननिष्ठ, प्रयोगशील आणि विद्यार्थी-केंद्रित दृष्टिकोनामुळे हटाळे शाळेने वेगळी ओळख निर्माण केली आहे. विद्यार्थ्यांचे पालक संतोष नाईक, महेंद्र भगत, संजय दिवटे, सीमा नागावकर, विजया माळी यांच्या योगदानाचेही कौतुक होत आहे. पंचायत समितीचे ग.शि कृष्णा पिंगळा, शिक्षकवर्गाने विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

गोकुळची चोरी थांबवली

गोकुळ ही वास्तविक, म्हटले तर एका जिल्हा दूध संघाची निवडणूक. पण यंदा ती राज्यभर गाजली. आणि याला सर्वस्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे नेते आणि बाकी सर्व महायुतीवाले जबाबदार होते. काँग्रेसचे सतेज पाटील यांना एकटे पाडून महायुती विरुध्द काँग्रेस असा रंग तिला द्यायचा आणि काँग्रेस अगदी कोल्हापुरातही कशी खलास झाली आहे हे दाखवायचे असा यातला एक हेतू होता. पण हे सर्व राजकारण महायुतीवरच उलटवण्यात सतेज पाटील यांना यश आले. गोकुळच्या मतदारांनी त्यांना साथ दिली. आम्ही २५ विरुध्द शून्य असे जिंकून येऊ, आता फक्त गुलाल उधळायचाच बाकी आहे अशी वक्तव्ये राष्ट्रवादीचे हसन मुश्रीफ आणि भाजपचे चंद्रकांत पाटील या दोन मंत्र्यांनी केली होती. ते चांगलेच तोंडावर आपटले. अर्थात, सतेज पाटील यांनाही २५ पैकी १३ असे निसटते बहुमतच मिळाले आहे. भाजपचा आजवरचा लौकिक पाहता निवडणुकीत हरले तरी नंतर फोडाफोडी करून सत्ता मिळवायचे कारस्थान रचले जाऊ शकते. सतेज पाटलांना त्याबाबत सावध राहावे लागेल. आता संचालक मंडळाची निवडणूक झाली. कारभारी मंडळ आणि अध्यक्ष वगैरेंच्या निवडी हा पुढचा टप्पा असेल. तिथे सतेज पाटलांच्या गटातच फूट पाडण्याचे पुरेपूर प्रयत्न होतील. तेवढेही करून जमले नाहीच तर नंतर गोकुळच्या कारभाराच्या चौकशा लावणे वगैरे प्रकारही होऊ शकतील. काल दसऱ्याला मोहन भागवत तिकडे नागपुरात सदाचार वगैरे गोष्टी बोलत होते. त्या भाजपच्या नेत्यांना लागू होत नाहीत. काय वाट्टेल ते करून आपलीच सत्ता आली पाहिजे हा त्यांचा बाणा आहे. त्यामुळे सतेज पाटील यांनी पहिली फेरी जिंकली असली तरी त्यांना इथून पुढे सावध राहावे लागेल. म्हणूनच बहुदा त्यांनी आता निवडणूक संपली, सर्व साडेचार हजार सभासद आमचे आहेत, सर्वांना बरोबर घेऊन काम करायचे आहे असे म्हटले आहे. मुश्रीफ व बाकीच्या नेत्यांना इतके तोंड फुटल्यानंतर तरी आता जाग यावी व त्यांनी आता राजकारण करणे थांबवावे.

गुजराती डाव उधळला

गोकुळ ही १९६३ साली स्थापन झालेली संस्था आहे. तिच्या दूध, तूप वगैरे उत्पादनांमुळे ती राज्यात व बाहेरही प्रसिध्द आहे. पाच हजार कोटींची वार्षिक उलाढाल असलेल्या या संस्थेचा स्थानिक पसारा मोठा आहे. गावागावांमधील सुमारे साडेआठ हजार केंद्रांवर याचे दूध संकलन होते. सुमारे पाच लाख लोक शेतकरी, वाहतूकदार, कामगार, विक्रेते अशा रुपाने गोकुळ दूध संघाशी जोडले गेले आहेत. दर दहा दिवसांनी दूध उत्पादकांना पैसे द्यायचे असे संघाचे धोरण आहे. यामध्ये बहुसंख्य महिला आहेत. त्यांच्या खात्यात मिळून महिन्याला तीन वेळा असे मिळून सुमारे तीनशे कोटी रुपये जमा होत असतात. म्हणजे तेवढ्या प्रमाणात हा पैसा खेळता राहत असतो. त्यातूनच जिल्ह्याची समृध्दी आलेली आहे. साखर कारखान्यांचे पैसे मिळायला ऊस शेतकऱ्यांना वाट पाहावी लागते. आंदोलने करावी लागतात. ऊसाचा दरही पुरेसा नसतो. दूधाच्या बाबतीत दराची थोडी अडचण असली तरी वेळच्या वेळी पैसे मिळणे ही मोठी उपलब्धी आहे. गोकुळ संघाच्या बाकी व्यवहारांत भ्रष्टाचाराचे बरेच आरोप झाले असले तरी शेतकऱ्यांचे पैसे देण्याबाबत कधी गडबड झालेली नाही. किंबहुना पश्चिम महाराष्ट्रातले वारणा, कृष्णा, गोकुळ असे मोजकेच संघ अजूनही पाय रोवून उभे आहेत. भाजप सरकारला या संघांना नेस्तनाबूत करायचे आहे. त्यात त्यांचा दुहेरी हेतू आहे. एक म्हणजे यांच्यावर अमूल या गुजरातमधील कंपनीची सत्ता बसवायची आहे. अमूलचा कारभार अवाढव्य आहे. तो गोकुळसारखे पाच काय २५ संघही गिळंकृत करू शकतो. नव्हे, त्याच दिशेने भाजपवाल्यांना जायचे आहे. कर्नाटक सरकारचा नंदिनी हा ब्रँड ताब्यात घेण्याचा असाच प्रयत्न यापूर्वी झाला. त्यामुळे तेथे संतापाची लाट उसळली. गेल्या विधानसभा निवडणुकीत कर्नाटकात भाजपचा पराभव होण्याचे तेही एक कारण होते. तसाच काहीसा प्रकार गोकुळमध्ये झाला. सरदार पटेल मल्टीस्टेट फेडरेशन स्थापन करून सर्व दूध संस्था त्याच्या अखत्यारीत आणण्याची एक योजना आखली जात आहे. त्या नावाखाली हा सर्वच व्यवहार अमूलच्या ताब्यात देण्याचा डाव आहे हा सतेज पाटील यांचा प्रचार प्रभावी ठरला. गोकुळचे निर्णय कोल्हापुरात होतील, मुंबईत किंवा गुजरातेत नाही हे म्हणणे कोल्हापूरकरांनी उचलून धरले.

लढणाऱ्यांना दिलासा

सतेज पाटील यांच्या आघाडीचे नाव समविचारी असे होते. एरवी, गोकुळ किंवा जिल्हा सहकारी बँक किंवा तत्सम निवडणुकीत सर्व पक्षांचे लोक एकमेकांच्या आघाड्यांमध्ये सामील होऊन एकमेकांविरुध्द लढत असतात. पण यंदा यात फरक पडला. पश्चिम महाराष्ट्रात आता सांगलीचे विश्वजित कदम आणि कोल्हापूरचे सतेज पाटील हेच दोन मोठे आणि सहकारी संस्थांचा पाठिंबा असलेले काँग्रेसचे नेते शिल्लक राहिले आहेत. त्यामुळे भाजपचा त्यांच्यावर डोळा आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस व राष्ट्रवादीला कोल्हापुरात दहापैकी एकही जागा जिंकता आली नाही. आता गोकुळमध्ये हरवले की सतेज पाटील संपले असा हा हिशेब होता. त्यासाठीच मुख्यमंत्री दोन वेळा येथे येऊन गेले. उमेदवारांची निवड, प्रचाराची मोहिम यात त्यांनी विशेष लक्ष घातले. तीन खासदार, तमाम मंत्री आणि आमदार असा फौजफाटा प्रचारात उतरवण्यात आला. शेवटी तर मुश्रीफ इतके घायकुतीला आले की, मतदारांना यल्लमा देवीच्या शपथा घ्यायला लावल्या आणि जे शपथा मोडतील त्यांच्या अंगावर देवी उठतील अशी भीती घालण्यात आली. बाळूमामाचीही आण घालण्यात आली. पण मतदारांनी या कशालाच भीक घातली नाही. तुम्ही वाट्टेल तसा पक्षबदल करायचा आणि आम्हाला शपथा घालता असे म्हणून मतदारांनी तमाम पक्षबदलूंना वाटेला लावले. मुश्रीफांचे चिरंजीव पराभूत झाले. एकेकाळी ज्यांनी गोकुळच नव्हे तर कोल्हापूरचे राजकारण मुठीत ठेवले त्या महादेव महाडिक यांच्या घरातील शौमिक महाडिक याही हरल्या. माजी अध्यक्ष अरुण डोंगळे, विश्वास पाटील यांनाही लोकांनी घरी धाडले. त्यावरून महायुतीच्या नावाखाली जे काही भ्रष्ट राजकारण उभे करण्याचा प्रयत्न झाला त्याला मतदारांनी दणका दिला. गोकुळच नव्हे महाराष्ट्रातील सर्व सहकारी चळवळ, इथले दूध संघ, बँका, सहकारी कारखाने आपल्या कबजात आणण्यासाठी भाजपचे चाळे चालू आहेत. केंद्रात सहकार खाते निर्माण करून ते अमित शहा यांच्याकडे सोपवण्याचे कारण हेच आहे. ईडी, सीबीआयचा धाक दाखवायचा आणि नेत्यांना आपल्याकडे वळवायचे किंवा मग ती संस्था प्रशासकाच्या ताब्यात द्यायची असा यातला डाव आहे. राज्य सहकारी बँक, मुंबै बँक इथपासून अनेक संस्थांमध्ये हे दिसले आहे. त्याच्या विरोधात लढणाऱ्या राज्यभरातील सर्व मंडळींना गोकुळमधील या कारस्थानी मंडळींची ही हार दिलासा देणारी आहे. आता सतेज पाटील गोकुळचा कारभार सुधारावा, त्यातील तक्रारी दूर कराव्यात व या कारस्थानी मंडळींना शिरकाव करण्यासाठी पुन्हा फटी शिल्लक राहणार नाहीत हे पाहावे अशी अपेक्षा आहे.

विचार

मक्का करार आणि युद्धाची नवी कोंडी

सौदी अरेबियावर हुतींचे हल्ले वाढत असताना मक्का संरक्षण कराराची परीक्षा सुरू झाली. सौदी, पाकिस्तान आणि तुर्कियेने आपल्यापैकी एका देशावर सशस्त्र हल्ला म्हणजे तिन्ही देशांवर हल्ला मानला जाईल, असे म्हटले आहे; पण करार करणे आणि प्रत्यक्ष युद्धात उतरण्यात अंतर आहे. आता तर तांबडा समुद्र आणि बाब-अल-मंदेबमधील अस्थिरता वाढत असल्याने जागतिक व्यापार आणि पश्चिम आशियाचे स्थैर्य धोक्यात आले आहे.

आरिफ शेख

सौदी अरेबियावर हल्ले वाढल्याने मक्का करार चर्चेत आला, ही घटना वर वर पाहता तीन देशांच्या संरक्षण सहकार्याची बाब वाटते; पण जरा खोलात गेल्यास वेगळेच चित्र दिसते. कारण इथे प्रश्न फक्त सौदी अरेबियाच्या सुरक्षेचा नाही. प्रश्न आहे या युद्धात आणखी किती देश ओढले जाणार आणि त्याची किंमत कोण मोजणार, हा आहे. येमेनमधील हुती टोळ्या आणि सौदी अरेबियामधला संघर्ष नवा नाही. २०१५ पासून सौदी अरेबियाने येमेनच्या आंतरराष्ट्रीय मान्यताप्राप्त सरकारला पाठिंबा देत लष्करी कारवाई केली होती. २०२२ नंतर संघर्षाची तीव्रता मोठ्या प्रमाणावर कमी झाली होती; पण २०२६ मध्ये परिस्थिती पुन्हा बिघडली आणि आता हुतींचे हल्ले सौदी अरेबियाच्या सीमांपलीकडे महत्त्वाच्या शहरांपर्यंत आणि आर्थिक ठिकाणांपर्यंत पोहोचत आहेत. सप्टेंबरमध्ये ताइफ आणि यनबूकडे डागण्यात आलेली सहा बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे सौदी अरेबियाच्या हवाई संरक्षणाने पाडल्याचा दावा करण्यात आला. हुतींनी रियाध आणि यनबूमधील सौदी अरामकोच्या सुविधांवर हल्ले केल्याचाही दावा केला. आता इथे मक्का संरक्षण कराराचा मुद्दा समोर येतो. ७ ऑगस्ट २०२६ रोजी सौदी अरेबिया, पाकिस्तान आणि तुर्कियेने मक्केत संयुक्त संरक्षण करार केला. या करारातील मूलभूत भूमिकेनुसार तीनपैकी एका देशावर सशस्त्र हल्ला झाला तरी तो तिन्ही देशांवरील हल्ला मानला जाईल. ३१ ऑगस्टला इस्तंबूलमध्ये या कराराशी संबंधित पहिली बैठकही झाली. त्यानंतर आता सौदीवर हुती बंडखोरांचे हल्ले वाढल्याने करार प्रत्यक्षात किती आणि कसा लागू होणार, हा मोठा प्रश्न उभा राहिला आहे; पण कागदावरचा करार आणि रणांगणातील निर्णय यात बरेच अंतर असते.

न्यूयॉर्कमध्ये संयुक्त राष्ट्र महासभेच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री इशाक डार, सौदीचे परराष्ट्रमंत्री फैसल बिन फरहान आणि तुर्कियेचे परराष्ट्रमंत्री हाकान फिदान यांची भेट झाली. या चर्चेत मक्का कराराच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक संस्थात्मक व्यवस्था, समित्या आणि पुढील सहकार्याचा आढावा घेण्यात आला. सौदी अरेबियाच्या संरक्षणासाठी लष्करी प्रमुखांची तातडीची बैठक घेण्यावरही चर्चा झाली; पण पाकिस्तान आणि तुर्कियेच्या भूमिकेत एक प्रकारची सावधगिरी दिसते. म्हणजे सौदीला मदत करायची, पण त्याचा अर्थ थेट येमेनच्या युद्धात उतरायचे का, हा प्रश्न अजून खुला आहे. ही सावधगिरी समजून घ्यावी लागेल. कारण एकदा पाकिस्तान किंवा तुर्कियेने थेट लष्करी कारवाई सुरू केली, की हा संघर्ष फक्त सौदी अरेबिया विरुद्ध हुती एवढाच राहणार नाही. येमेनमधील युद्धाचा व्याप वाढेल. त्यात इराणचा प्रश्न येईल. तांबड्या समुद्राचा प्रश्न येईल. अमेरिकेची भूमिका येईल. युरोपीय देशांची भूमिका येईल आणि मग पश्चिम आशियातील आधीच तापलेल्या परिस्थितीत आणखी एक आघाडी उघडली जाण्याची शक्यता निर्माण होईल. म्हणूनच दोन्ही देश सध्या नेमकी किती मदत करायची, याचा विचार करत आहेत. लष्करी गुप्तचर माहिती, संरक्षण यंत्रणा, तांत्रिक मदत, हवाई संरक्षण, सैनिक कारवाई की थेट युद्ध या बाबतीत प्रश्न अनेक आहेत; उत्तर अजून स्पष्ट नाही. सौदी अरेबियाची अडचण मात्र खरी आहे. सौदी अरेबियासाठी ही परिस्थिती किरकोळ नाही. विशेषतः यनबूचे महत्त्व मोठे आहे. तांबड्या समुद्राच्या किनाऱ्यावरील यनबू बंदर आणि तिथली तेलविषयक पायाभूत सुविधा सौदी अरेबियाच्या अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाची आहे.

पूर्वेकडील तेलक्षेत्रातून पश्चिम किनाऱ्यापर्यंत जाणारी पाइपलाइन असल्याने होर्मुजच्या सामुद्रधुनीत अडथळे निर्माण झाले, तर यनबूचा मार्ग महत्त्वाचा ठरतो. म्हणूनच यनबूवर हल्ल्याची शक्यता म्हणजे केवळ एका शहराच्या सुरक्षेचा प्रश्न नाही. तो तेल निर्यातीचा प्रश्न आहे आणि तेलाचा प्रश्न म्हणजे संपूर्ण जगाचा प्रश्न. येमेनच्या किनाऱ्यावरील बाब-अल-मंदेब हा आणखी एक अत्यंत महत्त्वाचा समुद्री मार्ग आहे. तांबडा समुद्र आणि अदनच्या आखाताला जोडणाऱ्या या अरुंद मार्गातून मोठ्या प्रमाणावर व्यापारी जहाजांची वाहतूक होते. हुतींची पश्चिम येमेनमधील वाढती पकड आणि या भागातील संघर्षामुळे जहाजांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अधिक गंभीर झाला आहे. म्हणूनच सौदीच्या सीमेवर डागलेले क्षेपणास्त्र काही तासांमध्ये जागतिक तेल बाजाराला हादरवू शकते. पाकिस्तानसाठी हा निर्णय सोपा नाही. सौदी अरेबियाशी त्याचे दीर्घकाळचे संरक्षण आणि आर्थिक संबंध आहेत. दुसरीकडे, पाकिस्तानला स्वतःच्या सुरक्षेचे आणि आर्थिक अडचणींचे प्रश्न आहेत. त्यामुळे परदेशात आणखी एका युद्धात मोठ्या प्रमाणावर सैनिक पाठवण्याचा निर्णय सहज घेता येणार नाही. तुर्कियेचीही परिस्थिती वेगळी नाही. तुर्कियेने पश्चिम आशियामध्ये आपला प्रभाव वाढवला आहे; पण येमेनमधील थेट युद्धात उतरणे म्हणजे दीर्घकालीन लष्करी आणि राजनैतिक गुंतवणूक. म्हणूनच सध्या दोन्ही देशांकडून येणारे संकेत पाहिले, तर एक गोष्ट स्पष्ट दिसते, ती म्हणजे सौदी अरेबियाला एकटे सोडायचे नाही; पण युद्धात उडीही घ्यायची नाही. दरम्यान, सौदी अरेबियाला मदतीचे इतर हातही पुढे येताना दिसत आहेत.

अलिकडेच ब्रिटनने सौदीच्या लढाऊ विमानांना हवेत इंधन भरण्यासाठी मर्यादित संरक्षणात्मक मदत देण्याचे मान्य केले आहे. 'रॉयटर्स'नुसार ब्रिटन एक 'आरएएफ व्होयोगर' विमान तैनात करणार आहे. फ्रान्सनेही यनबूच्या सुरक्षेसाठी सैनिक, रडार आणि संरक्षण यंत्रणा देण्याची घोषणा केली असल्याची माहिती समोर आली आहे. म्हणजे चित्र आता तीन देशांच्या करारापेक्षा मोठे होत चालले आहे. एकीकडे सौदी अरेबिया, पाकिस्तान आणि तुर्कियेचा करार तर दुसरीकडे ब्रिटन आणि फ्रान्सची संरक्षणात्मक मदत आहे. त्याच वेळी येमेनमध्ये सौदीसमर्थित सरकारी फौजा आणि हुती यांच्यात संघर्ष झडतो आहे. या सगळ्यामध्ये इराण हा ही एक महत्वाचा घटक आहे. ही सगळी समीकरणं एकत्र आली, की परिस्थिती किती गुंतागुंतीची आहे, याचा अंदाज येतो. हुतींना इराणचा पाठिंबा असल्याचे विविध देश आणि आंतरराष्ट्रीय माध्यमांनी नमूद केले असले, तरी हुतींचे स्वतःचे स्थानिक राजकीय, धार्मिक आणि लष्करी हितसंबंध आहेत. म्हणून त्यांच्याविरुद्ध बाहेरून राष्ट्रांचा एक गट उभा केला म्हणून प्रश्न लगेच सुटेलच असे नाही. उलट, तांबड्या समुद्रातील जहाजांवर धोका वाढू शकतो. सौदी अरेबियातील ऊर्जा प्रकल्प लक्ष्य होऊ शकतात. येमेनमधील सामान्य नागरिकांना आणखी मोठी किंमत मोजावी लागू शकते. वर्षानुवर्षांच्या युद्धामुळे येमेन आधीच उद्ध्वस्त झाला आहे. आता संघर्ष पुन्हा तीव्र होत असताना विस्थापन वाढत आहे. येमेनच्या पश्चिम किनाऱ्यावर हुतींची वाढती पकड आणि बाब-अल-मंदेब भागात त्यांचा वाढता प्रभाव यामुळे परिस्थिती अधिक गुंतागुंतीची झाली आहे.

जगातील मोठे देश संरक्षण करार, क्षेपणास्त्रे, ड्रोन, युद्धनौका आणि हवाई संरक्षण यंत्रणांवर चर्चा करतील; पण येमेनमधल्या एखाद्या कुटुंबासाठी प्रश्न अवघड असेल. बाब-अल-मंदेब आणि तांबड्या समुद्रातील अस्थिरता भारतासाठीही महत्त्वाची आहे. कारण भारताचा पश्चिम आशिया, युरोप आणि आफ्रिकेशी होणारा मोठा व्यापार समुद्री मार्गांशी जोडलेला आहे. जहाजांना मार्ग बदलावा लागला तर प्रवासाचा वेळ वाढतो. विमा महागतो. इंधन खर्च वाढतो. त्यामुळे सौदीवर डागलेलं क्षेपणास्त्र थेट भारतातील एखाद्या दुकानावर पडत नाही; पण त्याचा परिणाम आयात खर्च, इंधन, वाहतूक आणि वस्तूंच्या किमतीतून आपल्या खिशापर्यंत पोहोचू शकतो. युद्धाची हीच जागतिक साखळी आहे. मक्का संरक्षण कराराची खरी परीक्षा आता सुरू झाली आहे. करार करताना सर्वांनी एकमेकांच्या सुरक्षेची हमी देणे सोपे असते; पण प्रत्यक्ष संकटात कोण किती पुढे जाणार, याची परीक्षा वेगळी असते. सौदी अरेबियावर हल्ले आणखी वाढल्यास पाकिस्तान आणि तुर्कियेवर दबाव वाढणार हे स्पष्ट आहे. पश्चिम आशिया आधीच अस्वस्थ असताना काही देश आणखी एका संघर्षात उतरले, तर परिस्थिती हाताबाहेर जाण्याचा धोका वाढतो, म्हणून सौदीच्या आत्म रक्षणाच्या अधिकाराला पाठिंबा देणे आणि थेट युद्धात उतरणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. येत्या काळात हुतींचे हल्ले वाढल्यास सौदी अरेबियाला संरक्षणाची गरज आहे, हे वास्तव नाकारता येत नाही; पण त्याच वेळी आणखी देश युद्धात ओढले गेल्यास संघर्षाचा विस्तार होण्याची शक्यता दुर्लक्षित करता येणार नाही. जगासमोर या वास्तवाचेच खरे आव्हान आहे.

आज सौदी-येमेनला शांतता हवी आहे. तांबड्या समुद्राला सुरक्षित समुद्री मार्ग हवा आणि जगाला स्थिर तेलपुरवठा हवा. यासाठी बंदुकीपेक्षा मुत्सद्देगिरीची गरज अधिक आहे. मक्का कराराची खरी कसोटी कदाचित सौदीच्या मदतीला किती सैनिक जातात, यात नसून तीन देश मिळून युद्ध आणखी वाढू देतात की युद्ध थांबवण्याचा मार्ग शोधतात, यात आहे. कारण युद्ध संपल्यानंतर किती माणसं जिवंत राहिली, किती घरं उभी राहिली आणि किती मुलांचं भविष्य वाचलं, हेच जास्त महत्त्वाचं असणार आहे.

चर्चा आजची

पाण्याविण्या शेतकऱ्यांसह कष्टकरी संकटात

संतोष राऊळ



यंदा पावसाने गेल्या वर्षीच्या तुलनेत खुपच उशीरा पडायची सुरूवात केली. त्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ आली. त्यानंतर पाऊस मोठ्या प्रमाणात पडला आणि पुन्हा थांबला. त्यामुळे शेतकऱ्यांवर पुन्हा दुबार लावणीची वेळ आली. त्यानंतर आता वेळेच्या आधीच म्हणजे सप्टेंबर महिन्यातच पावसाने दडी मारली. त्यातच उन्हाचे चटके देखील प्रचंड प्रमणात जाणवू लागले. साधारणतः मे महिन्याच्या जवळपास शेताला भेगा पडतात. मात्र, यंदा ऑक्टोबर महिन्याच्या सुरूवातीपासूनच शेतात भेगा पडल्याचे दिसत आहे. आधीच पावसाने उशीरा सुरूवात केली आणि बऱ्याचवेळा लपंडाव खेळला. त्यामुळे दरवर्षीप्रमाणे यंदाही शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यात अजुन परतीचा पाऊस पडणे बाकी आहे. त्यामुळे तो जर आता पडला तर हाता तोंडाशी आलेले पीक जमिनदोस्त होण्याची भीती शेतकऱ्यांना पडली आहे. त्यातच दुसरं म्हणजे गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा कमी पाऊस पडल्यामुळे जिल्ह्यातील धरणं देखील फुल्ल भरलेली नाहीत. गतवर्षी या काळात धरणं १०० टक्के भरली होती. मात्र, यंदा ९५ ते ९९ टक्केच धरणं भरलेली आहेत. त्यामुळे अगामी काळात पाणी टंचाईची समस्या भेडसावण्याची भिती निर्माण झाली आहे.

गेल्या वर्षी मे महिन्यापासूनच पाऊस सुरू झाला होता. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाऊस पडल्याने धरणेही पाण्याने फुल्ल झाली होती. त्यामुळे ऑक्टोबर महिन्याच्या दूसऱ्या आठवड्यापर्यंत जिल्ह्यातील २८ धरणांपैकी १६ धरणांमध्ये १०० टक्के, ३ धरणांमध्ये ५० ते ६४ टक्के, उर्वरित ३ धरणांमध्ये ३६ ते ४० टक्के आणि ४ धरणांमध्ये ३ ते २५ टक्के, तर एका धरणांमध्ये ८२ टक्के जलसाठा होता. मात्र, यंदा जिल्ह्यामध्ये जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पावसाने हजेरी लावली. जूलैच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पाऊस चांगला पडला. त्यानंतर ऑगस्ट महिन्यात पावसाची रिपरिप चालू होती. त्यामध्ये जिल्ह्यातील लघू पाटबंधारे विभागाची २८ धरणे पाण्याने भरली. मात्र, सप्टेंबरपासून पावसाने खेळखंडोबा सुरु केला. त्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून उन्हाचे चटके जाणवू लागले. उष्णतेमुळे पाण्याची पातळी कमी होऊ लागली. त्यामुळे जिल्ह्यातील धरणांमध्ये ९१ टक्के जलसाठा असला, तरी गतवर्षीच्या तुलनेने यंदा जिल्ह्यातील धरणांमध्ये जलसाठा कमी असल्याचे टक्केवारीनुसार दिसून येत आहे. यंदा ३ धरणांमध्ये ९९ टक्के, ६ धरणांमध्ये ९६ टक्के, अन्य ३ धरणांमध्ये ९७ टक्के इतका जलसाठा आहे. उर्वरित धरणांमध्ये ९५ टक्क्यांपासून खाली जलसाठा असून, ३ धरणांमध्ये ५० टक्केच पाण्याचा साठा असल्याचे समोर आले आहे.

जिल्ह्यातील बहुतांश गावे एमआयडीसीच्या पाण्यावर अवलंबून आहेत. मात्र, एमआयडीसीच्या पाण्यासाठीदेखील दोन ते तीन दिवसांची प्रतिक्षा नागरिकांना करावी लागत आहे. जिल्ह्यामध्ये लघुपाट बंधारे विभागाच्या अखत्यारित २८ धरणे आहेत. या धरणांद्वारे लाखो नागरिकांना पाणी पुरवठा केला जातो. रायगडसह नवी मुंबई व इतर जिल्ह्यातील गावांना पाणी पुरवठा जिल्ह्यातील धरणांमधून केला जात आहे. परंतु, यंदा पाऊस लवकर गायब झाल्याने पाण्याचा प्रश्न आतापासून भेडसावू लागला आहे. अनेक गावांना चार ते आठ दिवस पाण्याची प्रतिक्षा करावी लागत आहे. धरणांमधील पाण्याची पातळी कमी होऊ लागल्याने आगामी काळात पाण्याचा दुष्काळ वाढण्याची भिती निर्माण झाली आहे.

जिल्हा परिषद ग्रामीण पुरवठा विभागामार्फत जलजीवन योजना राबविण्यात आल्या आहेत. या योजने अंतर्गत प्रत्येकाच्या दारापर्यंत नळ पोहोचले आहेत. त्यासाठी करोडो रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. पाण्याचे स्त्रोत निर्माण करून नळाद्वारे घरापर्यंत पाणी देण्याचा प्रयत्न करण्यात आला. जिल्ह्यातील पंधरा तालुक्यांमध्ये हाती घेतलेल्या १ हजार ४९६ योजनांपैकी ६१३ योजनांची कामे पुर्ण झाली आहेत. उर्वरित कामे अजूनही प्रगती पथावर असून, काही कामे निधीअभावी ठप्प झाली आहेत. त्यामुळे या योजनेच्या कामांबाबत अनेकांनी नाराजी व्यक्त केली. योजना राबवून जिल्ह्यातील अनेक गावे, वाड्यांमधील घरांत पाणी पोहचलेच नाही. नळ कनेक्शन देण्यात आले; परंतु, त्या नळांमध्ये पाणी नाही. त्यामुळे ही योजना जिल्ह्यात फेल ठरल्याचे बोलले जात आहे. तसेच, अद्याप बहुतांश ठिकाणी एमआडीसीचे पाणी दुरच, धरणांमधून होणाऱ्या पाणीपुरवठ्याचे पाणी देखील पोहोचलेले नाही. त्यांना विहिरी किंवा इतर नैसर्गीक स्त्रोतांवर अवलंबून राहावे लागत आहे. त्यात आता यंदा पाऊस देखील कमी पडला आहे. त्यामुळे भू गर्भातील पाणीसाठा देखील लवकरच खालवण्याची भिती व्यक्त होत आहे. त्यामुळे यंदा पाण्याविणा फक्त शेतकरीच नाही, तर कष्टकरी जनता देखील प्रचंड संकटात येण्याची भीती व्यक्त होत आहे.

लोकसंसद

मुंबईकर चिन्मय सुतारने रचला इतिहास

रणजी ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेत मिझोराम क्रिकेट संघाकडून खेळणाऱ्या मुंबईच्या चिन्मय सुतारने नागालँडविरुद्ध खेळताना ५१७ चेंडूंत ४६ चौकार आणि ७ षटकार ठोकून नाबाद ४०० धावा फटकावल्या आणि भारताच्या प्रथम श्रेणी क्रिकेटच्या इतिहासात एका डावात ४०० धावांचा टप्पा गाठणारा तो केवळ दुसरा भारतीय फलंदाज ठरला आहे. यापूर्वी १९४८-४९ मध्ये महाराष्ट्राच्या भाऊसाहेब निंबाळकर यांनी नाबाद ४४३ धावा केल्या होत्या. त्यानंतर तब्बल ७७ वर्षांनी भारताच्या देशांतर्गत क्रिकेटमध्ये अशी ऐतिहासिक कामगिरी झाली आहे. चिन्मय सुतारच्या या ऐतिहासिक खेळीने त्याला जागतिक क्रिकेटमधील अत्यंत मर्यादित अशा '४०० धावांच्या क्लब'मध्ये स्थान मिळवून दिले आहे. यापूर्वी जागतिक पातळीवर वेस्ट इंडिजचे महान फलंदाज ब्रायन लारा दोनदा (नाबाद ५०१ आणि कसोटीत नाबाद ४००), ऑस्ट्रेलियाचे सर डॉन ब्रॅडमन (नाबाद ४५२) आणि बिल पोन्सफोर्ड दोनदा (४३७ आणि ४२९), इंग्लंडचे आर्ची मॅकलारेन (४२४), सॅम नॉर्थईस्ट (नाबाद ४१०) आणि ग्रॅमी हिक (नाबाद ४०५), पाकिस्तानचे हनीफ मोहम्मद (४९९) आणि आफताब बलोच (४२८) आणि भारताचे भाऊसाहेब निंबाळकर (नाबाद ४४३) या मोजक्याच नऊ दिग्गजांनी प्रथमश्रेणी सामन्यात हा टप्पा ओलांडला आहे. सर डॉन ब्रॅडमन आणि ब्रायन लारा यांसारख्या महान क्रिकेटपटूंच्या मांदियाळीत चिन्मयने मिळवलेले स्थान हा भारतीय क्रिकेटसाठी सुवर्णक्षण असून या नाबाद ४०० धावांच्या मॅरेथॉन खेळीमुळे चिन्मयला भारतीय संघाचे दरवाजे लवकरच उघडतील अशी अपेक्षा आहे.

– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी

दिनविशेष

जगातील पहिले झेरॉक्स मशीन बनवले



आज जगाच्या कुठल्याही कानाकोपऱ्यात, एखाद्या दस्तऐवजाची आहे तशी प्रत काढणे, याला त्याची झेरॉक्स काढणे असेच म्हटले जाते. इतक्या लोकोपयोगी आणि लोकप्रिय तंत्राचा शोध मात्र केवळ शोधकाच्या गरजेतून लागला. चेस्टर कार्लसन नावाच्या अमेरिकेतील स्वामित्व हक्कनोंदणी कार्यालयात काम करणाऱ्या गृहस्थांना, रोज अनेक कागदांच्या प्रती तयार करायला लागायच्या. कार्लसनला संधिवात असल्याने हे काम त्याला अति कष्टदायक होत होते. ते कष्ट कमी करण्यासाठी काही यांत्रिक उपाय शोधावेत म्हणून तो कामाला लागला. घरच्या स्वयंपाकघरात त्याने प्रयोग सुरू केले आणि १९३८च्या सुमारास, प्रकाशाचा वापर करून प्रती तयार करण्याचे नवीन तंत्र विकसित करण्यात, त्याला यश आले. १९३९ ते १९४४ पर्यंत त्याने आयबीएम, जीई यांसारख्या २० कंपन्यांचे उंबरठे झिजवले, पण कुणालाच या यंत्रात काही 'दम' आहे असे वाटले नाही. अखेर १९४७ मध्ये हॅलोईड कॉर्पोरेशन या न्यूयॉर्कमधील एका छोट्या कंपनीने यात रस दाखवला आणि या यंत्रांचे व्यावसायिक तत्त्वावर उत्पादन करायची तयारी दाखवली. कार्लसन तोपर्यंत या तंत्रज्ञानाला इलेक्ट्रोफोटोकॉपीइन्ग याच नावाने संबोधत होता. हॅलोईडला हे नाव फार लांबलचक वाटल्याने त्यांनी याला 'झेरोग्राफी' हे नाव दिले. ग्रीक भाषेत याचा अर्थ 'कोरडे लिखाण' असा होतो. या तंत्रावर चालणाऱ्या यंत्रांना त्यांनी 'झेरॉक्स यंत्रे' असे नाव दिले आणि पुढे आपल्या कंपनीचे नावही 'झेरॉक्स कॉर्पोरेशन' असे बदलले. तुम्ही जर बारकाईने पाहिले तर तुमच्या लक्षात आलं असेल जेव्हा झेरॉक्सवाला आपण दिलेला पेपर झेरॉक्स मशीनमध्ये टाकतो तेव्हा त्या पेपर खालून एक तेजस्वी प्रकाश जातो. हाच तेजस्वी प्रकाश आपल्या पेपर ला स्कॅन करतो आणि त्याच एक प्रतिबिंब तयार करतो. हे प्रतिबिंब विद्युत स्वरूपात असून ते फोटोकंडक्टरवर तयार होते. फोटोकॉपीयरमधिल फोटोकंडक्टर हा एक फिरणारा कन्व्हेअर बेल्ट असतो. तयार झालेले प्रतिबिंब कन्व्हेअर बेल्ट फिरत असताना स्वतःभोवती घेतो. त्याचप्रमाणे मशीनमध्ये एक शाही ड्रम असतो त्यामध्ये शाही हि पावडर किंवा द्रव स्वरूपामध्ये ठेवलेली असते. शाही ड्रम कन्व्हेअर बेल्टला उपलब्ध शाहीद्वारे लेपन करतो. शाई ही विद्युत भारीत असते म्हणून ती विद्युत प्रतिबिंबाला चिटकते. आणि कन्व्हेअर बेल्टवर मूळ प्रतची आणखी एक तशीच प्रतिमा तयार होते. जेव्हा कन्व्हेअर बेल्टचा मशीनमध्ये ठेवलेल्या साध्या कागदाशी संपर्क येतो तेव्हा तयार झालेले प्रतिबिंब विद्युत भारेद्वारे साध्या कागदावर हस्तांतरित होते. हस्तांतरित झालेला कागद उष्ण दाब असलेल्या दोन रोलर्समधून जातो आणि ते प्रतिबिंब कायमस्वरूपी पेपरवर प्रिंट होते.

रानसई धरणाच्या पातळीत घट

● उरणकरांवर चिंतेचे सावट; पाणी जपून वापरण्याचे आवाहन

| चिरनेर | प्रतिनिधी |

अल निनोच्या भयंकर संकटामुळे पावसाने ओढ दिल्याने सर्वत्रच पाण्याची समस्या गंभीर बनली आहे. उरण परिसरही पाणी टंचाईला अपवाद नाही. तालुक्यातील शहर, ग्रामीण आणि औद्योगिक परिसराला पाणीपुरवठा करणारे एकमेव असलेले रानसई धरणाच्या पाण्याची पातळी पावसाअभावी दररोज एक एक इंचाने घटत चालली आहे. यामुळे उरणकरांना ऑक्टोबर महिन्यापासूनच गरजे इतक्यात पाण्यासाठी आणखी किमान पुढील दहा महिन्यांपर्यंत संघर्ष करावा लागणार आहे. पाणीपुरवठ्याचे आणखी कोणतेही स्त्रोत नसल्याने उरणकरांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन शासकीय स्तरावरून केले



जात आहे.

उरण तालुक्याला पाणी पुरवठा करणाऱ्या रानसई धरणाची उंची ११६ फुट आहे. मात्र पावसाअभावी पाणी साठवण क्षमता शुक्रवारपर्यंत (१६) ११३.२ फुटापर्यंत कमी झाली आहे. दररोज धरणाची पाणीपातळी एका इंचाचे कमी होत चालली आहे. जलकुंभ, पाणी शुद्धीकरण यंत्रणाही सुस्थितीत आहे. तसेच जलवाहिन्यांतील पाणी गळतीचे प्रमाणही अत्यल्प आहे. मात्र याउपरही दररोज धरणातील घटणारी पाण्याची पातळी सर्वांसाठी चिंताजनक बाब आहे.

याआधीपासून मंगळवार, शुक्रवार असे आठवड्यातून दोन दिवस पाणी लागू करण्यात आली आहे. त्यानंतर आता शासनानेच पाणी कपातीचे आदेश दिले आहेत. मात्र सध्या सणासुदीचे दिवस असल्याने उरणच्या नागरिकांसाठी असलेली पाणी कपात येत्या २७ ऑक्टोबरपासून लागू करण्यात येणार असल्याची माहिती उरण एमआयडीसीचे उप अभियंता तानाजी कांबळे यांनी दिली. पावसाअभावी आलेल्या भीषण पाणीटंचाईच्या संकटाचा सामना करण्यासाठी नागरिकांनी पाणी जपून आणि काटकसरीने वापर करण्याचे आवाहन एमआयडीसीचे उप अभियंता तानाजी कांबळे यांनी केले आहे.

कोणतेही स्त्रोत नसल्याने उरण शहराला एमआयडीसीकडून पाणीपुरवठा केला जात आहे. ३५ ते ४० हजारांची लोकसंख्या असलेल्या उरण शहराला दररोज ४.५० एमएलडी इतक्या पाण्याची गरज भासते. मात्र पाण्याचे योग्य प्रकारे नियोजन नसल्याने ४० कोटींची थकबाकी असलेल्या उरण नगरपरिषदेला पाणी टंचाईच्या झळा सहन करण्याची वेळ येऊन ठेपली आहे.

पाणी टंचाईचे गहिरे संकट

उरण परिसरात याआधीच ठिकठिकाणी निधीअभावी रखडलेल्या पाणी पुरवठा योजना, पाणी पुरवठ्यातील नियोजनाचा अभाव, पाणी चोरी, याकडे शासकीय यंत्रणेचे होणारे दुर्लक्ष यामुळे उरण परिसरातील पाणी टंचाईने त्रस्त आहेत. चाणजे, केगाव ग्रामपंचायत हद्दीतील गावांना याआधीच १५-१५ दिवसात फक्त एक दिवसच अर्धा -तासभर पाणी मिळते. आता तर पावसाअभावी पाणी टंचाईचे संकट आणखी गहिरे बनल्याने येऊ घातलेल्या पाणीबाणीचा कसा सामना करावा, याचीच सर्वाधिक चिंता उरणवासियांना भेडसावत आहे.

धनगर समाजाचा दसरा मेळावा



माथेरान : समाजाची एकजूट, स्वाभिमान आणि परंपरा जपण्यासाठी धनगर समाजाचा भव्य-दिव्य दसरा मेळावा आयोजित करण्यात आला. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक ते श्री पीसरनाथ मंदिरापर्यंत ढोल-ताशांच्या गजरात जय मल्हार, जय अहिल्या नामघोषाने सारा परिसर दुमदुमून गेला होता. सर्वत्र पिवळ्या रंगाची उधळण आणि जागोजागी पिवळे ध्वज लावण्यात आले होते. सकाळी ११:३० वाजता अहिल्याबाई होळकर चौकातून धनगर समाजाने आपल्या बांधवांना घेऊन भव्य मिरवणुकीचे आयोजन केले होते.

म्हसळ्यात 'किशोरी उत्सव-२०२६' साजरा

| म्हसळा | प्रतिनिधी |

आरोग्य, सुरक्षितता व बालविवाह प्रतिबंधाबाबत जनजागृती सेवा सहयोग फाउंडेशनच्या किशोरी विकास प्रकल्पांतर्गत म्हसळा येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या सभागृहात 'किशोरी उत्सव २०२६' उत्साहात पार पडला. नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून आयोजित या कार्यक्रमात तालुक्यातील १० गावांमधील २४७ किशोरी आणि सुमारे २०० माता सहभागी झाल्या. किशोरींचे आरोग्य, वैयक्तिक स्वच्छता, महिला सुरक्षा, आत्मविश्वास आणि सर्वांगीण विकासाबाबत जनजागृती करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता.



म्हसळा नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्षा राखी करंबे यांच्या हस्ते किशोरी हेल्थ किटचे उद्घाटन करण्यात आले. प्रमुख वक्त्या डॉ. सोनाली करंबे यांनी मासिक पाळी व वैयक्तिक स्वच्छतेबाबत मार्गदर्शन करून किशोरींमधील गैरसमज दूर केले. तर उपविभागीय पोलीस अधिकारी योगिता कुटे यांनी बालविवाह प्रतिबंध, कायदा आणि सायबर सुरक्षेबाबत माहिती दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्ष राखी करंबे यांनी आई-मुलगी नात्यातील प्रेम, विश्वास आणि मोकळ्या संवादाचे महत्त्व अधोरेखित केले. किशोरवयात मुलींना होणारे शारीरिक व मानसिक बदल लक्षात घेऊन मातांनी त्यांच्या समस्या समजून घ्याव्यात, असे सांगितले. यावेळी किशोरी व त्यांच्या मातांनी बालविवाहविरोधी शपथ घेतली. त्यानंतर नृत्य स्पर्धा, किशोरी पूजन आणि विविध खेळांचे आयोजन करण्यात आले हाते.

शिक्षण संसाधन केंद्र, थेरपी रूमचे उद्घाटन

| माणगाव | प्रतिनिधी |

दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांना समान शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने उतेखोल येथे समावेशित शिक्षण संसाधन केंद्र व थेरपी रूमचे शुक्रवारी (दि.१६) उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन विलासजी शिंदे सभापती, पंचायत समिती माणगाव व मनीषा मालोरे, उपसभापती पंचायत समिती माणगाव, यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शुभदा पाटील, गटविकास अधिकारी, पंचायत समिती माणगाव, प्रसाद पाटील, गटशिक्षण अधिकारी, पंचायत समिती माणगाव, शंकर शिंदे केंद्रप्रमुख केंद्र उतेखोल, तालुका



माणगाव यांची प्रमुख उपस्थिती होती. तर बीआरसी, पंचायत समिती माणगावचे साधन व्यक्ती बाळकृष्ण पाटील, नंदू जाधव, प्रज्ञा मात्रे, एमआयएस समन्वयक सोनाली धोंडुगडे तसेच विशेष शिक्षक अनिल वाघमारे, सुनिता पवार, श्रेया डांगे आणि राजिप उतेखोल शाळेच्या मुख्याध्यापिका सायली अंबुर्ले उपस्थित होत्या. याशिवाय उतेखोल शाळेतील शिक्षक, विद्यार्थी, दिव्यांग विद्यार्थी, त्यांचे पालक उपस्थित होते.

यावेळी अनिल वाघमारे व श्रेया डांगे यांनी समावेशित शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व कार्यात्मक प्रगतीसाठी संसाधन केंद्र व थेरपी रूमचा वापर व गरज याबाबत आवश्यकता स्पष्ट केली.

दिव्यांगांसाठी जयपूर फूट शिबीर

कर्जत : दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी जीवन जगता यावे, या उद्देशाने कर्जत येथे २५ ते २९ नोव्हेंबरदरम्यान मोफत कृत्रिम अवयव व जयपूर फूट शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. मैत्रीबोध परिवार, कामतपाडा-जांबरुंग यांच्या 'मैत्री आदर्श ग्राम' उपक्रमांतर्गत टाटा ऑटो कॉम्प सिस्टम, पिनॅकल इंडस्ट्रीज, पुणे आणि श्री भगवान महावीर विकलांग सहायता समिती यांच्या सहकार्याने हे शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिरात गरजू दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम पाय, जयपूर फूट, कृत्रिम हात, व्हीलचेअर, कॅलिपर्स, कुबड्या तसेच अन्य आवश्यक सहाय्यक उपकरणांचे मोफत वाटप करण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे दिव्यांग व्यक्तींना दैनंदिन जीवनात मदत मिळून त्यांचे जीवन अधिक सुलभ होण्यास हातभार लागणार आहे. रायगड जिल्ह्यासह ठाणे, कल्याण, खोपोली, लोणावळा, अलिबाग, पेण, पनवेल आणि परिसरातील गावांमधील गरजू दिव्यांग व्यक्तींनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

■ कृत्रिम अवयवांसह सहाय्यक उपकरणांचे होणार वाटप

अधिक माहितीसाठी मयूर (९२२५९२९७६१), वैभव (७७५८८०६७७८) आणि नितीन (९८६०४९६५९१) यांच्याशी संपर्क साधावा.

बांबूपासून कंदील बनविण्याचे प्रशिक्षण

| खांब | प्रतिनिधी |

पढवण-वाली पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमिक विद्यालय पढवण येथे शारदोत्सवाच्या निमित्ताने बांबूपासून आकाश कंदील बनविण्याचे प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात पार पडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रनिकेतन अभियांत्रिकी महाविद्यालय, लोणेरे यांच्या सहकार्याने या एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक साळूंके यांनी सर्व मान्यवरांचे यथोचित स्वागत केले. या कार्यशाळेचे प्रकल्प व्यवस्थापक श्रीनिवास वारखंडकर यांनी निसर्गात मुबलक प्रमाणात



आढळणाऱ्या बांबूचे महत्व स्पष्ट करतानाच, यापासून उदरनिर्वाहाचे साधन कसे उपलब्ध होईल, याबाबत अनेक उदाहरणे दिली. तर सुरेश धारवा आणि प्रविण मावस्कर या दोन्ही प्रशिक्षकांनी उत्तम मार्गदर्शन केल्याने, विद्यार्थी स्वतः आकाश कंदील बनवू शकले. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर स्वनिर्मितीचा एक वेगळाच आनंद झळकत होता.

गोमाशी गडावर प्रथमच गडपूजन

| कोलाड | प्रतिनिधी |

विजयादशमी दसऱ्याचे औचित्य साधून दुर्गप्रेमीच्या वतीने गोमाशी गडावर प्रथमच गडपूजन करण्यात आले. ऐतिहासिक वारसा जतन करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला असून, या उपक्रमामुळे गडप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मागील वर्षी गोमाशी गडाचा शोध लागल्यानंतर दुर्गप्रेमींनी गडावर जाऊन स्वच्छता व साफसफाई केली होती. यावेळी गडावर असलेल्या काही ऐतिहासिक शिळाही त्यांच्या निदर्शनास आल्या. त्यानंतर गडाचे ऐतिहासिक महत्त्व जपण्याच्या उद्देशाने दुर्गप्रेमींकडून सातत्याने



प्रयत्न करण्यात येत आहेत.

यंदा दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर दुर्गप्रेमींनी गडावर जाऊन प्रथमच गडपूजन केले. यावेळी गडावर पहिले तोरण बांधण्यात आले, तसेच शिवकालीन शस्त्रांचे विधिवत पूजन करण्यात आले. ऐतिहासिक गड-किल्ल्यांचा वारसा जतन करणे, त्यांची माहिती पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे आणि गडसंवर्धनाची भावना समाजात रुजवणे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

या गडपूजन व शस्त्रपूजन

दुर्गप्रेमींकडून शिवकालीन शस्त्रांचे पूजन

सोहळ्यात दुर्गप्रेमी आनंद सानप, कृष्णा जाधव, ओंकार मोरे, सचिन कळमकर, सुमित भोसले, अर्णव चांदोरकर, प्रांजल येलकर, साक्षी भालेकर, सानिका साळवी, सिद्धी निकम, त्रिशा शिंदे, शुभम वरे, तन्मय सानप, वैभव भोसले आदी दुर्गप्रेमी सहभागी झाले होते.

गोमाशी गडावर प्रथमच पार पडलेले हे गडपूजन ऐतिहासिक वारसाच्या जतनासाठी उचललेले एक महत्त्वपूर्ण पाऊल असून, दुर्गप्रेमीच्या या उपक्रमाचे इतिहासप्रेमी व शिवप्रेमींकडून कौतुक होत आहे.

विविध प्रकारच्या कंदिलांना ग्राहकांची मागणी | महेश गायकर यांनी जपली पारंपरिक कला

पनवेलच्या लाईन आळीत दिवाळीची चाहूल!

| खांदेश्वर | प्रतिनिधी |

दिवाळीचा सण जवळ येताच बाजारपेठांमध्ये रंगीबेरंगी कंदिलांची सजावट दिसू लागली आहे. पनवेलच्या ऐतिहासिक लाईन आळीमध्ये गेल्या चाळीस वर्षांपासून महेश गायकर हे पारंपरिक कंदीलनिर्मितीची कला जपत आहेत. लहान आकारापासून मोठ्या कंदिलांपर्यंत, चांदणी कंदील आणि ३६ कांडीच्या कंदिलांसह विविध प्रकारचे कंदील त्यांच्या हातून आकार घेत आहेत.

काळानुसार कंदीलनिर्मितीच्या साहित्यामध्ये आणि डिझाइनमध्ये बदल झाले आहेत. पूर्वी पारंपरिक पद्धतीने बनविल्या जाणाऱ्या कंदिलांसोबत आता बाजारात



विविध रंगांचे कॉटन कागद, आकर्षक नक्षी आणि सॅटिन रिबीनचा वापर करून कंदील तयार केले जात आहेत. नव्या डिझाइनमुळे हे कंदील ग्राहकांचे लक्ष वेधून घेत आहेत. पर्यावरणपूरक साहित्य वापरण्यावरही भर दिला जात आहे.

दिवाळीच्या सजावटीत कंदिलाला विशेष महत्त्व असते. घराच्या प्रवेशद्वारावर लावलेला रंगीबेरंगी कंदील सणाचा आनंद द्विगुणित करतो. त्यामुळे पारंपरिक कंदिलांपासून आधुनिक डिझाइनपर्यंत विविध पर्यायांना ग्राहकांकडून पसंती मिळत आहे.

गेल्या काही वर्षांत कंदील बनविण्यासाठी लागणारे साहित्य महाग झाले आहे. कागद, रिबीन आणि इतर साहित्याच्या वाढत्या किमतींचा परिणाम व्यवसायावर होत असला, तरी महेश गायकर यांनी त्याचा भार सर्वसामान्य ग्राहकांवर पडू नये, याची काळजी घेतली आहे.

आधुनिकतेच्या युगात बाजारात अनेक आकर्षक सजावटीच्या वस्तू उपलब्ध होत असल्या, तरी हाताने बनविलेल्या कंदिलांचे वेगळेच आकर्षण आहे. पनवेलच्या लाईन आळीतील महेश गायकर यांची कंदीलनिर्मिती ही केवळ व्यवसायाची गोष्ट नसून, पारंपरिक कलाकुसर जपतानाच दिवाळीचा आनंद सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न ठरत आहे.

सर्वसामान्यांना परवडणारे दर

दिवाळी हा केवळ श्रीमंतांचा नव्हे, तर समाजातील प्रत्येक घटकाचा सण आहे. प्रत्येक कुटुंबाने आपल्या घरात कंदील लावून दिवाळीचा आनंद साजरा करावा, अशी महेश गायकर यांची भावना आहे. त्यामुळे चाळीस वर्षांपासून कंदीलनिर्मितीची परंपरा जपत त्यांनी सर्वसामान्य ग्राहकांचा विचारही कायम ठेवला आहे. महागाईतही सर्वसामान्यांच्या खिशाला परवडणारे दरात कंदिलांची विक्री केली जात आहे.

निवडक



नांदगाव हायस्कूलमध्ये मिळणार संगीत शिक्षणाचे धडे

मुरुड जंजिरा : श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर नांदगाव येथे ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांना आठवड्यातील प्रत्येक शनिवारी संगीताचे धडे देण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांना त्यांच्या अंतर्गत कला गुणांना वाव देण्यासाठी शाळेत संगीत वर्ग सुरू करण्यात आला. या शाळेत शिक्षक असणारे सागर राऊत यांनी शालेय विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच संगीत धडे मिळावेत, यासाठी त्यांनी अग्रक्रमाने सहभाग नोंदवत सर्वस्वी जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली आहे. येथील शालेय विद्यार्थ्यांना दर शनिवारी पखवाज, ढोलकी, तबला वादनचे धडे गिरवण्यात येणार आहेत. अभ्यासाबरोबरच संगीत क्षेत्र विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करावी, यासाठी शाळेकडून हा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. नांदगाव हायस्कूलमधील शिक्षक सागर राऊत हे पखवाज क्षेत्रात अखिल भारतीय गांधर्व या विद्यालयातून प्रथम विशारद या परीक्षेत उत्तीर्ण होऊन आज संगीत भजन क्षेत्रात त्यांचे नाव लौकिक आहे. सागर राऊत यांनी स्वतः स्वास्थ्य दाखवून शाळेच्या व्यवस्थापन कमिटीचे सहकार्य लाभल्याने या शाळेत या उपक्रमाचे मोठ्या थाटात उद्घाटन करण्यात आले.



श्रीवर्धन येथे पारंपरिक भोंडला उत्साहात

श्रीवर्धन : महाराष्ट्राची समृद्ध संस्कृती आणि परंपरा जपणारा भोंडला उत्सव श्रीवर्धन येथील मारुती मंदिरात उत्साहात पार पडला. नवरात्र आणि दसऱ्याच्या औचित्याने आयोजित या सोहळ्यात परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने एकत्र येत फेर धरला आणि पारंपरिक लोकसंस्कृतीचा आनंद लुटला. कोकणात निसर्ग आणि कृषी समृद्धीचे प्रतीक म्हणून भोंडला सण साजरा केला जातो. हस्त नक्षत्राचे वाहन हत्ती असल्याने, पूजेच्या ठिकाणी हत्तीची प्रतिकात्मक प्रतिकृती ठेवीत त्याची पूजा करण्यात आली. हत्ती हा शक्ती, समृद्धी आणि धान्य-संपत्तीच्या भरभराटीचे प्रतीक मानला जातो. या खेळाच्या माध्यमातून महिलांनी निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त केली. मारुती मंदिरात जमा झालेल्या महिलांनी 'ऐलमा पैलमा गणेश देवा...' या प्रार्थनेने भोंडल्याच्या गाण्यांना सुरुवात केली. त्यानंतर आड बाई आडोणी व एक लिंबू झेलू बाई यांसारखी सासू-सुनेचे मिश्कील नाते आणि रोजच्या जगण्यातील गमतीजमती सांगणारी पारंपरिक गाणी म्हटली गेली. खेळाच्या शेवटी सर्वांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरलेली खिरापत ओळखण्याचा कार्यक्रम रंगला. महिलांनी आपापल्या घरून आणलेली वेगवेगळ्या प्रकारची खिरापत ओळखताना सर्वांची छान करमणूक झाली. या उपक्रमामुळे उपस्थितांमध्ये सहकार्य, आपुलकी आणि सामूहिकतेची भावना अधिक दृढ झाली.



विद्यार्थ्यांना सँडल, दप्तरांचे वाटप

पाली/बेणसे : 'द्या एक हात मदतीचा, सामाजिक बांधीलकीचा, शैक्षणिक क्रांतीचा' या संकल्पनेतून गोरेगाव (मुंबई) येथील उन्नतनगर-अक्षय को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीच्या माध्यमातून सुधागड तालुक्यातील दुर्गम भागातील शाळांमधील ३५८ गरजू व आदिवासी विद्यार्थ्यांना सँडल, दप्तर आणि शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. अजय देशलेहरा यांच्या विशेष सहकार्यातून व दातृत्वातून हा उपक्रम पार पडला. काही महिन्यांपूर्वी उन्नतनगर सोसायटीचे अध्यक्ष कानमल देशलेहरा, विवेकानंद सावंत आणि मनिष देशलेहरा यांनी या भागातील शाळांना भेटी देऊन विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या होत्या. ही परिस्थिती समजून घेतल्यानंतर, स्वतः अजय देशलेहरा यांनी आपल्या मुलास राजेश देशलेहरा यांना या बिकट परिस्थितीत शिकणाऱ्या मुलांना मदत करण्याची प्रेरणा दिली. त्यानंतर, मुंबई पोलीस हवालदार राजेंद्र वाघमारे यांच्या समन्वयातून सुधागड तालुक्यातील रा.जि.प. शाळा (महागाव, देऊळवाडी चंदरगाव, हातोंड, माठल, केलगान, गोंदाव, कसईशेत, पत्र्याची वाडी) आणि माध्यमिक विद्यालय चंदरगाव येथील एकूण ३५८ विद्यार्थ्यांची यादी तयार करून हे साहित्य सुपूर्द करण्यात आले.



बाळू भोईरांना 'समाज गौरव स्मृती पुरस्कार'

पाली : सुधागड तालुका मराठा समाजाचे माजी अध्यक्ष तथा राबगाव येथील रहिवासी स्व.बाळू भाऊ भोईर यांच्या समाजकार्याची दखल घेत त्यांना मरणोत्तर 'समाज गौरव स्मृती पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. सुधागड तालुका मराठा समाजाच्या दसरा मेळाव्यात हा सन्मान प्रदान करण्यात आला. स्व. बाळूभाऊ भोईर यांचे पुत्र नंदकुमार भोईर आणि नात धनश्री भोईर यांनी हा पुरस्कार स्वीकारला. मराठा समाजाच्या स्व.स. स साजेकर सभागृहात हा दसरा मेळावा पार पडला. यावेळी समाजाचे अध्यक्ष धनंजय साजेकर यांच्यासह संस्थेचे सर्व पदाधिकारी आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. समाजासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा गौरव करणाऱ्या या सोहळ्यात स्व. बाळूभाऊ भोईर यांच्या कार्यालाही मानाचे स्थान देण्यात आले. राबगाव येथील स्व. बाळूभाऊ भोईर यांनी सुधागड तालुका मराठा समाजाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळली होती. अध्यक्ष म्हणून समाजासाठी केलेल्या कार्याची पोचपावती म्हणून संस्थेने त्यांना 'समाज गौरव स्मृती पुरस्कार' देऊन गौरविले. त्यांच्या पश्चात कुटुंबीयांकडे हा पुरस्कार सुपूर्द करून समाजाने त्यांच्या योगदानाप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२२ ऑक्टोबर

१) श्री.रमाकांत रामचंद्र पाटील चेंढरे, अलिबाग,२२-१०-१९३९
२) श्रीम.मनीषा मनोहर घैसास चेंढरे-अलिबाग, २२-१०-१९५१
३) श्री.प्रवीण यशवंत पाटील वेश्वी, अलिबाग, २२-१०-१९५५
४) श्री.गुरूनाथ नारायण थळे टेकाळी, अलिबाग, २२-१०-१९५८

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

मोहन गोरे यांचे निधन

महाड : मुंबईतील जोगेश्वरी (पूर्व) येथे स्थायिक असलेले महाड तालुक्यातील तेलंगे गावचे सुपुत्र, कुणबी समाजाचे ज्येष्ठ नेते, म्हाडामधील माजी अधिकारी मोहन तुकाराम गोरे (७४) यांचे सोमवारी (दि.१९) निधन झाले. सोमवारी रात्री प्रतापनगर स्मशानभूमी, जोगेश्वरी (पूर्व) येथे त्यांच्या पार्थिवावर अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी ग्रामस्थांसह विविध सामाजिक आणि राजकीय मंडळींनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. त्यांचे सात दिवसांचे कार्य रविवार दि.२५ ऑक्टोबर रोजी राहत्या घरी ऍकमे बिल्डिंग, सर्वोदय नगर, जोगेश्वरी (पूर्व) येथे, दशक्रिया विधी बुधवार दि.२८ ऑक्टोबर रोजी पवित्र तीर्थक्षेत्र हरिहरेश्वर येथे, तर बारावे व उत्तरकार्य शुक्रवार दि.३० ऑक्टोबर रोजी ऍकमे बिल्डिंग, सर्वोदय नगर, जोगेश्वरी येथील राहत्या घरी होणार आहेत.

पनवेलमध्ये सायलेन्सरवर फिरवला बुलडोझर

।। दुचाकीस्वारांना वाहतूक पोलिसांचा दणका ।। ध्वनिप्रदूषण रोखण्यासाठी धडक मोहीम

। खांदा । वार्ताहर ।

दुचाकींना मॉडिफाइड सायलेन्सर बसवून कर्णकर्कश आवाज करणाऱ्या वाहनचालकांना चाप लावण्यासाठी पनवेल शहर वाहतूक पोलिसांनी कठोर कारवाई केली आहे. या कारवाईदरम्यान जप्त करण्यात आलेले तब्बल १११ मॉडिफाइड सायलेन्सर मंगळवारी (दि.२०) सायंकाळी पाच वाजता बुलडोझरच्या साहाय्याने नष्ट करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळील पनवेल शहर वाहतूक शाखेच्या कार्यालय परिसरात ही कारवाई करण्यात आली.

जुने पनवेल, नवीन पनवेल



तसेच पळस्पे सर्कल परिसरात काही दुचाकीस्वारांकडून वाहनांच्या सायलेन्सरमध्ये बेकायदा बदल करून मोठ्या आवाजात वाहने चालविली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या कर्णकर्कश आवाजामुळे सकाळी आणि रात्री नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि रुग्णांना या आवाजाचा फटका बसत असून, रुग्णालये, शाळा आणि निवासी परिसरातील शांतताही भंग होत आहे.

या प्रकाराची दखल घेत जानेवारी २०२५ पासून पनवेल शहर वाहतूक शाखेच्या हद्दीत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. वनमंत्री गणेश नाईक यांच्या कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या तोंडी व लेखी तक्रारी, नागरिकांच्या तक्रारी तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आलेल्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई सुरू करण्यात आली. या मोहिमेंतर्गत नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, बेकायदा बदल केलेले सायलेन्सर जप्त करण्यात आले आहेत.बेशिस्त वाहनचालकांवर केलेल्या कारवाईमुळे पनवेलमध्ये वाहनचालकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

सप्टेंबर २०२६ पर्यंत जप्त करण्यात आलेले १११ मॉडिफाइड सायलेन्सर नष्ट करण्यात आले. पोलीस उपायुक्त (वाहतूक), नवी मुंबई आणि सहाय्यक पोलीस आयुक्त (वाहतूक), नवी मुंबई यांच्या उपस्थितीत ही कारवाई करण्यात आली. याबाबतची माहिती पनवेल शहर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुभाष शंकर पुजारी यांनी दिली.

ध्वनिप्रदूषणाविरोधात कठोर संदेश

दुचाकींच्या सायलेन्सरमध्ये बदल करून दणदणाट करणाऱ्या वाहनचालकामुळे शहरातील ध्वनिप्रदूषणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. सायलेन्सर नष्ट करण्याच्या या कारवाईतून अशा प्रकारांना आळा घालण्याचा प्रयत्न करण्यात आला. वाहनचालकांनी वाहतुकीचे नियम पाळावेत आणि नागरिकांच्या शांततेला बाधा पोहोचेल, असे प्रकार टाळावेत, असे आवाहन वाहतूक पोलिसांनी केले आहे.

निवडक



चौलमध्ये तीन दिवसीय ज्ञानयज्ञ उत्साहात

रेवदंडा : ब्राह्मण समाजाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला तीन दिवसीय ज्ञानयज्ञ कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात ऐतिहासिक वारसा, पुरातत्त्वशास्त्र, खगोलशास्त्र आणि सागरी सुरक्षा अशा विविध विषयांवर व्याख्याने आयोजित करण्यात आली, तसेच पुस्तकाचे प्रकाशनही करण्यात आले. कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी प्राचीन चौल व्यापारी बंदराचा इतिहास या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी डॉ. सचिन जोशी यांनी चौल पुरातत्त्वीय उत्खनन : कारणे, महत्त्व आणि परिणाम या विषयावर मार्गदर्शन केले. दुसऱ्या दिवशी आशा कुलकर्णी यांनी आकाशातील ग्रह.. पृथ्वीवर उलथापालथ?! या विषयावर व्याख्यान दिले. तिसऱ्या दिवशी अनिल देशमुख यांनी सागरी सीमा सुरक्षा या विषयावर विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विश्वास जोशी यांनी केले. या ज्ञानवर्धक उपक्रमातून इतिहास, विज्ञान आणि राष्ट्रीय सुरक्षेसारख्या महत्त्वपूर्ण विषयांची माहिती नागरिकांना एकाच व्यासपीठावर मिळाली. ऐतिहासिक वारशाबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

बाळूमामांचा जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन

खोपोली : लोणावळ्यातील पांगोळी धनगरवस्ती येथील बाळूमामा मंदिरात शुक्रवार (दि.२३) ऑक्टोबर रोजी श्रीसंत बाळूमामांच्या जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. बाळूमामा देवस्थान ट्रस्ट आणि पांगोळी धनगरवस्ती ग्रामस्थांच्या वतीने आयोजित या सोहळ्यानिमित्त दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रम, भजन, हरिपाठ, कीर्तन आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. रायगड आणि पुणे जिल्ह्यांच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या पांगोळी धनगरवस्ती येथील श्रीसंत बाळूमामा मंदिरात दररोज हजारो भाविक दर्शनासाठी येतात. तसेच दर अमावस्येला येथे भंडाऱ्याचे आयोजन केले जाते. त्यामुळे या देवस्थानाला परिसरातील भाविकांच्या श्रद्धेत विशेष स्थान आहे. या जन्मोत्सव सोहळ्याला महाराष्ट्रातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रीसंत बाळूमामांचे दर्शन घ्यावे, असे आवाहन श्रीसंत बाळूमामा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष तथा माजी आदर्श सरपंच बबन खरात यांनी केले आहे.



पूर्वाची वैद्यकीय शिक्षणासाठी निवड

चिरनेर : उरण तालुक्यातील चिरनेर गावातील पूर्वा अमित परदेशी हिने उल्लेखनीय यश संपादन केले असून, नाशिक येथील डॉ. वसंतराव पवार मेडिकल कॉलेज हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर या महाविद्यालयात तिची शासकीय कोट्यातून प्रथम वर्ष एमबीबीएस या वैद्यकीय शिक्षणाकरिता निवड झाली असून, तिचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. पूर्वाने रीनीट परीक्षेत पूर्वाने ७२० पैकी ५२० गुण प्राप्त केले आहेत. पूर्वाने सीबीएससी बोर्डाच्या दहावीच्या परीक्षेत ९५.४० टक्के गुण प्राप्त केले होते. तर इयत्ता बारावीच्या परीक्षेमध्ये ९०.८० टक्के गुण प्राप्त केले आहेत. त्यानंतर तिने तासंनतास या वैद्यकीय क्षेत्रातील नीटच्या परीक्षेचा अभ्यास करून या परीक्षेत चांगले यश संपादन केले आहे. तिचे हे यश परिसरातील मुलींसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. या यशात आई-वडिलांचे मार्गदर्शन व मेहनत असल्याचे पूर्वाने स्पष्ट केले. या यशाबद्दल तिचे कौतुक होत असून, सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.



वाघोशी येथे पारंपरिक भोंडला उत्साहात

पाली/गोमाशी : आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत रायगड जिल्हा परिषद आदर्श शाळा, वाघोशी येथे नवरात्र उत्सवानिमित्त पारंपरिक भोंडला कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.कार्यक्रमाची सुरुवात हत्तीच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करून करण्यात आली. यावेळी शिक्षक जनार्दन भिलारे यांनी विद्यार्थ्यांना भोंडल्याच्या माध्यमातून निसर्ग कथा सांगितल्या. पर्यावरणाचे रक्षण करणे हीच खरी नवरात्रीची पूजा आहे, असा संदेश त्यांनी दिला. यानंतर शाळेतील चिमुकल्यांनी पारंपरिक वेशभूषेत भोंडला गीतांवर ठेका धरत दांडियाचा मनसोक्त आनंद लुटला. शिक्षकवृंद सुवर्णा घोडे, कीर्ती लामदाडे, जनार्दन भिलारे आणि मुख्याध्यापक राजेश जाधव यांनीही विद्यार्थ्यांसोबत नृत्यात सहभाग घेत कार्यक्रमाची रंगत वाढवली.या कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना भोंडल्याचा प्रसाद म्हणून खिरापत वाटण्यात आली. शेवटी चांगला पाऊस पडावा, वरुणराजाने कृपा करावी यासाठी सर्वांनी एकत्र प्रार्थना केली. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अरुणा देशमुख, भावना देशमुख, पालक वर्ग आणि ग्रामस्थांनी सहकार्य केले.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **अलिबागमधील आर्किटेक्चर आणि इंटिरियर डिझायनिंग** ऑफिसकरीता ऑटो कॅड ड्राफ्टसमन हवा आहे. संपर्क : ९७६२७७७९७५
- **नागाव येथील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी** खालील पदांसाठी स्टाफची आवश्यकता आहे : रिसेप्शनिस्ट २ जागा, रेस्टॉरंट कॅप्टन १ जागा, हाऊसकीपर फक्त पुरुष (२ जागा), इंडियन चायनीज कुक १ जागा, मोरी - १ जागा, वेटर - १ जागा. इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ या वेळेत संपर्क साधावा किंवा वर मेसेज करावा. संपर्क क्रमांक: ७५५९१८४६१२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१



● श्री.सिद्धिविनायक मित्रमंडळ किहीम - आदिवासी वाडी, ता. अलिबाग येथील नवरात्रोत्सवानिमित्ताने विराजमान देवीचे दर्शन घेण्यासाठी उपस्थित किहीम सरपंच प्रसाद उर्फ पिंट्या गायकवाड व इतर (छायाचित्र - अब्दुल सोगावकर)



● मु. बामणसुरे - आदिवासी वाडी, ता. अलिबाग येथील विराजमान देवीचे दर्शन घेण्यासाठी उपस्थित किहीम सरपंच प्रसाद उर्फ पिंट्या गायकवाड व इतर (छायाचित्र - अब्दुल सोगावकर)

एकविरा नवरात्रोत्सव कुंभारवाडा चंडिका होम

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

एकविरा नवरात्रोत्सव कुंभारवाडा मुरुड यांच्या वतीने २००७ पासून दामोदर काते यांच्या निवासस्थानी नवरात्रोत्सव साजरा करण्यात येत आहे. यंदा या उत्सवाचे १९ वे वर्ष असून, कुंभारवाड्यातील सर्व जाती-धर्मांतील नागरिक एकत्र येऊन विविध धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करत आहेत.

नऊ दिवस चालणाऱ्या या नवरात्रोत्सवात तरुण-तरुणी, महिला आणि पुरुष एकत्र येऊन दररोज देवीची पूजा व आरती करतात. तसेच रात्रीच्या वेळी दांडिया आणि रासच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. या उत्सवामुळे परिसरातील नागरिकांमध्ये सामाजिक एकोपा, बंधुभाव आणि धार्मिक सलोखा वृद्धिंगत होत आहे.

नवरात्रोत्सवाच्या नवव्या दिवशी मंडळाच्या वतीने आदिशक्ती चंडिका देवीच्या चंडिका होमाचे आयोजन करण्यात आले. आदिशक्ती चंडिका देवीच्या कृपेने जीवनातील संकटे दूर व्हावीत तसेच सुख-समृद्धी लाभावी, या श्रद्धेने हा धार्मिक विधी



केला जातो. या चंडिका होमाची पूजा पुरोहित समीर उपाध्ये, प्रथमेश जोशी आणि कौस्तुभ जोशी यांच्या हस्ते विधिवत संपन्न झाली. या होमपूजेचा मान अनिकेत कोतवाल आणि त्यांच्या पत्नी धनश्री कोतवाल यांना मिळाला.

एकविरा नवरात्रोत्सव कुंभारवाडा याच्या माध्यमातून नवरात्रोत्सवाची परंपरा जपली जात आहे. सर्व जाती-धर्मांतील नागरिकांच्या एकत्रित सहभागामुळे हा उत्सव धार्मिक श्रद्धेसोबतच सामाजिक ऐक्याचेही प्रतीक ठरत आहे. अध्यक्ष सुमित दर्गे त्यांच्या नेतृत्वाखाली नवरात्रोत्सवाचे आयोजन करण्यात येते.

नितीन जोशी यांचा सन्मान

। पनवेल । प्रतिनिधी ।

इनोव्हेटिव्ह मानबिंदू प्रकाशन यांच्यावतीने पनवेलमधील समाजसेवक तथा तालुक्यातील नेरे येथील संगीता नितीन जोशी सामाजिक विकास संस्थेशी संलग्न असलेले नितीन जोशी यांना राष्ट्रीय सेवा साधना आयकॉन पुरस्कार जाहीर झाला असून हा पुरस्कार सोहळा येत्या २५ ऑक्टोबर रोजी पनवेलमधील आंगण बँक्वेट हॉल, आदई सर्कल येथे पार पडणार आहे. गेल्या २० वर्षांपूर्वी पत्नी संगिता नितीन जोशी यांच्या नावाने संस्था सुरु करून त्या माध्यमातून त्यांनी वृद्धांची सेवा करण्याचे पवित्र काम केले. याची दखल घेऊन पुरस्कार जाहीर करण्यात आला.

उरणमध्ये नवदुर्गा सन्मान सोहळा



। उरण । प्रतिनिधी ।

पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या उरण पत्रकार उत्कर्ष समिती आणि महिला उत्कर्ष समिती यांच्या संयुक्त विद्यमाने नवरात्र उत्सव सोहळ्याचे औचित्य साधून नवदुर्गा सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या सोहळ्यात समाजसेवा, मनोरंजन, प्रबोधन, आदर्श शिक्षिका, पत्रकारिता, कला, क्रीडा आणि वैद्यकीय क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान मुली आणि महिलांचा सन्मान करण्यात आला.

पत्रकार उत्कर्ष समितीचे अध्यक्ष डॉ. अशोक म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर बाबासो कालेल, सिनेअभिनेत्री दीपिका पाटील, जेष्ठ पत्रकार प्रदीप पाटील, स्कूलच्या प्रिन्सिपॉल ज्योती म्हात्रे आणि सोहळ्यासाठी निमंत्रित नवदुर्गा आणि त्यांचा परिवारांतील सदस्य उपस्थित होते.

यावेळी समारंभाचे प्रमुख पाहुणे इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. बाबासो कालेल यांनी सोहळ्यासाठी उपस्थित नवदुर्गांना नवरात्री उत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा देऊन आपले मार्गदर्शन पर विचार मांडताना सांगितले की आपल्या घरची गृहिणी हीच खरी नवदुर्गा असते तिची अनेक रूपे आपल्याला घरातच दर्शन देत असतात ज्या घरांतील गृहिणी साक्षर, व्यवहारदक्ष, आणि निरोगी असते ती आपल्या घरांतील प्रत्येक सदस्याला पुढे घेऊन जाते त्यामुळे प्रत्येक महिला ही आरोग्य संपन्न असणे काळाची गरज असल्याचे सांगून ते पुढे म्हणाले प्रत्येक महिलेने प्रथम स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे, प्रमुख आजार सविस्तरपणे सांगून त्या संदर्भात घ्यावयाची काळजी आणि त्यावरील उपचार याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

नवरात्रोत्सवानिमित्त महिला शिक्षकांचा गौरव

। पाली/गोमाशी । प्रतिनिधी ।

भोराई शिक्षण प्रसारक मंडळ नांदगावचे संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, नांदगाव येथे नवरात्र उत्सवानिमित्त सर्व महिला शिक्षिकांचा भव्य नारीशक्तीचा जागर - गौरव सोहळा आयोजित करण्यात आला.

या सोहळ्यासाठी व्यासपीठावर माजी प्राचार्य बळीराम निंबाळकर, माजी आदर्श शिक्षिका अर्चना निंबाळकर, विद्यालयाचे विद्यमान प्राचार्य अशोक शिंदे तसेच व्यासपीठावरील सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या



संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमात महिला शिक्षिकांचा सन्मान माजी प्राचार्य बळीराम निंबाळकर आणि माजी आदर्श शिक्षिका अर्चना निंबाळकर यांच्या हस्ते माजी आदर्श शिक्षिका अर्चना निंबाळकर, स्वाती शिंदे, तन्मयी शिंदे, जयश्री अहिरराव, प्राध्यापिका सोनल ठाकोरे, सहाय्यक शिक्षिका शामल कंबलकर, सहाय्यक शिक्षिका विद्या भिसे, शाळेच्या कर्मचारी अंकिता खैरे वहिनी, मंगल खैरे वहिनी सन्मान करण्यात आले.

अर्चना निंबाळकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, आज विविध क्षेत्रात महिला उच्चपदावर आहेत. असुरांचा नाश देवीने केला आहे. कोल्हापूर येथील महालक्ष्मीची अख्यायिका सांगून विद्यार्थ्यांनी ध्येय समोर ठेवून यश संपादन करावे. आज विद्यार्थ्यांचे यश पाहून आम्हाला आनंद होतो. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. भूषण सुतार यांनी केले.

कर्जत रेल्वे पोलीस ठाण्याचा उपक्रम | **सायबर जनजागृती मोहिमेअंतर्गत मार्गदर्शनपर शिबीर**

विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्याचे धडे

। नेरळ । प्रतिनिधी ।

दहिवली येथील स्वातंत्र्यसैनिक दत्तात्रय पांडुरंग डोंबे विद्यानिकेतनमध्ये कर्जत रेल्वे पोलीस ठाण्याच्या वतीने सायबर जनजागृती मोहिमेअंतर्गत मार्गदर्शनपर शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमातून इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना सायबर गुन्हेगारी, ऑनलाइन फसवणूक आणि मोबाईलचा सुरक्षित वापर याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

डोंबे विद्यानिकेतन शाळा



येथील सकाळच्या सत्रात शिक्षण घेणाऱ्या इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना कर्जत रेल्वे पोलीस ठाणे यांच्याकडून सायबर जनजागृती अभियान राबवण्यात आले.यावेळी शालेय विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्याबद्दल माहिती देण्यासाठी कर्जत रेल्वे पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी अजय शिर्के, महेश क्षीरसागर, हनुमान सालगुडे, कर्जत पोलीस ठाण्याचे कॉन्स्टेबल घवस व शाळेच्या मुख्याध्यापिका मीरा कडू आणि माया म्हसे आदी मान्यवर उपस्थित होते. ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक भाऊसाहेब कुरुंद यांनी मार्गदर्शन केले. मोबाईलवरील फसव्या जाहिराती, अनोळखी लिंक उघडल्यामुळे होणारे संभाव्य नुकसान आणि ऑनलाइन फसवणुकीचे विविध प्रकार त्यांनी उदाहरणांसह विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.मोबाईलचा वापर किती आणि कशा पद्धतीने करावा, इंटरनेट वापरताना कोणती खबरदारी घ्यावी, तसेच वैयक्तिक माहिती अनोळखी व्यक्तींना देणे का टाळावे, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांना विविध हेल्पलाइन क्रमांकांची माहितीही देण्यात आली. सध्याच्या डिजिटल युगात मोबाईल आणि इंटरनेटचा वापर वाढत असताना सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी जागरूकता असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना लहान वयातच सायबर सुरक्षेचे महत्त्व समजावे आणि त्यांनी इंटरनेटचा जबाबदारीने वापर करावा, या उद्देशाने या शिबिराला महत्त्व प्राप्त झाले आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांचे स्वरूप, ऑनलाइन फसवणुकीचे धोके आणि डिजिटल सुरक्षिततेसाठी घ्यावयाची खबरदारी यांची माहिती मिळाली. यावेळी शिक्षक किरण पालवे, राजू शिंदे, किशोर दिघे, विनायक अहिरे, चंद्रकांत शिंगोळे, शिल्पा जाधव, रेश्मा हिंदोळे, जागृती आणणे, वैजू ससे, स्नेहल जोशी, सोनम शिंदे, योगेश लाड, विजय सोनवणे आदी तसेच पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

अपघात रोखण्यासाठी ‘जीवन रक्षा अभियान’



| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |

रेल्वे रूळ ओलांडताना होणारे अपघात रोखण्यासाठी पनवेल रेल्वे पोलिसांनी खांदेश्वर रेल्वे स्थानकावर ‘जीवन रक्षा अभियान’ राबविले. यावेळी यमराजाची प्रतिकृती उभी करून प्रवाशांना सुरक्षिततेचा संदेश देण्यात आला. पोलिसांनी मानवी साखळी तयार करून प्रवाशांना रेल्वे रूळ ओलांडू नका, नियमांचे पालन करा आणि स्वतः च्या जीवाची काळजी घ्या, असे आवाहन केले.

खांदेश्वर रेल्वे स्थानकाच्या फलाट क्रमांक एक आणि दोनच्या पनवेल दिशेकडील टोकाला रेल्वे रूळ ओलांडून ये-जा करण्याचे प्रकार घडत असल्याने अपघातांचा धोका निर्माण होत आहे. या पार्श्वभूमीवर सहाय्यक पोलीस आयुक्त विमल बिडवे यांच्या मार्गदर्शनाखाली ही जनजागृती मोहीम राबविण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय तायडे यांच्यासह पोलीस अधिकारी, कर्मचारी, महिला होमगार्ड आणि रेल्वे सुरक्षा दलाचे प्रतिनिधी या मोहिमेत सहभागी झाले होते. मात्र, खांदेश्वर स्थानक परिसरातील परिस्थितीचा विचार करता केवळ जनजागृती पुरेशी ठरणार का, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. स्थानकाच्या दोन्ही बाजूंना मोठ्या प्रमाणावर इमारतींची बांधकामे सुरू आहेत. या ठिकाणी कामासाठी येणारे कामगार तसेच परिसरात राहणारे नागरिक दररोज रेल्वेने प्रवास करण्यासाठी स्थानकात येतात. काही प्रवासी वेळ वाचविण्यासाठी रेल्वे रूळ ओलांडण्याचा धोकादायक मार्ग निवडत असल्याचे दिसते.

चौक ग्रामीण रुग्णालयात दिव्यांग प्रमाणपत्र वितरण शिबीर

| रसायनी | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींना दिव्यांग प्रमाणपत्र मिळविण्याची प्रक्रिया सुलभ व्हावी, तसेच पात्र लाभार्थ्यांना आवश्यक वैद्यकीय तपासणी व प्रमाणपत्र वितरणाची सुविधा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने ‘सेवा संकल्प अभियान’ अंतर्गत गुरुवार (दि.२२) ऑक्टोबर रोजी चौक येथील ग्रामीण रुग्णालयात दिव्यांग प्रमाणपत्र तपासणी व वितरण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.


या शिबिरासाठी अस्थिव्यंगतज्ज्ञ, नेत्ररोगतज्ज्ञ, मानसोपचारतज्ज्ञ, व्यवसायोपचारतज्ज्ञ, नेत्र चिकित्सा अधिकारी, समुपदेशक, मानसशास्त्रज्ञ, समाजसेवा अधीक्षक तसेच मनोसामाजिक कार्यकर्ते व संबंधित कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये जिल्हा रुग्णालय अलिबाग, उपजिल्हा रुग्णालय पनवेल आणि ग्रामीण रुग्णालय चौक येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. दिव्यांग व्यक्तींना शासकीय योजनांचा लाभ मिळविण्यासाठी दिव्यांग प्रमाणपत्र महत्त्वाचे असल्याने या शिबिराचा पात्र लाभार्थ्यांना फायदा होणार आहे. त्यामुळे संबंधित दिव्यांग व्यक्तींनी शिबिराबाबत अधिक माहितीसाठी ग्रामीण रुग्णालय चौक येथे संपर्क साधावा.

करंजाडेत धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात

पनवेल : प्रबुद्ध सामाजिक संस्था, करंजाडे-पनवेल यांच्या वतीने ७० वा धम्मचक्र प्रवर्तन दिन व अशोक विजयादशमीनिमित्त मंगळवारी (दि.२०) प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला करंजाडे परिसरातील बौद्ध समाजबांधव, महिला, युवक आणि धम्मभगिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी नितीन मस्के यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी कुणाल लोंढे, ॲड. अमित कांबळे, गोकुळ सोनावणे, अशोक शेळके, सचिन सोनवणे, अमित ससाणे, उज्वला सोनवणे, कल्पना कांबळे, आरती लोंढे, वर्षा कांबळे, डॉ. सायली ससाणे, आदी उपस्थित होते.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

ई-निविदा सूचना

महावितरण — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणाऱ्या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी-१०५, टी-१०६, टी-१०७, टी-१०८, टी-१०९, टी-११०, टी-१११, टी-११२, टी-११३, टी-११४, टी-११५ आणि टी-११६ (२०२६-२७) अशा एकुण **बारा** निवीदा महावितरण कंपनीच्या www.mahadiscom.in या e-Tender च्या संकेतस्थाळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निवीदा विक्रीसाठी **दि. २१.१०.२०२६ पासून ते दि. २८.१०.२०२६ @१३.००** वाजेपर्यंत उपलब्ध राहतील व निवीदा भरण्याची अंतिम तारीख **दि. २८.१०.२०२६ ला १५.००** वाजेपर्यंत आहे. निवीदेच्या आवृत्तीत/तारखा/ इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईवर प्रकाशित केले जाईल.

(सही)
कार्यकारी अभियंता (स्था.) , स्थापत्य विभाग भांडुप

जाहिर नोटिस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, विद्यमान जमिन मालक श्री.तानाजी विठ्ठल तुपे व इतर यांचेसोबत ताबेकब्जातील व वहिवाटीतील त्यांचे कायदेशीर मालकी हक्कातील व हिश्यातील खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन आमचे अशिलांनी त्यांचेकडुन कायमस्वरुपी खरेदी करण्याचा व्यवहार ठरविला आहे. सदरहु जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

मौजे चिंचवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकतीचे वर्णन:

भुमापन क्र.	उपविभाग क्र.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकारणी रु.पै
१२	५/अ	००.१७.०० पो.ख.०.०२.००	०.१२
१६	१/अ	००.२२.४० पो.ख.०.१०.२०	०.६५
१६	३	००.०१.०० पो.ख.०.००.५०	०.००
१६	४/ब	००.२०.०० पो.ख.०.०५.३०	०.००
९	५/अ	००.११.०० पो.ख. ०.०१.००	०.१

वरील वर्णनाच्या जमिनीचे संदर्भात अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, ट्रस्ट, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहिवाट वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहित सदर नोटीस झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर जमीन निर्वेध व बोजारहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालकाबरोबर पुर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत,
दिनांक : २२/१०/२०२६

ॲड. मोनाली रामदास हजारे.
पत्ता: दहिवली, ए. व्हि. एफ. रेसिडेन्सी, ललानी रोड कर्जत, ता. कर्जत, रायगड.
मो.नं: ९२६०१०९२८२.

दिनांक : २२ ऑक्टोबर २०२६

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

मौजे - चोरावळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत

मालकाचे नाव.	सर्व्हे नं.	प्लॉट नं.	क्षेत्र	आकार	
			चौ.मी.	रुपये	पैसे
प्रविण प्रभाकर	२७	३५९	३३३.००	३३	३०

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे, कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
ॲड. भुपेश तानाजी पेमारे
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- २२/१०/२०२६

ग्रुप ग्रामपंचायत खंडाळे

मु.पो.खंडाळे, ता.अलिबाग जि.रायगड फोन (०२१४१)२२४४७५

जा.क्र.३१९/२०२६ — दिनांक : २१/१०/२०२६

जाहिरात निविदा

ग्रुप ग्रामपंचायत खंडाळे ता.अलिबाग जि.रायगड ग्रामनिधी अंतर्गत सिलबंद निविदा दि.२२/१०/२०२६ ते २९/१०/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) ग्रामपंचायत कार्यालयात समक्ष अगर टपालाने मोहोरबंद स्वरूपात पोहचतील अशा पाठवण्यात उशिरा आलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

अ. क्र.	कामाचे नाव	निधी	अं.रक्कम	इसारा रक्कम	कामाची मुदत
१	ग्रामपंचायत हद्दीमधील गावांच्या व वाडींच्या नावाने LED बोर्ड लावणे बाबत बोर्ड साईज 4x3=17 नग 8x4=1 नग 8x3=3 नग	ग्रामनिधी	२२५०००/-	२२५०/-	६ महिने

अटी व शर्ती :-

१) कामाचे अंदाजपत्रक व आराखडे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.
२) नोंदणीकृत ठेकेदार/संस्था यांना प्राधान्य देण्यात येईल.
३)विकास कामे निविदा फार्म ग्रामपंचायत कार्यालयामध्ये सुट्टीचे दिवस वगळून दिले जातील सदर निविदा फॉर्म ची फी २००/- रू. इतकी राहिल.
४) प्रत्येक कामाच्या देयकातून शासकीय कपाती केल्या जातील.
५) कोणत्याही नामंजूर ठेकेदारास पत्र व्यवहार केला जाणार नाही.
६) कोणतेही एक अथवा अनेक निविदा/दरपत्रके कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा.सरपंच ग्रुप ग्रामपंचायत खंडाळे यांनी राखून ठेवला आहे.
७) विकास कामाचे देयक उपलब्ध निधीनुसार ठेकेदारास अदा करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
८) १% इसारा रक्कम धनादेश अथवा रोख स्वरूपात भराणा करावी लागेल.
९) ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेली निविदा दि.२९/१०/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात मा.सरपंच समोर उघडण्यात येईल.

सही/-
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत खंडाळे
ता.अलिबाग जि.रायगड

सही/-
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत खंडाळे
ता.अलिबाग जि.रायगड

दिनांक : २२ ऑक्टोबर २०२६

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

मौजे - रजपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र	आकार	
			हे.आर.पॉ.	रुपये	पैसे
१) काळुराम मारुती पिंगळे २) नामदेव मारुती पिंगळे ३) सुभाष मारुती पिंगळे	४८	८	१-७६-००	१	००
	यापैकी लिहून देणार यांनी विक्री केलेले क्षेत्र ०-१८-०० मात्र.				

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे, कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
ॲड. भुपेश तानाजी पेमारे
मो.नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- २२/१०/२०२६

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनांची मिळकती त्यांचे मालक अब्दूल रेहमान एच.एच.वडगामा यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

मिळकतीचे वर्णन :-

मौजे - कळंब, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत

अ. क्र.	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकार रु. पै
१	१०९	३/अ	०.५३.००	०.६०
२	१३१	२	१.७१.०० पो.ख. ०.११.०० या क्षेत्रापैकी लिहून देणार यांचे मालकीचे क्षेत्र ०.४६.००, पो.ख.०.११.०० हे.आर.चौ.मी,	०.९२
३	१३१	३	१.०७.०० पो.ख ०.०३.३० या क्षेत्रापैकी लिहून देणार यांचे मालकीचे क्षेत्र ०.१५.००, पो.ख. ०.०३.३० हे.आर.चौ.मी,	१६.०६

या मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

मोबाईल:-
०९३२६२३६९२३
०९६८९६९९५९५

ॲड. प्रवीण शांताराम खडे
पत्ता:- २, ''लक्ष्मी सदन'', जुने एस. टी. स्टॅण्ड, मु.पो.नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड.

जाहीर सुचना

तमाम जनतेस, जमीन दलाल, बँक, वित्तीय संस्था व संभाव्य खरेदीदारांस याद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णनाच्या मौजे बामणोली, ता. अलिबाग येथील मिळकती आमचे अशिल श्री. कृष्णा अनिल चौखानी यांच्या खुद्द मालकी हक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जावहीवाटीत आहेत.

मिळकतींचे वर्णन

अनु.क्र	मौजे	गट नं.	क्षेत्र (हे. आर.)	आकार (रू.पै.)
१)	बामणोली	२८	०-३९-००	९.४७
२)	बामणोली	३०	०-२५-२०	५.९७
३)	बामणोली	३१	०-३६-४०	२.०१

सदर मिळकती आमचे अशिलांनी श्री. योगेंद्र सुमतीचंद्र गौती यांच्याकडून दिनांक ३०/१२/२०२५ रोजीच्या व दस्त क्र.७०७२/२०२५ कडे नोंदविलेल्या खरेदीखताद्वारे खरेदी केल्या आहेत.

सौ.कलावती केशव पुरो या मूळ सन २००७ च्या खरेदीखतामध्ये स्वतः संमती देणार म्हणून पक्षकार होत्या. असे असताना त्यांनी खरेदीखतातील स्वतःच्या संमतीच्या विपरीत भूमिका घेवून मौजे बामणोली फेरफार नोंद क्र. १००० विरुद्ध उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांच्या न्यायालयात आर.टी. एस.अपील नं.८८/२०२४ दाखल केले होते. सदरचे अपिल मंजुर करण्यात आले व फेरफार नोंद क्र.१००० रद्द करण्यात आली. सदर आदेशाविरुद्ध दाखल केलेले अपिल सध्या मा.अपर जिल्हाधिकारी, रायगड यांच्यासमोर आर.टी.एस.अपील क्र.३७८/२०२६ अन्वये प्रलंबित आहे.

सदर अपीलामध्ये मा.अपर जिल्हाधिकारी यांनी दिनांक ०७/०९/२०२६ रोजी स्थगिती अर्जावर आदेश केले असून अधिकार अभिलेखात ‘जैसे थे’ परिस्थिती ठेवण्याचे आदेश पारित केले आहेत. असे असताना कनिष्ठ महसुल अधिकाऱ्यांनी वरिष्ठ न्यायालयाच्या स्थगिती आदेशाचे उल्लंघन करून दिनांक ०९/०९/२०२६ रोजी फेरफार नोंद क्र.५६० नोंदविली व उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांच्या आदेशाचा अम्मल अधिकार अभिलेखात देवून आमच्या अशिलांचे नाव सदर मिळकतीच्या ७/१२ वरुन कमी केले आहे. सदरची नोंद ही पूर्णपणे बेकायदेशीर असून ती रद्द करण्याची कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे.

सबब, सर्वांनी असे सुचित करण्यात येते की, फेरफार नोंद क्र.५६० वर अवलंबून राहून कुणीही वर नमुद मिळकतींबाबत सद्या ७/१२ सदरी नावे असलेल्या इसमांसोबत कुणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये. त्यांच्यासोबत केला जाणारा कोणताही व्यवहार बेकायदेशीर आणि सुरुवातीपासूनच रद्दबातल (Void ab initio) ठरेल व तो आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. २२/१०/२०२६

ॲड. विधान अरविंद पाटील
रा. वत्सला, टिळक रोड, स्टेट बँकेसमोर, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यांत येते की,

माझे अशिलांचे सुचनेनुसार मी खाली नमूद केलेल्या शेती मिळकतींचे (सदर मिळकती) विद्यमान मालक श्री.अरविंद वामन रानडे, श्री.अमित शरद रानडे आणि मानसी शरद रानडे यांचा मालकी हक्क हितसंबंध निर्वेध असल्याबाबत तपास/खात्री करणेची प्रक्रिया चालु केली आहे. माझे अशिलांनी विद्यमान मालकांकडून सदर मिळकती खरेदी घेण्याबाबतची बोलणी चालु केली आहेत.

मिळकतीचे वर्णन

मौजे वरंडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील शेती मिळकतीचे वर्णन

अ. क्र.	भूमापन व उपविभाग क्रमांक	क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकार रु. पै.
१.	२९३	००-१६-४०	४.०६
२.	२९२	००-१४-२०	३.२५
३.	२९०	००-०५-१०	१.१९
४.	२८६	००-९२-४०	२१.७५
५.	२८३	००-३०-६०	०६.२५
६.	२८२	००-४०-८०	७.९४
७.	२२७	००-८५-२० पैकी ००.५६-८०	१९.०० पैकी १२.५२
८.	२२६	००-४२-५०	१०.३८
९.	२१६	००-२८-००	०६.७५
१०.	१९०	००-४५-८० पैकी ००.२०-००	१०.३१
११.	२९४	००-१८-२०	०४.५६
१२.	१८२	००-१५-७०	३.७५
१३.	३०३	००-४६-५०	१०.६१

वर नमूद मिळकतीमध्ये कुठल्याही व्यक्ती/व्यक्तींचा, कंपनीचा, मर्यादित दायीत्व भागिदारी संस्था, वित्तीय महामंडळ, बिगर बँकींग वित्तीय महामंडळ, पतसंस्था इत्यादी कोणाचाही हिस्सा, दावा, हरकत, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, परस्पर सामंजस्याचा करार, करार, हुकुमनामा, वारसाहक्क, अदलाबदल दस्त, हक्कसोड पत्र, कौटुंबिक व्यवस्था, बोजा, हरवलेल्या दस्तांमार्फत ताबा कब्जा दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतर २१ (एकविस) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांच्या प्रमाणित सत्यप्रतींसह पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहेत असे समजून मिळकतींच्या खरेदी व्यवहाराची बोलणी पुर्ण करुन खरेदीखत करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दि. २०/१०/२०२६.

ॲड. संपदा मनोज पाटील
शॉप नं.११, भास्कर को. ऑप. हौसि. सोसा., रामनाथ रोड, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड.
मो. ९२२५५६६०४३.

जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-देवघर, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील नमूद वर्णनाचे जमीन मिळकती पैकी क्षेत्र ०-२४-०० हे.आर सौ.निर्मला आत्माराम गावडे रा.वावे, ता.अलिबाग, जि.रायगड यांचे मालकीची असून, सदर जमिन मिळकत माझे अशिलांनी कायम विकत घेण्याचे ठरविले असून, तशा आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलां दरम्यान झालेली आहे.

जमिन मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र हे.आर	आकार रु. पै.
देवघर, ता.अलिबाग, जि. रायगड	६२	१-५३-९० पो.ख. ०-३५-३० एकूण १-८९-२०	११.८४

सदर वर नमूद जमिन मिळकतीपैकी सौ. निर्मला आत्माराम गावडे यांचे मालकीचे क्षेत्र ०-१९-६० हे.आर पो.ख. ०-०४-४० हे.आर एकूण क्षेत्र ०-२४-०० हे.आर आकार १.५१ रु. पैसे (खाते क्र.६००) ही जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदर जमीन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. मात्र तरी देखील सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा हक्क - हितसंबंध व अन्य कोणताही बोजा, साठेकरार, ताबा, कब्जा, कुळव्यवहार, चार्ज, पोटगी हक्क, बक्षिस भाडेपट्टा, फरोक्तखत, जाण्या-येण्याचे मार्ग लिज, दावा वगैरे अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ८ (आठ) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक: २१/१०/२०२६

सही /-
(ॲड.वैभव वसंत पाटील)
रा.नवेदर बेली, ता.अलिबाग
जि. रायगड, मो.९८५०२६१००८
खरेदीदाराचे वकील

अर्जदाराचे वकील सौ.वर्षा अ. पाटील

जाहीर नोटीस

अलिबाग येथील मा. दिवाणी न्यायाधीश व. स्तर. यांचे न्यायालयात

दिवाणी चौकशी अर्ज क्र.१३५/२०२६
(वारस दाखला मिळणेकरीता)

१. श्री. मनिष अरुण कारभारी,
वय - ५६ वर्षे, व्यवसाय-
रा.घर नं.६, कोमल अपार्टमेंट, श्रीधर नगर,
दत्त मंदिराजवळ, चिंचवड गाव, चिंचवड,
पुणे, महाराष्ट्र, ४११०३३.
२. सौ. स्नेहा अमोघ घरत,
पुर्वाश्रमीची राजश्री अरुण कारभारी,
वय - ६० वर्षे, व्यवसाय-
रा. बी - ७०५, सहयाद्री टॉवर्स, अप्पर गोविंद नगर,
पोद्दार स्कुल जवळ, मालाड, मुंबई, महाराष्ट्र ४०००९७ — अर्जदार
३. सौ. वृंदा विकास मयेकर,
पुर्वाश्रमीची माधवी अरुण कारभारी,
वय - ५४ वर्षे, व्यवसाय-
रा. सी-२०४, अक्युरा, स्तमजी अरबॅनिया,
माजिवाडा, ठाणे पश्चिम महाराष्ट्र ४००६०१.
४. श्री. अरुण धोंडु कारभारी,
वय - ८४ वर्षे, व्यवसाय-
रा. घर नं. ६, कोमल अपार्टमेंट, श्रीधर नगर,
दत्त मंदिराजवळ, चिंचवड गाव, चिंचवड,
पुणे, महाराष्ट्र, ४११०३३.
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्र. १ ते ३ यांची आई व अर्जदार क्र. ४ यांची पत्नी अनिता अरुण कारभारी यांचे मालकीची खाली नमुद मिळकत होती.

अलिबाग नगरपालिका हद्दीतील प्रथमेश सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., मधील मालमत्ता क्र.ALB000002689Z1ASB2002711, दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. २०२ क्षेत्र ५३७.८७५ चौ. फुट बिल्टअप) एकूण क्षेत्र १०७५.७५ चौ.फुट (९९.९८ चौ.मी) (बिल्टअप), श्रीबाग नं.२. चेंढरे, अलिबाग, जि.रायगड ४०२ २०१.

अनिता अरुण कारभारी यांचे दि.२०/०३/२०२६ रोजी निधन झाल्यामुळे वर नमुद मिळकतीबाबत अर्जदारांचे लाभात वारस दाखला मिळणेकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी या जाहीर नोटीशीने सर्वांना कळविणेत येत आहे की, अर्जदारांचे मागणीप्रमाणे वर नमुद मिळकतीबाबत वारस दाखला मंजुर करण्याकामी कुणाचीही कोणत्याही प्रकारे तक्रार असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासुन तीस दिवसांचे आत या मा. न्यायालयात हजर राहून लेखी हरकत नोंदवावी. विहीत मुदतीत हरकत न आल्यास अर्जदारांचे विनंतीप्रमाणे अर्जाची सुनावणी घेवून वारस दाखला मंजुर करणेबाबतची कार्यवाही करण्यात येईल व तद्नंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. आज दिनांक २१/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, व. स्तर अलिबाग

सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय, व. स्तर अलिबाग

जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे अंत्राट तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्क नोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

मिळकतीचे वर्णन

मौजे अंत्राट तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत

जमिन मालकाचे नाव	सर्व्हे नंबर	हिस्सा नं.	एकूण क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
गुरुनाथ सदानंद मसणे सुलेमान अयुब चाकी	१०१	२	०-४७-००	०.३६

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पूराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दहा (१०) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : २२/१०/२०२६

ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर
पत्ताः कोर्ट व्ह्यु को.ऑप.हौ.सोसायटी,
शॉप नं.१. कर्जत सिव्हील कोर्ट समोर, कर्जत रायगड
मो. : ८८८८०९८०८८/९५६१५७५६२६

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड खालील नमुद वर्णनाची बागायत मिळकत १. निर्मला किसन घरत, २. विद्या विजय घरत, ३.वैष्णवी विजय घरत, ४.राजेंद्र किसन घरत, ५.वृंदा विजय वर्तक ६.प्रतिमा प्रशांत नाईक, रा. मु. पो. चौल, जाखमाता, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या सामाईक मालकीची असून सदरील बागायत मिळकत सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबुल केले आहे. सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	एकूण क्षेत्र (हे. आर.)	आकार (रु.पै.)
चौल, ता.अलिबाग	१४३४	बागायत क्षेत्र ०-०७-३० पो.ख. ०-००-३० एकूण क्षेत्र ०-०७-६०	३.२९

सदर वर नमुद बागायत जमिन मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

वर नमुद मिळकतीबाबत अन्य कुणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाणखत, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज वगैरे बाबत हरकत असल्यास अशा व्यक्तींनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून पंधरा (१५) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २१/१०/२०२६

सही /-
ॲड. प्रविण कृष्णा झेंडेकर
मु. शिंत्रेगल्ली, पो. आक्षी,
ता. अलिबाग, जि. रायगड
खरेदीदाराचे वकील
मोबा. नं. ९०११३६२८६७

निवडक

दक्षिण आफ्रिकेविरुद्ध स्टार्कचा पराक्रम

सिडनी : ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज आणि फलंदाजांचा कर्दनकाळ म्हणून ओळख असलेल्या मिशेल स्टार्कने आज क्रिकेटच्या क्षेत्रात मोठा इतिहास रचला आहे. कसोटी क्रिकेटम ध्ये ४५० विकेट्स घेणारा तो पहिला डावखुरा वेगवान गोलंदाज ठरला आहे. सध्या साऊथ आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात कसोटी मालिका खेळवली जात आहे. या सिरिजमध्ये स्टार्कने हा



रेकॉर्ड केला आहे.साऊथ आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात गकेरबाह येथे खेळल्या जात असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाचा स्टार वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्क याने एक अभूतपूर्व आणि ऐतिहासिक पराक्रम केला आहे.स्टार्क आता कसोटी क्रिकेटच्या इतिहासात ४५० बळी घेणारा जगातील पहिला डाव्या हाताचा गोलंदाज ठरला आहे. सामन्याच्या पहिल्या डावात मिचेल स्टार्कने दक्षिण आफ्रिकेच्या मॅथ्यू ब्रीट्झकेला अवघ्या ४ रन्सवर आउट करत विकेटचे खाते उघडले. मिचेल स्टार्कपूर्वी ऑस्ट्रेलियाकडून केवळ तीनच गोलंदाजांनी कसोटी क्रिकेटमध्ये ४५० किंवा त्याहून अधिक विकेट्स घेण्याची कामगिरी केली आहे. यामध्ये शेन वॉर्न, ग्लेन मैक्ग्रा आणि नाथन लायन यांचा समावेश होतो. आता या एलिट यादीत मिचेल स्टार्कचे नाव देखील जोडले गेले आहे. कसोटी क्रिकेटमध्ये ४५० बळी घेण्याचा टप्पा गाठणारा तो ऑस्ट्रेलियाचा केवळ चौथाच गोलंदाज ठरला आहे, तर जगातील पहिला डाव्या हाताचा गोलंदाज ठरला आहे. ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्क याने नुकताच कसोटी क्रिकेटमध्ये ४५० बळींचा ऐतिहासिक टप्पा गाठत जागतिक विक्रम आपल्या नावावर केला आहे.

आयसीसीत नंदिनी, क्रांतीची झेप

मुंबई : आयसीसीच्या महिला टी-२० क्रमवारीत भारतीय गोलंदाज नंदिनी शर्मा आणि क्रांती गौड यांनी मोठी झेप घेतली आहे. झिम्बाब्वेविरुद्धच्या टी-२० मालिकेतील प्रभावी कामगिरीचा त्यांना फायदा झाला. नंदिनीने तब्बल २६ स्थानांची प्रगती करत ४५व्या क्रमांकावर मजल मारली, तर क्रांतीने ९ स्थानांची सुधारणा करत ४३वे स्थान मिळवलं आहे. दुसरीकडे, बांगलादेशविरुद्धची वनडे मालिका ३-० अशी जिंकणाऱ्या ऑस्ट्रेलियाच्या मेगन शट, एलिस पेरी आणि एनाबेल सदरलँड यांच्याही क्रमवारीत सुधारणा झाली आहे.



झिम्बाब्वेविरुद्धच्या पहिल्या दोन टी-२० सामन्यांत तीन विकेट्स घेणाऱ्या नंदिनी शर्माने भारतीय गोलंदाजांमध्ये सर्वाधिक प्रगती केली. तिने २६ स्थानांची झेप घेत ४५व्या क्रमांकावर स्थान मिळवलं आहे. पहिल्या सामन्यात तिने ११ धावा देत दोन विकेट्स घेतल्या होत्या. या कामगिरीच्या जोरावर नंदिनीने कारकिर्दीतील सर्वोत्तम ५०७ रेटिंग गुणांची कमाई केली.भारतीय फलंदाजांच्या टी-२० क्रमवारीतही बदल पाहायला मिळाले. मालिकेतील दुसऱ्या सामन्यात २५ चेंडूंत ५५ धावांची आक्रमक खेळी करणारी शेफाली वर्मा चौथ्या क्रमांकावर कायम आहे. पहिल्या सामन्यात ४९ धावा करणाऱ्या दीप्ती शर्माने एका स्थानाची प्रगती करत संयुक्तपणे ३७वे स्थान मिळवलं आहे. झिम्बाब्वेच्या खेळाडूंनाही या मालिकेतील कामगिरीचा फायदा झाला. केलिस न्दलोवु तीन स्थानांनी वर चढत ६४व्या क्रमांकावर पोहोचली. चिपों मुगेरी-तिरिपानोने सात स्थानांची सुधारणा करत ७३वे स्थान मिळवलं, तर जोसेफिन न्कोमो ९१व्या क्रमांकावर आली.

सात्विक-चिरागची जोडी पराभूत

पॅरिस : सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टीची भारतीय जोडी फ्रेंच ओपन बॅडमिंटन स्पर्धेत पराभूत झाली आहे. तर अस्मिता चालिहा आणि तन्वी शर्मा यांनी महिला एकेरीतील आपापले सामने जिंकून पुढच्या फेरीत प्रवेश केला आहे. पॅरिसमध्ये मंगळवारी पुरुष दुहेरीच्या राउंड ऑफ ३२ सामन्यात सात्विक-चिरागच्या जोडीचा फ्रान्सच्या क्रिस्टो पोपोव आणि टोमा ज्युनियर पोपोव यांनी १९-२१, २१-१८, १३-२१ असा पराभव



केला. हा सामना एक तासापेक्षा थोडा अधिक वेळ चालला. सात्विक आणि चिराग यांनी क्रिस्टो पोपोव आणि टोमा ज्युनियर पोपोव यांच्याविरुद्ध दुसरा गेम जिंकून पुनरागमन केले. मात्र, भारतीय जोडी निर्णायक गेममध्ये १३-२१ अशी पराभूत झाली.याआधी महिला दुहेरीत ट्रेसा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांना राउंड ऑफ ३२ मध्ये पराभव पत्करावा लागला. भारतीय जोडीला चायनीज तैपेईच्या लिन चिह-चुन आणि यांग चु यून यांनी २१-१७, २१-१८ असे हरवले. अस्मिताने चीनच्या हांग कियान शीचा २१-१८, २४-२२ असा पराभव केला. तिने हा सामना ३९ मिनिटांत जिंकत पुढील फेरीत प्रवेश केला.तन्वी शर्माने तिची हमवतन ईशारानी बरुआचा २१-१२, २१-१२ असा पराभव केला. ३२ मिनिटांत मिळवलेल्या या विजयासह तन्वी राउंड ऑफ १६ मध्ये पोहोचली.

आयसीसी अंडर-१९ महिला टी-२० विश्वचषक स्पर्धा ; भारत-पाकिस्तान वेगवेगळ्या गटांत!

२१ जानेवारीपासून रंगणार थरार

। मुंबई । प्रतिनिधी ।

आयसीसी अंडर-१९ महिला टी-२० विश्वचषक २०२७ च्या वेळापत्रकाची घोषणा करण्यात आली आहे. बांगलादेश आणि नेपाळ येथे २१ जानेवारी ते ६ फेब्रुवारीदरम्यान ही स्पर्धा रंगणार आहे. या स्पर्धेत १६ संघ सहभागी होणार असून, भारत आणि पाकिस्तानला वेगवेगळ्या गटात स्थान देण्यात आले आहे. गतविजेत्या भारतीय संघासमोर जेतेपद कायम राखण्याचे आव्हान असेल.

या स्पर्धेतील सामने बांगलादेशमधील चितगाव आणि सिलहट, तसेच नेपाळची राजधानी काठमांडू येथे खेळवले जाणार आहेत. एकूण ४१ सामन्यांचा थरार क्रिकेटप्रेमींना अनुभवता येणार आहे. सहभागी १६ संघांची प्रत्येकी ४ संघांच्या ४ गटांत विभागणी करण्यात आली आहे. गटातील सामने २६ जानेवारीपर्यंत



खेळवले जातील. त्यानंतर पात्र संघ सुपर सिक्स फेरीत प्रवेश करतील. या फेरीतील दोन गटांमधून प्रत्येकी दोन अव्वल संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील.

भारताचा समावेश अ गटात करण्यात आला असून, या गटात आयर्लंड, वेस्ट इंडिज आणि यजमान नेपाळ यांचाही समावेश आहे. भारतीय संघ २२ जानेवारीला काठमांडू इंटरनॅशनल क्रिकेट स्टेडियमवर वेस्ट इंडिजविरुद्ध पहिला सामना खेळणार आहे. त्याच दिवशी नेपाळचा संघ आयर्लंडविरुद्ध मैदानात उतरेल.

ब गटात दक्षिण आफ्रिका, न्यूझीलंड, पाकिस्तान आणि सामोआ यांचा समावेश आहे. क गटात ऑस्ट्रेलिया, बांगलादेश, नायजेरिया आणि संयुक्त अरब अमिराती (यूएई) हे संघ आहेत. ड गटात इंग्लंड, श्रीलंका, अमेरिका आणि स्कॉटलंड यांना स्थान देण्यात आले आहे.

६ फेब्रुवारीला अंतिम सामना

स्पर्धेतील उपांत्य सामने ४ फेब्रुवारीला चितगाव येथील बीर श्रेष्ठ शहीद फ्लाइट लेफ्टनंट मतिउर रहमान क्रिकेट स्टेडियमवर होणार आहेत. ५ फेब्रुवारी हा राखीव दिवस असेल. अंतिम सामना ६ फेब्रुवारीला स्थानिक वेळेनुसार दुपारी १.३० वाजता सुरू होईल. अंतिम सामन्यासाठी ७ फेब्रुवारी हा राखीव दिवस ठेवण्यात आला आहे. आयसीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजोग गुप्ता यांनी या स्पर्धेमुळे युवा महिला क्रिकेटपटूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळेल, असे सांगितले. ही स्पर्धा क्रिकेटच्या भविष्याची झलक दाखवणारे व्यासपीठ असून, सहभागी युवा खेळाडू जगभरातील मुलींसाठी प्रेरणादायी ठरतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. बांगलादेश आणि नेपाळ या सहयजमान देशांमध्ये क्रिकेटची लोकप्रियता आणि युवा लोकसंख्येचे प्रमाण लक्षात घेऊन या देशांची निवड केल्याचेही त्यांनी नमूद केले.

पहिल्या दिवशी चार सामने

स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी, २१ जानेवारीला चार सामने खेळवले जाणार आहेत. सिलहट येथे यजमान बांगलादेशचा सामना यूएईशी होईल. त्यानंतर ऑस्ट्रेलिया आणि नायजेरिया यांच्यात लढत रंगेल. काठमांडू येथे श्रीलंका-स्कॉटलंड आणि इंग्लंड-अमेरिका यांच्यात सामने होतील.चितगावमधील बीर श्रेष्ठ शहीद फ्लाइट लेफ्टनंट मतिउर रहमान क्रिकेट स्टेडियम, सिलहट इंटरनॅशनल क्रिकेट स्टेडियम, काठमांडूतील त्रिभुवन इंटरनॅशनल क्रिकेट स्टेडियम आणि अपर मुलपानी इंटरनॅशनल क्रिकेट ग्राउंड या चार मैदानांवर स्पर्धेतील सामने खेळवले जाणार आहेत.

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धा

सक्सेनामुळे केरळचा विजय

। पुणे । प्रतिनिधी ।

रणजी ट्रॉफीत केरळने ओडिशाचा डाव आणि ३६ धावांनी पराभव केला. केरळने पहिल्या डावात ४०४ धावा केल्या होत्या. त्याला प्रत्युत्तर देताना ओडिशाचा संघ पहिल्या डावात २२५ आणि दुसऱ्या डावात १४३ धावांवर गारद झाला. जलज सक्सेनाने दुसऱ्या डावात ५ विकेट घेतल्या, तर मोहम्मद अजहरुद्दीनने १३९ धावांची नाबाद खेळी केली.

हैदराबादचा डावखुरा फिरकीपटू तनय त्यागराजनने आंध्र प्रदेशविरुद्ध शानदार गोलंदाजी केली. त्याने २१ धावा देत ४ विकेट घेतल्या आणि सामन्यात एकूण ९ विकेट मिळवल्या.पहिल्या डावात आघाडी घेतल्यानंतर हैदराबादने दुसऱ्या डावात तनयच्या काम गिरीच्या जोरावर आपली स्थिती मजबूत केली. आंध्र प्रदेशने ६ विकेट्सवर ८८ धावा केल्या आहेत आणि त्यांना अद्याप ३१० धावांची गरज आहे.दिल्लीविरुद्ध गुजरातने ६ विकेट्सवर ४०७ धावा केल्या आहेत. संघ अजूनही २४१ धावांनी पिछाडीवर आहे. चिंतन गाजा ६२ धावांवर खेळत असून विशाल जयस्वाल त्याला साथ देत आहे.

१३ नोव्हेंबरपासून महिला फुटबॉलचा थरार

। कोलकाता । वृत्तसंस्था ।

भारतातील प्रमुख महिला क्लब फुटबॉल स्पर्धा असलेल्या इंडियन विमेन्स लीगच्या २०२६-२७ हंगामाला १३ नोव्हेंबरपासून सुरुवात होणार आहे. या हंगामात ८ संघ जेतेपदासाठी मैदानात उतरणार असून कोलकाता, जमशेदपूर आणि बंगळुरू येथे सामने खेळवले जाणार आहेत.

भारतातील महिला क्लब फुटबॉलच्या विकासाच्या दृष्टीने हा हंगाम महत्त्वाचा मानला जात आहे. देशातील प्रतिभावान महिला फुटबॉलपटूंना स्पर्धात्मक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे काम ही लीग करत आहे.

आठ संघांमध्ये जेतेपदासाठी चुरस



या हंगामात मागील पर्वातील सहा संघ सहभागी होणार आहेत. त्यामध्ये ईस्ट बंगाल एफसी, सेतू एफसी, किकस्टार्ट एफसी, नीता फुटबॉल अकादमी, गोकुळम केरळ एफसी आणि गढवाल युनायटेड एफसी यांचा समावेश आहे. याशिवाय, आयडब्ल्यूएल २ च्या २०२५-२६ हंगामात अनुक्रमे पहिले आणि दुसरे स्थान मिळवून बढती मिळवलेले होप्स एफसी आणि जुबा संघ एफसी हे दोन संघही यंदा खेळणार आहेत.

गतविजेता ईस्ट बंगाल एफसी यंदाही जेतेपद कायम राखण्याच्या निर्धाराने मैदानात उतरणार आहे. मागील हंगामात संघाने दमदार कामगिरी करत १३ विजय मिळवले होते. त्यांना केवळ एका पराभवाचा सामना करावा लागला होता.

वैयक्तिक कामगिरीत ईस्ट बंगाल एफसीच्या फाजिला इक्कापुटने मागील हंगामात २० गोल करत सर्वाधिक गोल करणाऱ्या खेळाडूचा मान मिळवला होता. नीता फुटबॉल अकादमीची प्यारी जाक्सा आणि सेतू एफसीची लिंडा कॉम यांनीही आक्रमक खेळाने छाप पाडली होती.

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे ३० ऑक्टोबर रोजी आयोजन

। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन ३० ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता पेण येथील लक्ष्मीनारायण हॉल म्हाडा कॉलनी येथे केले आहे.

सदरची वार्षिक सर्वसाधारण सभा आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येणार आहे .सदर सभेसाठी आरडीसीएचे सचिव प्रदिप नाईक यांनी जाहीर केलेल्या नोटीस नुसार सभेमध्ये मागील सभेचे इतिवृत्त वाचून केलेले ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येतील.

ऑक्टोबर २०२६ ते जून २०२७ पर्यंत आरडीसीएच्या वतीने घेण्यात येणाऱ्या सर्व मुलामुलींच्या विविध वयोगटातील निवड चाचणी स्पर्धाचे नियोजन सर्वांच्या सहमतीने सभेत करण्यात येणार आहे.गतवर्षी आरडीसीए तर्फे महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन व बीसीसीआयच्या स्पर्धेतील सामने जिल्ह्यातील विविध मैदानांवर यशस्वीरीत्या खेळविण्यात आल्याची माहिती सभासदांना दिली जाणार आहे. येणाऱ्या क्रिकेट हंगामात आरडीसीए खुल्या गटातील मुलांच्या व मुलींच्या रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन प्रीमिअर लीग व विविध वयगटातील निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन करण्या विषयाची माहिती सचिव प्रदिप नाईक सभेला देणार आहेत.सदरच्या सर्वसाधारण सभेसाठी उपस्थित राहण्याचे अवाहन सचिव प्रदीप नाईक यांनी केले आहे.

भारतीय महिला संघाने मालिका जिंकली

। रायपूर । वृत्तसंस्था ।

रायपूरमध्ये भारत विरुद्ध झिम्बाबे यांच्यात तिसरा आणि शेवटचा टी २० सामना पार पडला. यामध्ये भारताने टॉस जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. र भारताने झिम्बाबेला तब्बल २१७ रन्सचे टार्गेट दिले होते. अखेर या सामन्यात भारताने झिम्बाबेला ९२ रन्सने पराभूत केले आहे.

केलिस न्धलोवू आणि मॉडेस्टर मुपाचिकवा यांनी झिम्बाबेच्या डावाची सुरुवात केली. मात्र केलिस शून्यावर आउट झाली. त्यानंतर



मॉडेस्टर मुपाचिकवा देखील केवळ १ रन्स करून आउट झाली. शार्न मेयर्सने झुंज देण्याचा प्रयत्न केला. तिने शानदार अर्धशतक ठोकले. ती ६० रन्स करून आउट झाली. न्याशा ग्वांझुरा २ रन्स करून आउट झाली.

भारतीय संघाने चांगली गोलंदाजी करत झिम्बाबेला सुरुवातीलाच दोन मोठे धक्के दिले. क्रांती गौड आणि नंदिनी शर्माने झिम्बाबेच्या दोन विकेट्स पटकावल्या. निकी प्रसादने शार्न मेयर्सला आउट केले.

विजयादशमीच्या मुहूर्तावर कर्जत फोर्टी प्लस क्रिकेट हंगामाचा शुभारंभ

। कर्जत । प्रतिनिधी ।

विजयादशमीच्या मुहूर्तावर कर्जत फोर्टी प्लस क्रिकेट हंगामाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी अगदी ७२ - ७३ वर्षांचे ज्येष्ठ खेळाडूही उत्साहात उपस्थित होते. यावेळी जुन्या आठवणींना उजाळा देत सर्वच जण हास्य विनोदात रंगून गेले होते.

दहिवलीमधील बाल गोपाळ क्रीडा नगरी येथे क्रिकेट हंगामाच्या शुभारंभाचे आयोजन केले होते. संघटनेचे मार्गदर्शक मधु सुर्वे आणि रणजीत जैन यांच्या हस्ते शुभारंभ



करण्यात आला. याप्रसंगी शशांक शेट्टी, गजेंद्र दांडेकर, विनायक परांजपे, सुनील जाधव, शिरीष दिघे, महेंद्र निगुडकर, राजु जैन, राजेश लाड, दिनेश कडू, समीर चव्हाण, विराग फाटक, सचिन मनोरे, सुरेश मोहिते, सुनील खातु, विकास चित्ते आदी उपस्थित होते.

राजेश लाड यांनी जुन्या आठवणी काढताना स्व. गिरीश सुर्वे यांस संघटनेच्या वतीने श्रद्धांजली अर्पण केली. अध्यक्ष शशांक शेट्टी यांनी फोर्टी प्लस क्रिकेट खेळाचा आनंद घेत एक धाव आरोग्यासाठी व पुन्हा एकदा तारुण्याकडे तसेच खेळामधून एक पाऊल समाजासाठी आपली संघटना नेहमीच कार्यरत राहील व फोर्टी प्लस क्रिकेट खेळण्यासाठी कर्जतमध्ये मैदान उपलब्ध व्हावे. यासाठी प्रयत्न करणार आहे. येणाऱ्या हंगामात फोर्टी प्लस क्रिकेटचा मनमुराद आनंद घेत, कोणतीही दुखापत न होता आरोग्य निरोगी आरोग्य राहण्यासाठी मैदानावर खेळत राहू असा विश्वास व्यक्त केला. याप्रसंगी दिपकांर सालये, तुषार गोरे, किरण देशमुख, समीर चव्हाण, मंगेश म्हसे, विशाल निमकर्डे, सुजित पवार, राकेश गुप्ता, रमेश मिसे, जय उतेकर, पार्थ दांडेकर, भव्य सुर्वे, भाई जाधव, दिव्य सुर्वे, गिरीश जाधव आदी उपस्थित होते.

२५ ऑक्टोबर रोजी जिल्हास्तरीय

अॅथलेटिक्स स्पर्धा

। रायगड । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा अॅथलेटिक्स असोसिएशनतर्फे २० व्या राष्ट्रीय आंतरजिल्हा ज्युनियर अॅथलेटिक्स स्पर्धा २०२६ साठी रायगड जिल्ह्याचा संघ निवडण्याकरिता २५ ऑक्टोबर २०२६ रोजी पिल्ले एचओसी एज्युकेशनल कॉम्प्लेक्स, रसायनी येथे जिल्हास्तरीय ज्युनियर अॅथलेटिक्स स्पर्धा व निवड चाचणी आयोजित करण्यात येणार आहे.

राष्ट्रीय स्पर्धा १४ ते १६ नोव्हेंबर या कालावधीत वॉक्सन विद्यापीठ, कामकोले, सदाशिवपेट, हैदराबाद, तेलंगणा येथे होणार आहे. या स्पर्धेत रायगड जिल्ह्याचा अधिकृत संघ सहभागी व्हावा, या उद्देशाने जिल्हास्तरीय निवड चाचणी आयोजित करण्यात आली आहे.या निवड चाचणीसाठी १४ वर्षांखालील व १६ वर्षांखालील मुला-मुलींचे गट असतील.

१४ वर्षांखालील गटासाठी १७ नोव्हेंबर २०१२ ते १६ नोव्हेंबर २०१४ या कालावधीत जन्मलेले खेळाडू पात्र असतील. १६ वर्षांखालील गटासाठी १७ नोव्हेंबर २०१० ते १६ नोव्हेंबर २०१२ या कालावधीत जन्मलेले खेळाडू पात्र असतील. १४ वर्षांखालील गटातील खेळाडूचे वय १६ नोव्हेंबर २०२६ रोजी किमान १२ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे.१४ वर्षांखालील गटात ट्रायथलॉन प्रकार, (६० मीटर धावणे, लांब उडी, उंच उडी, बॉक थ्रो, ६०० मीटर धावणे आणि किड्स भालाफेक या प्रकारांचा समावेश आहे. १६ वर्षांखालील गटात ६० मीटर धावणे, ८० मीटर अडथळा शर्यत, ६०० मीटर धावणे, उंच उडी, लांब उडी, गोळाफेक, भालाफेक आणि पेंटॅथलॉन या प्रकारांचा समावेश असेल. सर्व स्पर्धा अॅथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या लागू नियमांनुसार घेण्यात येतील. १४ वर्षांखालील गटातून राष्ट्रीय स्पर्धेसाठी मुलगे व मुली मिळून एका जिल्ह्यातून जास्तीत जास्त चार खेळाडूंना प्रवेश देता येईल. १६ वर्षांखालील गटातील खेळाडूंची निवड स्पर्धा प्रकारानुसार करण्यात येईल.प्रवेशिका पाठविण्याची अंतिम तारीख शनिवार २३ ऑक्टोबर अशी आहे.

खेळाडूंनी जन्मतारखेचा अधिकृत पुरावा, नोंदणीची माहिती, छायाचित्र, पत्त्याचा पुरावा, आवश्यक शालेय किंवा संस्थेची कागदपत्रे तयार ठेवावीत. जन्मतारखेच्या पडताळणीकरिता नियमानुसार मूळ जन्मदाखला किंवा परिपत्रकात नमूद केलेला इयत्ता दहावीचा पुरावा सादर करणे आवश्यक असेल.

आयुषने मारली गोल्डन बाजी | प्रवीणने विश्वविक्रमाला गवसणी

आशियाई पॅरा गेम्समध्ये भारताचा जलवा

। जपान । वृत्तसंस्था ।

आशियाई पॅरा गेम्स २०२६ मध्ये भारतीय खेळाडूंची प्रभावी कामगिरी सुरूच आहे. आशियाई पॅरा गेम्सचा तिसरा दिवसही भारतासाठी खास ठरला. २१ ऑक्टोबर रोजी आयुष वर्मा आणि प्रवीण कुमार यांनी देशासाठी सुवर्ण कामगिरी केली.

आयुषने पुरुषांच्या शॉटपुट ५३ प्रकारात सुवर्णपदक जिंकून भारताच्या सुवर्णपदकांची संख्या १० वर नेली. प्रवीण कुमारनेही पुरुषांच्या उंच उडी ४४/६४ प्रकारात सुवर्णपदकच जिंकले नाही, तर पॅरा गेम्समध्ये एक नवीन विक्रमही प्रस्थापित केला. बंटीनेही याच प्रकारात रौप्यपदक जिंकून भारताला दुहेरी विजय मिळवून दिला.

आयुष वर्माने आशियाई पॅरा गेम्स २०२६ मध्ये उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक जिंकले.आयुषने पुरुषांच्या शॉट पुट ५३ प्रकारात ८.१६ मीटरचा सर्वोत्तम थ्रो करून दणदणीत विजय नोंदवला. सुरुवातीला तो मागे होता, पण आपल्या पाचव्या प्रयत्नात त्याने सर्वोत्तम थ्रो करून सुवर्णपदक



जिंकले. आयुषने पहिल्या प्रयत्नात ७.३९ मीटरचा थ्रो केला. त्यानंतर त्याने दुसऱ्या थ्रोमध्ये ७.४२ मीटर आणि तिसऱ्या थ्रोमध्ये ७.५० मीटरचे अंतर गाठले. चौथ्या प्रयत्नात आयुषने ७.९२ मीटर, तर पाचव्या प्रयत्नात ८.१६ मीटरचा सर्वोत्तम थ्रो केला. या थ्रोसह त्याने सुवर्णकामगिरी केली.

इराणच्या अलीरेझा हेमामीने ८.०९ मीटर भालाफेक करून रौप्य पदक जिंकले, तर कझाकस्तानच्या मखाम्बेत सेरिकालियेवने ६.८१ मीटर भालाफेक करून तिसरे स्थान पटकावले. आयुषच्या नावावर आता आशियाई पॅरा गेम्समध्ये नावावर दोन पदके आहेत. यापूर्वी त्याने भालाफेक ५३/५४ प्रकारात कांस्यपदक जिंकले होते. आयुष वर्माच्या पाठोपाठ प्रवीण कुमारनेही सुवर्णपदक पटकावले. प्रवीण कुमारने पुरुषांच्या उंच उडी प्रकारात २.०५ मीटरची उडी मारून सुवर्णपदक जिंकले.भारताच्या बंटीने १.९२ मीटर उंच उडी मारून रौप्यपदक पटकावले आणि तो दुसऱ्या स्थानी राहिला. उझबेकिस्तानच्या तेमुरबेक गियाझोव्हने १.८६ मीटरच्या उडीसह तिसऱ्या स्थानावर कब्जा केला. प्रवीणने आशियाई पॅरा गेम्समध्ये सुवर्णपदकावरच नाव कोरले नाही तर त्याने विश्वविक्रम रचला. त्याने या गेम्समधील पुरुषांच्या उंच उडी प्रकारात सर्वोच्च उडीचा विक्रम केला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)